मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर » मुंबई, शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४ » वर्ष- २९ » अंक - ९० » पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
किंमत : ३ रुपये



अमेरिकेतील न्यायालयाचं भारत सरकार व अजित डोवालांना समन्स

पान ४

## म ह त्त्वा चे

### मुंबईचे माजी पोलिस आयुक्त संजय पांडेंचा काँग्रेसमध्ये प्रवेश



**मुंबई:** राज्यातील विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता काहीच दिवसात लागण्याची शक्यता असून राजकीय घडामोडी मोठ्या प्रमाणात वाढल्याचं दिसतंय. काही दिवसांपूर्वी विधानसभा निवडणूक लढवण्याची घोषणा करणारे मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. संजय पांडे यांची विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा अशून जागावाटपानंतर त्यावर निर्णय घेऊ अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. बेकायदेशीर फोन टॅपिंग प्रकरणामुळे संजय पांडे चर्चेत आले होते. त्यांच्यावर ईडीने खटलाही भरला आहे. संजय पांडे यांनी काही दिवसांपूर्वीच त्यांच्या चार उमेदवारांची घोषणा केली होती. तसेच ते स्वतः वर्सोवा किंवा अंधेरीतून निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. आता उमेदवारीचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याची चर्चा आहे.

### लॉरेन्स बिश्नोईको भेजू क्या?, सलीम खान यांना धमकी

**मुंबई:** बॉलिवूड अभिनेता सलमान खान याच्यामागे लागलेले लॉरेन्स बिश्नोई गँगचे विघ्न अद्याप संपलेले नाही. सलमानचे वडील सलीम खान यांना बिश्नोई गँगने धमकी दिली आहे. सलीम खान सकाळी मॉर्निंग वॉकला गेले असताना बुरख्यात आलेल्या एका महिलेने त्यांनी धमकी दिल्याचे समोर आले आहे. सलीम खान हे रोजच्याप्रमाणे मॉर्निंग वॉकला गेले होते. एका बागेत बाकड्यावर निवांत बसलेले असताना गॅलेक्सीकडून बँडस्टॅण्डच्या बाजूने जाणाऱ्या रस्त्यावरून एक स्कुटी आली. ही स्कुटी एक पुरुष चालवत होता आणि मागे बुरखा घातलेली महिला बसली होती. अचानक या स्कुटीने यू टर्न घेतला आणि महिलेने सलीम खान यांच्याजवळ येत लॉरेन्स बिश्नोईला पाठवू का? असे म्हटले. या स्कुटीचा नंबर 7444 होता. यानंतर सलीम खान यांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत बुरख्यातील महिलेला पकडले.

### अश्विन 500 हुन अधिक विकेट व 6 शतके झळकावणारा पहिला क्रिकेटपटू

**चेन्नई :** टीम इंडियाचा अष्टपैलू क्रिकेटर रविचंद्रन अश्विन आता कसोटीत 500 पेक्षा जास्त विकेट्स घेणारा, 14 वेळा पन्नास पेक्षा जास्त धावा करणारा, 36 वेळा पाचपेक्षा जास्त विकेट्स घेणारा, तसेच कसोटीत सहा शतके झळकावणारा जगातील पहिला खेळाडू ठरला आहे. या बाबतीत अश्विननंतर इंग्लंडचा स्टुअर्ट ब्रॉड दुसऱ्या स्थानावर आहे, ज्याने कसोटीत 604 विकेट्ससह 14 वेळा पन्नास पेक्षा जास्त धावा केल्या आहे. एमए चिदंबरम स्टेडियमवर बांगलादेशच्या गोलंदाजांचा मुकाबला करत अश्विनने आपल्या कसोटी कारकिर्दीतील सहावे शतक झळकावले. संघ संघर्ष करत असताना अश्विनने अवघ्या 108 चेंडूत शतक झळकावले. अश्विनच्या खेळीत दहा चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता.

(सविस्तर वृत्त पान 7 वर )

# पूर्वीचे सरकार हफ्ते घेणारे पण आम्ही देणारे...

## 'नाद आमचा करू नका' कवितेद्वारे मुख्यमंत्री शिंदेंचे विरोधकांवर ताशेरे

**प्रतिनिधी**
**बुलढाणा**

**बुलढाणा येथे महायुती सरकारचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी भाषणात विरोधकांवर निशाणा साधला आहे. पूर्वीचे सरकार हफ्ते घेणारे होते, असा टोला देखील त्यांनी यावेळी लगावला आहे. मी मुख्यमंत्री झालो तेव्हा जेवढा आनंद झाला नव्हता, तेवढा आनंद या लाडक्या बहीण योजनेमुळे होत आहे. काही लोक ही योजना बंद करण्यासाठी हायकोर्टात गेले, असे ते म्हणाले.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, काँग्रेसचे सरकार आल्यावर आम्ही लाडकी बहीण योजना बंद करु, असे सुनील केदार म्हणाले. विरोधक म्हणाले तुम्ही दीड हजार देऊन महिलांना विकत घेत आहात, माझ्या बहीणींचा अपमान करताना जनाची नाही, मनाची तरी थोडी लाज वाटू द्यायची असती. काही लोकांना वाटले ही फसवी योजना आहे. ही फक्त निवडणुकीपूरती योजना आहे. परंतु तुम्हालाही वाटले नसेल की एवढ्या लवकर पैसे खात्यात येतील. काही लोक निवडणुकीमध्ये म्हणतात तुमच्या खात्यात खटाखट खटाखट पैसे येणार, नंतर म्हणतात प्रिंटिंग मिस्टेक झाली. परंतु महायुती सरकार कधीही असे म्हणणार नाही. कारण आम्ही जे बोललो ते केले आणि तुमच्या खात्यात पटापट-पटापट पैसे जमा झाले.

एवढ्या कमी वेळात माझ्या बहीणींच्या खात्यात पैसे जमा होणारी ही ऐतिहासिक आणि पहिली योजना आहे. दिलेला शब्द पाळणारे हे सरकार आहे. काही लोक योजना सुरू झाल्यानंतर योजनेला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते म्हणत होते पैसे येणार नाहीत. पूर्वीचे सरकार हफ्ते घेणारे सरकार होते, आपले सरकार तुमच्या खात्यात हफ्ते भरणारे सरकार आहे.

पान 8 वर

### *आमदार संजय गायकवाडांनी माझी जमीन बळकावली, मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमात महिलेने झळकावले पोस्टर्स*



*एकीकडे लाडकी बहीण योजनेचा गाजावाजा करणाऱ्या शिंदे सरकारमधील आमदार संजय गायकवाड यांनी एका महिलेची जमीन हडपल्याचे समोर आले आहे. एका महिलेने आरोप करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यक्रमानंतर मला माझी जमीन परत करा व न्याय मिळवून द्या असे बॅनर भर कार्यक्रमात झळकवले तसेच काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त केला. मोताळा येथे रिता उपाध्ये या महिलेची गट नंबर 62 मध्ये दीड एकर जमीन आहे. ही जमीन आमदार संजय गायकवाड यांनी बळकावली असल्याचा महिलेने आरोप केला. 2021 पासून आमदार गायकवाड यांनी जबरदस्तीने व बेकायदेशीरपणे सदर जमीन ताब्यात घेत त्यातील मुरूम उत्खनन केले व त्यावर फार्म हाऊस बनविले. दिपाली चौबे या महिलेसोबत संगनमताने आमदारांनी ही जमीन हडपली. दरम्यान या प्रकरणी न्यायालयाने बुलढाणा आमदार गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल देण्याचे आदेश दिले आहेत.*

### *वेडेवाकडे बोलून महायुतीला अडचणीत आणू नका*



*उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढेच महायुतीच्या वाचाळवीर नेत्यांना खडेबोल सुनावले. संविधानानुसार प्रत्येकाला आपापली मते व विचार मांडण्याचा अधिकार आहे. पण सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही वाचाळवीर नेत्यांनी वेडेवाकडे बोलून महायुतीच्या घटकपक्षांना अडचणीत आणण्याचे काम करू नये, असे ते म्हणाले. त्यांचा रोख भाजप आमदार नीतेश राणे, खासदार अनिल बोंडे व शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्याकडे होता. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर आमदार संजय गायकवाड यांनी खालच्या पातळीवर जाऊन टीका केली होती. यावर अजित पवारांनी बुलढण्यात भर सभेत कान टोचले.*

## कोणतीही ताकद ३७० कलम पुर्नप्रस्थापित करू शकत नाही

**श्रीनगर**



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचारास सुरूवात केली आहे. यावेळी बोलत असताना त्यांनी कोणतीही ताकद लावली तरीही 370 कलम पुनर्स्थापित करू शकणार नाही असे वक्तव्य केले. पाकिस्तानी संरक्षण मंत्री ख्वाजा यांच्या वक्तव्याचा समाचार घेत राहुल गांधींवर टीकेची तोफ डागली आहे. ते आज जम्मू काश्मीरच्या दौऱ्यासाठी गेले असताना म्हणाले आहेत.

पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी काश्मीर येथील कलम 370 पुनर्स्थापित करण्याबाबत वक्तव्य केले होते. जम्मू काश्मीर येथे 25 सप्टेंबर रोजी विधानसभा निवडणूक होणार आहे. यासाठी भाजप एकाबाजूला आणि दुसऱ्या बाजूला नॅशनल कॉन्फरन्ससोबत काँग्रेसची युती आहे. याचपार्श्वभूमीवर आता पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांने कलम 370 हटवण्यावरून वक्तव्य केले. त्यावर आता मोदी म्हणाले की, यांना कलम 370 पुन्हा अंमलात आणून देशात दहशतवाद निर्माण करायचा आहे. मात्र कोणतीही ताकद कलम 370 हटवू शकणार नाही, असे नरेंद्र मोदींना प्रतिपादन केले आहे.

शेर-ए-काश्मीर स्टेडियममध्ये प्रचारावेळी पंतप्रधान म्हणाले की, आम्ही देशाच्या संसदेत म्हटले आम्ही जम्मू-काश्मीरला पुन्हा एकदा राज्याचा दर्जा देऊ. 25सप्टेंबर रोजी सर्वांनी सर्व मतदानाचे विक्रम मोडीत काढण्याचे काम करावे, असे आवाहन मोदींनी केले आहे. दरम्यान, याआधी नरेंद्र मोदींनी 14 सप्टेंबर रोजी नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसबाबत वक्तव्य केले की, या कुटुंबांनी आपली राजकीय दुकाने सुरू केली. हे दुकान चालवण्यासाठी अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीर येथे द्वेष निर्माण झाला.



## राज्याच्या इतिहासात एकनाथ शिंदेंची ओळख महाराष्ट्र विकणारा मुख्यमंत्री, अशी केली जाईल

**प्रतिनिधी**
**मुंबई**

काँग्रेसचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर टीकेची तोफ डागली आहे. महाराष्ट्र विकणाऱ्या मुख्यमंत्र्यांमध्ये एकनाथ शिंदे यांचं नाव सर्वात वर असेल, असे वक्तव्य करत वडेट्टीवार यांनी शिंदेंचा समाचार घेतला आहे. शिंदेंसह देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यावरही वडेट्टीवार यांनी हल्लाबोल केला आहे.

महाराष्ट्राच्या सत्तेच्या खुर्चीत महाराष्ट्र विकणारी मंडळी बसली आहेत. कुंपणच शेत खातंय हे महाराष्ट्र बघतोय. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकारने कधी नव्हे एवढ्या जमिनी विकण्याचा सपाटा लावला आहे. महाराष्ट्र विकणारा मुख्यमंत्री कोण यावर उद्याचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा एकनाथ शिंदे यांचे नाव सर्वात वर असेल, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

देवेंद्र फडणवीस तिकडे फडफड करत आहेत असेही वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. तर अजित पवार यांच्याबाबत भाजपने वापरा आणि फेका नीती वापरली आहे, असे म्हणत वडेट्टीवार यांच्या भाजपच्या कुटिल राजकारणावर टीका केली आहे.

## धुळ्यात एकाच कुटुंबातील चौघांची आत्महत्या

**प्रतिनिधी**
**धुळे**



नाशिकमध्ये एकाच कुटुंबातील पती, पत्नी आणि 9 वर्षीय मुलीने आत्महत्या केल्याची घटना ताजी असताना आता धुळ्यात एकाच कुटुंबातील चौघांनी कीटकनाशक पिऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक उघडकीस आली आहे. ही घटना प्रमोद नगर येथे घडली. चौघांच्या आत्महत्येमागील कारण अस्पष्ट आहे.

प्रवीण मानसिंग गिरासे, पत्नी दीपा प्रवीण गिरासे, मुलगा मितेश प्रवीण गिरासे व सोहम प्रवीण गिरासे अशी मृतांची नावे आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, गिरासे यांनी दोन दिवसांपूर्वी शेजाऱ्यांना मुंबईला जातो, असे सांगितले होते. मात्र, मुंबईत न जाता घरातच चौघांनी कीटकनाशक पिऊन जीवन संपवले. प्रवीण गिरासे यांचे धुळ्यात फर्टिलायझरचे दुकान आहे. गिरासे हे त्यांची पत्नी व दोन मुलांसोबत प्रमोद नगर येथे राहत होते. मंगळवारी त्यांनी मुलांच्या ॲडमिशनसाठी मुंबईला जात असल्याचे शेजारील नागरिकांना सांगितले. मात्र, मंगळवारपासून त्यांच्या घराचा दरवाजा बंद होता. त्यामुळे नागरिकांना शंका आली. गुरुवारी सकाळी प्रवीण यांची त्यांच्या घरी आली असता चौघांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस आले.

## मोदींचा भविष्यातील नारा 'नो इलेक्शन'चा असेल

**प्रतिनिधी**
**मुंबई**



संविधान बदलण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप आम्ही आधीपासूनच करत आहोत. ती बदलली जात आहे, संविधानामध्ये जी मार्गदर्शक तत्वे आहेत, ती बदलली जात असल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. 'वन नेशन, वन इलेक्शन'च्या माध्यमातून तोच प्रयत्न होत असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. आधी महानगरपालिकेच्या निवडणुका एकत्र घेऊन दाखवा, राज्यांच्या निवडणुका एकत्र घेऊन दाखवा, असे आव्हान देखील त्यांनी दिले. मोदींचा कदाचित भविष्यातील 'नो इलेक्शन' हा नारा असेल. आणि 'वन नेशन, वन इलेक्शन' ही त्याची सुरुवात असल्याचा आरोप देखील खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

इंडिया आघाडीच्या माध्यमातून या विषयावर चर्चा केली जात असल्याचे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. हे विधेयक ज्या वेळेस संसदेत मांडले जाईल, त्या आधी आम्हाला चर्चा करावी लागणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. भारतीय जनता पक्षाचे प्रत्येक पाऊल हे संविधानाला आव्हान देणारे असल्याचे देखील राऊत यांनी म्हटले आहे. घटनेमध्ये काही महत्त्वाच्या तरतुदी संविधान निर्मात्यांनी करून ठेवलेल्या आहेत. त्या लोकशाहीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मोदी त्याच संविधानावर हल्ला करताना दिसत असल्याचे देखील राऊत त्यांनी म्हटले आहे. एकत्रित निवडणुका घेतल्यास खर्च कमी होऊ शकतो. या प्रश्नावर देखील संजय राऊत यांनी मोदींना टोला लगावला. मोदी यांना अर्थशास्त्र कधीपासून कळायला लागले. ते अर्थतज्ज्ञ कधी झाले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## ठाकरे सेना आणि पवार राष्ट्रवादीमध्ये जागावाटपावरून तिढा कायम

**प्रतिनिधी**
**मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी कामाला लागली आहे. यातच आज मुंबईमधील बीकेसीच्या सोफीटेल हॉटेलमध्ये शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमध्ये बैठक पार पडली. जागावाटप संदर्भात या दोन पक्षांमध्ये आजची ही बैठक पार पडली. या दोन्ही पक्षांमध्ये 15 ते 20 जागांवर तिढा निर्माण झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. याबाबत माहिती देताना सूत्रांनी सांगितलं की, महाराष्ट्रातील 15 ते 20 जागा अशा आहेत, ज्यामध्ये दोन्ही पक्ष आग्रही आहेत.

2019 च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (ठाकरे गट) ज्या जागा एकमेकांच्या विरोधात लढले होते, अशा काही जागांवर तिढा आहे. यामध्ये 15 ते 20 जागांवर दोन्ही पक्षांनी दावा केला आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन, दोन पक्षाचा दावा असलेल्या जागांवरील तिढा सोडवला जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. मविआच्या आजच्या बैठकीत काँग्रेस पक्ष हजर नव्हता. यावरच भाष्य करताना ठाकरे सेनेचे नेते संजय राऊत यांनी काँग्रेस पक्षावर थेट हल्लाबोल केला. काँग्रेस आजकाल अधिक व्यस्त असल्याचा चिमटा त्यांनी काढला. काँग्रेस नेते 10-10 दिवस वेळ देत नाहीत. तारीख पे तारीख देतात, असे राऊत म्हणाले.

## जरांगेंना बिग बॉसमध्ये घ्या!

**प्रतिनिधी**
**जालना**



मनोज जरांगे प्रत्येक आंदोलनावेळी वेगळी मागणी करत आहेत. 96 कुळींची भाषा करायची आणि सोबत स्वतःला मागासही म्हणायचे. त्यांनी बिग बॉसमध्ये जाण्याची गरज आहे. त्यांची त्याहून जास्त लायकी नाही, अशी तिखट टीका ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी गुरुवारी मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटीत उपोषणाला बसलेल्या जरांगेंवर निशाणा साधताना केली. जरांगे नामक व्यक्तीच्या सांगण्यानुसार महाराष्ट्राचा मुख्यमंत्री जीआर काढतो याची आम्हाला लाज वाटते. मुख्यमंत्र्यांना कायदा तरी कळतो का? असा टोलाही त्यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हाणला.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी 17 सप्टेंबरपासून जालन्याच्या आंतरवाली सराटीत उपोषण सुरू केले आहे. त्यांनी मराठा समाजाला ओबीसीतून कुणबी आरक्षण देण्याची मागणी केली आहे. त्याला ओबीसी नेते लक्ष्मण हाके व इतर नेत्यांनी कडाडून विरोध केला आहे. हाके यांनी गुरुवारी या प्रकरणी जरांगेंवर हल्ला चढवत त्यांना बिग बॉसमध्ये जाण्याचा उपरोधिक सल्ला दिला. हाके म्हणाले, मनोज जरांगेच काय त्यांचे वडील आले,

पान 8 वर

### विधानसभा निवडणुकीसाठी तिसरा पर्याय

## संभाजीराजे, बच्चू कडू, राजू शेट्टी आले एकत्र



**प्रतिनिधी**
**पुणे**

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीशिवाय आता तिसरा पर्यायही नागरिकांसाठी उपलब्ध असणार आहे. त्यानुसार तिसऱ्या आघाडीवर आता शिक्कामोर्तब झालं आहे, अशी माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी पुण्यात पार पडलेल्या बैठकीत दिली.

पुण्यात तिसऱ्या आघाडीसंदर्भात एक बैठक पार पडली. या बैठकीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू आणि स्वराज्य संघटनेचे प्रमुख संभाजी छत्रपती यांनी या बैठकीला हजेरी लावली. यावेळी 'परिवर्तन महाशक्ती' नावानं तिसरी आघाडी स्थापन करण्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. यासंदर्भात आता समन्वय समिती नेमून त्याद्वारे सर्व निर्णय घेतले जातील, असंही या बैठकीत ठरलं आहे.तसंच ज्या राजकीय पक्षांना या आघाडीत यायचं आहे त्यांनी 26 सप्टेंबरपर्यंत सहभागी व्हावं असं आवाहन राजू शेट्टी यांनी केलं आहे. 26 तारखेला या तिसऱ्या आघाडीचा छत्रपती संभाजीनगर इथं मेळावा होणार आहे. परिवर्तन महाशक्ती या नावानं एक सुसंस्कृत महाराष्ट्र, एक वेगळा पर्याय या महाशक्तीच्या माध्यमातून आम्ही पुढे येत आहोत, असं या बैठकीत संभाजीराजे यांनी सांगितलं.

## स्फोटांची मालिका म्हणजे युद्धाची घोषणाच!

### हिझबुल्लाच्या म्होरक्याचा इस्रायलला थेट इशारा

**वृत्तसंस्था**
**बेरुत**

स्फोटांच्या मालिकांनी हादरुन गेलेल्या हिझबुल्लानं आता इस्रायलला थेट धमकी दिली आहे. मंगळवारी लेबनॉनमध्ये पेजरचे स्फोट झाले. त्यानंतर बुधवारी वॉकीटॉकींचे स्फोट घडवून आणण्यात आले. हेझबुल्ला दहशतवादी संघटनेच्या सदस्यांना या स्फोटांमधून लक्ष्य करण्यात आलं. त्यानंतर आता हिझबुल्लाचा म्होरक्या हसन नसरुल्लाहनं इस्रायलला इशारा दिला आहे.





स्फोटांच्या मालिकांना युद्धाची घोषणा समजतो, असं नसरुल्लाहनं भाषणात म्हटलं. या स्फोटांनी संघटनेला अभूतपूर्व फटका बसल्याची कबुली त्यानं दिली. हिजबुल्लाहच्या सदस्यांना 4 हजारांहून अधिक पेजर वाटण्यात आले होते, असंही नसरुल्लाहनं म्हटलं. मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास या सगळ्या पेजरचे स्फोट झाले. त्यामुळे संपूर्ण लेबनॉन हादरुन गेला. या स्फोट मालिकेसाठी हेझबुल्लानं इस्रायलला जबाबदार धरलं आहे. पेजर स्फोट घडवून इस्रायलनं रेड लाईनचं उल्लंघन केल्याचं नसरुल्लानं म्हटलं आहे.

लेबनॉनमध्ये नसरुल्लाहच्या भाषणाचं प्रसारण सुरु असताना इस्रायलनं हिजबुल्लाच्या अनेक ठिकाणांना लक्ष्य केलं. इस्रायलनं दक्षिण लेबनॉनमधील देहरकानून अल-नहर, अल-हनिया, जिबकिन, फ्राऊन, आदचिट, कब्रिखा, अलमन, देइर अंतर, हारिस, मरकाबा, रब थलाथिनवर मोठ्या प्रमाणात हवाई हल्ले केले.

हसन नसरुल्लाहचं भाषण सुरु होताच इस्रायलच्या लढाऊ विमानांनी पश्चिमेकडील सोर जिल्ह्यापासून पूर्वेकडे असलेल्या हसबायावर हल्ले चढवले. इस्रायली लढाऊ विमानांनी जेनाटा, देइर कनोन अल-नहर, मजाडेल, मरकाबा, कब्रिखा, बानी हयान, मंसुरी, देइर एम्स, हसिस, देइर अंतर, हनीयेह, जेबकिन, फ्राऊन, रब्ब थलाथिन या शहरांना लक्ष्य केलं.

## कर्मवीर विद्यालयात विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**वसई :** जूचंद्र येथिल स्वराज्य प्रतिष्ठान तर्फे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात मार्शल आर्ट असोसिएशन ठाणे जिल्हा अध्यक्ष अमर सिंग व सुनिता रॉय यांनी 8 वी ते 12 वीच्या विद्यार्थिनींना स्वसंरक्षण कसे करावे याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मार्गदर्शक अमर सिंग व स्वराज्य प्रतिष्ठान जुचंद्रचे अध्यक्ष गणेश फागे यांचे स्वागत उपमुख्याध्यापक नाडेकर व सुनिता रॉय यांचे स्वागत वर्षा सोनवळे यांनी केले.मुलींचे होणारे शोषण,अत्याचार व गुड टच बॅड टच कसे ओळखावेत याची माहिती तसेच स्वत:चे स्वरक्षण कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून व शंकांचे निरासन करून विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदीप पाटील यांनी केले.



## थोडक्यात

### लोखंडवाला येथे बंगल्यात आग

**मुंबई :**अंधेरी (पश्चिम) लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथे एकमजली बंगल्यात गुरुवारी सकाळच्या सुमारास अचानकपणे आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने अग्निशमन दलाने सदर आगीवर वेळीच नियंत्रण मिळविले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेत कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही. पश्चिम उपनगरातील अंधेरी (पश्चिम), लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथे तळमजला अधिक एकमजली बंगल्यात गुरुवारी सकाळी ८.४५ वाजताच्या सुमारास अचानकपणे आग लागल्याची घटना घडली. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र या आगीच्या घटनेमुळे लोखंडवाला कॉम्प्लेक्समध्ये एकच खळबळ उडाली. कोणीतरी तत्काळ अग्निशमन दलाला वर्दी दिली. त्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ यंत्रणेसह धाव घेतली आणि लगेचच आग विझविण्यास सुरुवात केली. तब्बल अडीच तास अथक प्रयत्न केल्यावर सकाळी ११.२५ वाजता अग्निशमन दलाला संपूर्ण आग विझविण्यात यश आले.

### माली सीताराम कोळी यांचे निधन



**वसई :** वसई सागरी कोळी सोसायटीचे चेअरमन दयानंद कोळी ह्यांची आई श्रीमती माली सीताराम कोळी( वय वर्ष ८५) राहाणार पाचुबंदर वसई,ह्यांचे काल निधन झाले. त्यांच्या मागे २ मुले ,२ मुली .जावई ,सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजल्यावर सहकार क्षेत्रातील अनेकांनी दुःख व्यक्त केले आहे. तर वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर,माजी महापौर नारायण मानकर,प्रवीण शेट्टी यांनी दयानंद कोळी यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.श्रीमती माली सीताराम कोळी यांच्यावर पाचूबंदर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### बनावट पावत्यांद्वारे कंपनीची पावणेदोन कोटींची फसवणूक

**मुंबई :**बनावट पावत्यांद्वारे कंपनीची पावणेदोन कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली अंधेरी पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपींना भारतीय न्याय संहिता कलम ३५ (३) अंतर्गत नोटीस देण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. अंधेरी पूर्व येथील एका कंपनीत मुख्य वित्तीय अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या श्याम महेश्वरी यांच्या तक्रारीवरून अंधेरी पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम ४२०, ४०६ व ३४ अंतर्गत दीपक शर्मा आणि फ्रॅकलीन जॉर्ज यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आता वेध नवरात्रोत्सवाचे....!!

# गणेशोत्सवानंतर राजकीय बाबू नवरात्रोत्सवात प्रचाराची पोळी भाजणार

प्रतिनिधी
■ वसई

गणेशोत्सवाच्या धामधुमीत सर्वात चर्चेचा राहीला तो बॅनरबाजी विषय. अकरा दिवसांच्या बाप्पांना भावपूर्ण वातावरणात निरोप दिल्यानंतर आता राजकीय मंडळींचे लक्ष लागले आहे ते नवरात्रोत्सवाकडे. आगामी विधानसभा तसेच महानगरपालिका प्रशासनाच्या निवडणूका समोर ठेवून गणेशोत्सवात राजकीय बाबूंत बॅनरबाजीची स्पर्धा लागली होती. तशीच स्पर्धा येणाऱ्या नवरात्रोत्सवात पुन्हा दिसणार आहे.



नवरात्रोत्सव म्हटला म्हणजे हजारो गरबाप्रेमी एका छताखाली एकत्र जमतात. मोठ्या आनंदाने गरब्याचा खेळ रंगतो. सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळं या उत्सवात बड्या राजकीय नेत्यांना गाठून त्यांच्याकडून देणगी स्वरूपात बॅनरबाजी करतात. यंदा आगामी विधानसभा निवडणूकच नवरात्रोत्सवादरम्यान घोषित होण्याची चिन्हे असल्याने नवरात्रोत्सव हा सण इच्छुक उमेदवारांसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे. त्यासाठी सार्वजनिक मंडळांना भरभरून देणग्या देऊन बॅनरबाजीद्वारे राजकीय नेते प्रतिमादर्शन नागरिकांना घडवण्याच्या तयारित आहेत.

मोठमोठ्या बॅनरबाजीखाली नवरात्रोत्सवाचे आयोजन केले जाते. त्यामुळे अशा नवरात्रोत्सवात बॅनरबाजीची हौस भागवण्यासाठी व प्रचाराचा एकप्रकारे धडाका सुरू करण्यासाठी इच्छुक उमेदवार या नवरात्रोत्सवावर लक्ष ठेवून आहेत. यंदाचा नवरात्रोत्सव हा गरब्याबरोबरच मोठा राजकीय इव्हेंट ठरणार आहे. त्यादृष्टीने सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळेदेखील सज्ज झाली आहेत.

# नायगावमध्ये भूमाफियांकडून कांदळवनांवर कुऱ्हाड

## भाजपकडून भूमाफियांवर गुन्हे दाखल करण्याचे महापालिकेला निवेदन



प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्वेतील गणेशनगर परिसरातील जुना सर्व्हे क्र.283 व नवा सर्व्हे क्रमांक 258 या भूखंडावर पर्यावरणाचे रक्षण करणारी तसेच शेतीचे उधाणाच्या लाटांपासून रक्षण करणारी कांदळवने मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात या भूखंडावरील कांदळवनांवर निर्दयीपणे कुऱ्हाड चालवून अनधिकृत बांधकामं करण्यात आली आहेत. पालिकेकडे वारंवार ऑनलाईन तक्रारी करूनही पालिका अधिकारी कारवाईसाठी लक्ष देत नसल्याने नायगावातील गणेशनगर परिसरातील पर्यावरणपुरक कांदळवनांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. यावर पालिका प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी,अशा आशयाचे निवेदन भाजपाचे पालघर जिल्हा महामंत्री रामअवतार जितू यादव यांनी वरीष्ठ पालिका अधिकाऱ्यांना दिले आहे.

नायगाव पूर्वेतील गणेशनगर भागातील विपूल प्रमाणात असणाऱ्या कांदळवनांची अपरिमित तोड करून धनदांडग्या भूमाफियांनी अनधिकृत बांधकामं बांधली आहेत. या अनधिकृत बांधकामांत महापालिकेचा करोडो रूपयांचा महसूल वाया जात असून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक होत आहे. नायगावात याआधी कांदळवनांची अपरिमित तोड करणाऱ्या भूमाफियांवर कोकण विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानंतर कांदळवन समितीने नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदर भूखंडावर कांदळवनांची पुनश्च: लागवड करण्याचे निर्देश कांदळवन समितीने दिले आहेत. मात्र धनदांडगे भूमाफिया कांदळवनांच्या तोडीचा प्रकार अद्याप अवलंबत असून तेथे अनधिकृत बांधकामांच्या विटा रचू लागले आहेत.

याबाबत भाजपाचे वसई -विरार शहर जिल्हा स्लम सेलचे महामंत्री रामअवतार जितू यादव यांनी महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार, अति.आयुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त अजित मुठे, परिमंडळ क्र. 4 चे उपायुक्त समीर भूमकर, वालीव विभागाच्या सहा.आयुक्त निता कोरे यांच्याकडे पत्रव्यवहार करून कारवाईची मागणी केली आहे.

# अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्य कौतुकास्पद - मंत्री मंगलप्रभात लोढा




■ मुंबई

गेली ९८ वर्षे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था ही नगरपालिका,नगरपरिषद,जिल्हापरिषद,महानगर पालिकांमधील लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी घडवणारी आणि त्यांना प्रशिक्षण देऊन चांगले मनुष्यबळ निर्माण करणारी, वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन करणारी आणि त्यांच्या अडचणी शासन दरबारी मांडून सोडवणारी ही देशातील अग्रगण्य संस्था आहे.या संस्थेचे कार्य कौतुकास्पद व अनुकरणीय आहे असे गौरवोद्गार राज्याचे पर्यटन ,कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी अलीकडेच अंधेरीत काढले. या संस्थेची कार्यक्षमता "त्याच्या जीन्समध्ये" असून त्यांनी संस्थेच्या समर्पणाची प्रशंसा केली.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,अंधेरी पश्चिम येथील मेयर्स हॉल,सी.डी. बर्फीवाला मार्ग,जुहू गल्ली येथील विविध डिप्लोमा अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या पदवीचे औचित्य साधून एक उल्लेखनीय दीक्षांत समारंभ साजरा केला होता.संस्थेच्या मेयर हॉल मध्ये सॅनिटरी इन्स्पेक्टर, एलजीएस, एलएसजीडी,एडीएमएलटी,मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी या विविध अभ्यासक्रमातील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते

# आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तीन महिलांचे नायगाव पोलीसांनी वाचविले प्राण

प्रतिनिधी
■ वसई

एकाच महिन्यात आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तीन महिलांचे प्राण वाचवून नायगांव पोलीस कौतुकास पात्र ठरले आहे. नायगाव पूर्वेला राहणाऱ्या नबरा-बायकोचे जोरात भांडन चालु असून तुम्ही तात्काळ मदत करा,असा कॉल ११२ क्रमांकावरुन सदर महिलेच्या भावाने १ सप्टेंबरला दुपारी १२ वाजता उत्तरप्रदेश येथून केला होता.त्याचे गांभीर्य ओळखून पोलीस शिपाई संतोष घुगे यांनी घटनास्थळी तात्काळ भेट दिली असता मदर बिल्डींगच्या खाली नागरिक गोळा झाले असल्याचे त्यांना दिसून आले.त्यांनी घरात प्रवेश केला असता रचना कुलकर्णी (बदललेले नाव) या महिलेने गॅलरीकडे धावत जावून १३ व्या मजल्यावरुन उडी मारण्याचा प्रयत्न केला.त्याचवेळी प्रसंगावधान राखून घुगे यांनी तिचे केस पकडून तिला उडी मारतांना अडवले. त्यानंतर तिला लिफ्टने बिल्डींग खाली घेवून आले.घरगुती वादातून तिने हा आत्महत्येचा प्रयत्न केला होता.

दुसऱ्या घटनेत १३ सप्टेंबरला रात्री १०.३० च्या सुमारास नायगाव पूर्व येथे राहणाऱ्या एका विवाहित महिलेने गळफास लावल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरिक्षक बलराम पालकर यांना मिळाली होती.त्यामुळे घटनास्थळी जावून पाहणी केली असता २४ वर्षीय विवाहीत महिला कविता (बदललेले नाव) ने साडीच्या सहाय्याने गळफास लावल्यानंतर तिची साड़ी कापून नागरिकांनी तिला खाली उतरवल्याचे दिसून आले.

प्रकृती गंभीर असल्याचे दिसून आल्यामुळे पालकर यांनी तात्काळ तिला खाजगी वाहनाने जुचंद्र येथील सामान्य रुग्णालयात नेले.तेथील डॉक्टरांनी तिला ऑक्सीजन आणि सलाईन लावून प्राथमीक उपचार दिले.त्यानंतर खाजगी रुग्णालयात तिच्यावर तिन दिवसांच्या उपचारानंतर डिस्चार्ज देण्यात आला.ही घटनाही कौटुंबीक वादातून घडली होती.

तिसऱ्या घटनेत याच महिन्याच्या १८ तारखेला सकाळी १६ वर्षीय निलम (बदललेले नाव) ही घरातील सिलींगला दुपट्टा बांधून वॉशींग मशीनवर चढून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा कॉल पोलीसांनी ११२ वर आला.त्यावेळी कर्तव्यावर असलेल्या पोलीस शिपाई संतोश घुगे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.मात्र,सदर मुलीने दरवाज्याला आतून कडी लावली होती.त्यामुळे घुगे यांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला,आणि समुपदेशन करुन तिला आत्महत्येपासून परावृत्त केले.आई घरगुती कारणावरुन ओरडल्यामुळे तिने हे पाऊल उचलले होते.

आपत्कालीन परिस्थीतीमध्ये पोलीस मदतीकरीता डायल ११२ ही प्रणाली मागील ४ वर्षापासून चालु करण्यात आली असून त्याद्वारे कॉल आल्यानंतर पोलीसांचा प्रतिसाद देण्याच्या वेळेमध्ये देखील खूप उल्लेखनीय बदल झालेला आहे.कॉल आल्यानंतर घटनास्थळी किती कमी वेळेत पोहोचता येईल याचा दर महिन्याच्या गुन्हें बैठकीत पोलीस आयुक्त आढावा घेत असून,चांगला प्रतिसाद देणाऱ्या पोलीस स्टेशनला बक्षीस तसेच उशीरा प्रतीसाद देणाऱ्या पोलीस स्टेशनचा खुलासा मागवत आहेत.त्यामुळे ११२ क्रमांकावर नागरिकांचा विश्वास बसू लागला आहे.

# वसईच्या प्रवेशद्वाराला विद्रुपीकरणाचे गालबोट

## अवैध झोपड्या, पत्राशेड बांधकामांमुळे प्रवेशद्वारालगत बकालीकरण

प्रतिनिधी
■ वसई

वसई -विरार शहर हे हरित सौंदर्यासाठी ओळखले जाते, हिरवाईने नटलेला परिसर, जैव विविधता व वन्यजीवांनी नटलेला तुंगारेश्वर अभयारण्य, विस्तीर्ण समुद्र, ऐतिहासिक वारसा स्थळे, डोंगररांगा, नद्या, खाडी, निसर्गरम्य ठिकाणे यामुळे मुंबई, ठाण्यातील पर्यटकांची पहिली पसंती वसईला आहे. पिकनिकसाठी येथे जत्थेच्या जत्थे येतात. मात्र हे पर्यटक ज्या प्रवेशद्वारांतून वसईच्या पूण्यनगरीत प्रवेश करतात त्याच प्रवेशद्वारालगत अनधिकृत झोपड्या, अवैध भंगार व्यवसायासाठी थाटलेल्या अवैध पत्राशेड यामुळे वसईचे प्रवेशद्वार काळवंडले आहे.

वसई पूर्वेतील वर्सोवा पूलानजिक सध्या अवैध झोपड्या तयार होत आहेत. मुंबई-ठाण्यावरून वसईत येताना डाव्या बाजूला लोखंडी पत्राशेड उभारून त्यात भंगाराची गोडाऊन सुरू करण्यात आली आहेत. वर्सोवा पूलालगत अवैध झोपड्या तयार होत आहेत. प्रवेशद्वार सुरू होताच ससुपाडा गाव लागते. या गावात अवैध झोपड्या वाढू लागल्याने ग्रामस्थांनी तिव्र संताप व्यक्त केला आहे. याबाबत पालिका प्रशासन कारवाईच्या नावाने ढूस असल्याने या भूमाफियांना आयतेच पथारी पसरण्याची मुभा मिळाली असल्याचा संताप ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.



वसईसारख्या हरित सौंदर्याने नटलेल्या वैभवाला गालबोट लावण्याचे काम परप्रांतीय भूमाफियांकडून सुरू असताना वसई -विरार शहर महानगरपालिका सुस्त असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. वसई- विरार शहर महानगरपालिका मध्यंतरी वसईत प्रवेश करणाऱ्या प्रवेशद्वारांचे सुशोभिकरणावर खर्च करणार होती. मात्र तो सुशोभिकरणाचा मुद्दाच बाजूला सारून प्रवेशद्वारालगत अनधिकृत झोपड्यांचे स्तोम वाढत चालले आहे.

# पद्मविभूषण रामभद्राचार्य महाराज यांच्या शुभहस्ते श्री गंगोत्री उत्तर भारतीय भवनचा भूमिपूजन सोहळा संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

मीरा रोड येथील श्री गंगोत्री उत्तर भारतीय भवनाचे भूमिपूजन पद्मविभूषण रामभद्राचार्यजी महाराज यांच्या हस्ते मंगळवारी झाले. उत्तर भारतीय समाजाच्या वर्षानुवर्षांच्या प्रतिक्षेचा आणि अपेक्षांचा निकाल मंगळवारी प्रत्यक्षात आला, जेव्हा श्री गंगोत्री उत्तर भारतीय भवनचे भूमिपूजन विधिवत संपन्न झाले. या ऐतिहासिक प्रसंगी धर्मचक्रवर्ती पद्मविभूषण तुलसीपीठाधीश्वर जगद्गुरू रामानंदाचार्य स्वामी श्री रामभद्राचार्य जी महाराज यांच्या कमळाच्या फुलांनी भूमिपूजनाचा विधी संपन्न झाला. स्वामीजींच्या आशीर्वादाने आणि आध्यात्मिक मार्गदर्शनाने या वास्तूच्या बांधकामाला सुरुवात झाली. यावेळी आमदार गीता जैन, भरत जैन यांनीही पूजेत सहभाग घेतला. श्री राम कथेचा भव्य कार्यक्रम पद्मविभूषण पीठाधीश्वर जगद्गुरू रामनंदाचार्य स्वामी श्री



रामभद्राचार्य जी महाराजांच्या उपस्थितीत बुधवार दिनांक 18 सप्टेंबरपासून रामकथेला सुरुवात झाली असून 24 सप्टेंबर रोजी समाप्त होणार आहे. मीरा रोड (पूर्व) येथील सालासर सेंट्रल पार्क एस. च्या. पाषाण घुमटात दुपारी ४ ते ७ या वेळेत रामकथा होत असून ही रामकथा ऐकण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होत आहे.

25 सप्टेंबर रोजी सकाळी 10 ते 1.30 या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. नारी सशक्तिकारण फाउंडेशन च्या वतीने आयोजित या सोहळयासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पालघर येथून मोठ्या संख्येने रामभक्तांचे येणे जाणे सुरु आहे.

# महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळातर्फे जागतिक पर्यटन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

## 'पर्यटन आणि शांतता' हे यंदाच्या जागतिक पर्यटन दिनाचे घोषवाक्य

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी जागतिक पर्यटन दिन २०२४ साजरा करण्यात येणार असून युनायटेड नेशन टुरिझम यांचेद्वारे सन २०२४ करिता जागतिक पर्यटन दिनाचे घोषवाक्य 'पर्यटन आणि शातंता' हे घोषित करण्यात आले आहे. जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या सर्व प्रादेशिक कार्यालये यांच्यातर्फे 'पर्यटन व शांतता' या विषयाच्या अनुषंगाने परिसंवाद, चित्रकला व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी यांनी दिली आहे.

यावर्षी जॉर्जियाची राजधानी तीबीलीसी येथे २७ सप्टेंबर रोजी जागतिक पर्यटन दिन साजरा केला जाईल. जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधत 'एमटीडीसी'ची प्रादेशिक कार्यालये, पर्यटक निवासे, उपाहारगृहे, बोट क्लब्स, कलाग्राम इ. ठिकाणी दि. २७ सप्टेंबर २०२४ पर्यंत पर्यटनाशी निगडीत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करत "पर्यटन दिन' साजरा करण्यात येणार आहे.

एमटीडीसी प्रादेशिक कार्यालयांमार्फत जागतिक पर्यटन दिनानिमित्त परिसंवाद आयोजित केले जाणार आहेत यामध्ये नामवंत व्यक्ती, पर्यटन तज्ञ व पर्यटन व्यावसायिकांना आमंत्रित केले जाणार आहे. त्याचबरोबर निबंध स्पर्धांचे प्रत्येक प्रादेशिक स्तरावर आयोजन करण्यात येणार आहे. निबंध स्पर्धेसाठी पर्यटन : शांतता स्थापित करण्याचे एक साधन, पर्यटन व जागतिक शांतता, महाराष्ट्राची पर्यटन स्थळे व त्यांचा शांतता संदेश, माझ्या स्वप्नातले पर्यटन, भारत व पर्यटन : शांततेचे दूत आणि प्रतिक असे विषय ठेवण्यात आले आहेत. जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून 'पर्यटन व शातंता' या घोषवाक्याशी निगडीत प्रत्येक प्रादेशिक व्यवस्थापकांच्या अखत्यारितील शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा देखील आयोजित करण्यात येणार आहे.

निबंध आणि चित्रकला स्पर्धेसाठी विजेत्यांना प्रथम पारितोषिक प्राप्त स्पर्धकाला पर्यटक निवासात २ व्यक्तींना २ रात्री ३ दिवस राहण्याची व्यवस्था + प्रमाणपत्र + स्मृतीचिन्ह. (संबंधित प्रादेशिक व्यवस्थापकांच्या अखत्यारितील पर्यटक निवासात), व्दितीय पारितोषिक पर्यटक निवासात २ व्यक्तींना १ रात्र २ दिवस राहण्याची व्यवस्था + प्रमाणपत्र + स्मृतीचिन्ह , तृतीय पारितोषिक जवळच्या पर्यटक निवासात २ व्यक्तींना १ दिवस राहण्याची व्यवस्था दुपारचे जेवण प्रमाणपत्र+ स्मृतीचिन्ह अशी पारितोषिक ठेवण्यात आली आहेत.

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that my client **SMT. MARY VERGHESE**, Residing at Room No. 4, Jyoti Building Amber CHS Ltd., Phase II, Vallipier Road, Near Old RTO Office, Kalyan, Dist. Thane, Pin – 421301, has filed Police Complaint at Kalyan Police Station bearing No. 8yAo8uhhU4-2024 dated 18.09.2024 in connection of Lost/Misplaced of Share Certificate of No. 35 bearing Distinctive No. 171 to 175 of Amber CHS Ltd.

Any person having any objection in connection of the above said Share Certificate, the same may be made known to me in writing within 15 days from the date of issue of this notice, failing which my client shall proceed for issuing the duplicate Share Certificate with Society.

Place: Virar
Date: 20.09.2024

(NITIN N.SHAH)
Adv. & Notary
Add: Shop No. 23, SHREE VRINDAVAN CHS LTD., 284 Agashi Rd, Behind Woodland Cinema, Virar (West), Dist-Palghar PIN 401303. Mobile No. **9860103468**

### जाहीर नोटीस

याद्वारे तमाम जनतेस जाहीर नोटीस देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार ॲडव्होकेट याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या सदर मालमत्तेच्या संदर्भात कै.श्री.सुर्यकांत अनंत महापदी यांचे कायदेशिर वारस म्हणजेच १) सौ.सुजाता सुर्यकांत महापदी, २) श्री.सिद्धार्थ सुर्यकांत महापदी व ३) श्री. ऋषिकेश सुर्यकांत महापदी, यांचे शिर्षकाची तपासणी करीत आहेत.

सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात वारस, हिस्सा, करारपत्र, विक्री, हस्तांतरण, गहाणवट, अभिहस्तांकन, वहिवाट, देवाण घेवाण, धारणाधिकार, दान, बक्षिस, परवाना, तारण, गहाण, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, लिव्ह ॲन्ड लायसन्स, भाडेकरु, विकास अधिकार, बोजे, संपादन, शिर्षकाचे हस्तांतरण किंवा कोणत्याही न्यासाअंतर्गत लाभार्थी हितसंबंध, देखभाल, मृत्यूपत्र, विभागणी, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, खटला, मनाई हुकुम, आदेश किंवा इतर कोणत्याही मार्गाने कोणताही दावा, हितसंबंध, हक्क, शीर्षक, इस्टेट, लाभ, आक्षेप किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी असा कोणताही दावा सर्व आवश्यक आणि सहाय्यक दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या शॉप नं.४, चंद्रदेव दिक्षीत निवास, राजा छत्रपती शिवाजी मार्ग, वुडलँड थेअटर समोर, पेट्रोल पंपाजवळ, विरार पश्चिम-४०१ ३०३ येथील कार्यालयात सुचीत करावे असे न केल्यास असे सर्व किंवा कोणतेही दावे/आक्षेप/मागणी किंवा हितसंबंध सोडून दिले आणि/ किंवा त्याग केले असे समजण्यात येईल. कृपया नोंद घ्यावी की, वर उल्लेखिल्यानुसार निर्धारित वेळेनंतर या खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेचे वारस नोंद केले जातील.

**अनुसूची (सदर मालमत्ता)**

गाव मौजे:विरार, तालुका:वसई, जिल्हा:पालघर, येथील प्लॉट नं.०१ ते ०३, सर्व्हे नं.३७९ ए २(पार्ट), ३७९ बी, अशा वर्णनाच्या मिळकतीवर दिनांक ३० ऑगस्ट २००४ च्या खरेदीखताप्रमाणे बांधण्यात आलेली इमारत रिद्धी सिध्दी अपार्टमेंट मधील फ्लॅट नं.१०१, डी विंग, दत्तछाया को.ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, दत्त मंदिर रोड, एम.बी इस्टेट, विरार पश्चिम, तालुका: वसई, जिल्हा:पालघर-४०१ ३०३ अशा वर्णनाचा फ्लॅट ज्याचे क्षेत्रफळ ३०.०१ चौ.मी. कार्पेट, ३६.४४ चौ.मी.बिल्टअप असे आहे. सदर फ्लॅटचे अ.क्र. १२६ ते १३० असे विशिष्ट अनुक्रमांक असलेले प्रत्येकी रक्कम रु.५०/- इतक्या दर्शनी रकमेचे पाच पूर्ण भरलेले म्हणजेच एकूण रक्कम रु.२५०/- इतक्या रकमेचे शेअर्स ज्याचे शेअर्स सर्टिफिकेट क्र.२७, दिनांक असे आहे.

दि.:२०.०९.२०२४
ठिकाण:-विरार

सही/-
श्री.पंकज जयकृष्ण दिक्षीत
वकील उच्च न्यायालय,मुंबई
मो.७५१७७ ३३५५३

### पब्लिक नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, गांव मौजे बोळींज, तालुका वसई, जिल्हा : पालघर येथील सम्राट मिलेनियम पॅराडाईस मधील फ्लॅट नं. अे/४०१, चौथा मजला असा फ्लॅट श्री. के. मल्लिकार्जुन व सौ. विशाला एस. कल्याणशेट्टी यांच्या मालकीचा असून श्री. के. मल्लिकार्जुन हे दिनांक ०४/१२/२०१३ रोजी मयत झालेले आहेत व त्यांच्या मृत्यूनंतर दक्षा मल्लिकार्जुन कल्याणशेट्टी (पत्नी) व विशाला एस. कल्याणशेट्टी (आई) असे वारस आहेत.

विशाला एस. कल्याणशेट्टी यांनी दिनांक २४/०८/२०१५ रोजीच्या कराराने सदर फ्लॅट वक्षा मल्लिकार्जुन कल्याणशेट्टी यांना कायमचा विक्री केलेला आहे व आता दक्षा मल्लिकार्जुन कल्याणशेट्टी ही सदर फ्लॅटची एकमेव मालक आहे, तरी सदर फ्लॅटवर अगर त्याचे एखाद्या भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा वारसा हक्क, हिस्सा, दावा असल्यास त्यांनी तो निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या १११, पहिला मजला, कपाडीया हाऊस गावठण, विरार प., ता. वसई, जि. पालघर येथील कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून १४ दिवसाचें आंत सर्व कागदपत्रासहित लेखी कळवावा, तसे न केल्यास तशा प्रकारचा कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क, हितसबंध नाही असे समजून किंवा कोणाचा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.

कळावे.

आपला विश्वासू
आर. टी. पाठक
वकील
दिनांक २०/०९/२०२४

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that my clients **MRS. ASHA BABULAL PRAJAPATI AND MR. BABULAL UNAJI PRAJAPATI** have purchased Flat No. B/204, Magnum CHS Ltd., situated at Gokul Township, Village: Bolinj, Agashi Road, Virar (West) Tal-Vasai, Dist-Palghar, Pin – 401303 from **MR. NARAYANLAL CHHOGALAL CHHIPA**.

Any person having any objection to sale or claiming any right, title or interest in said Flat by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, possession, Inheritance, lease, lien, attachment or any other right whatsoever. The same may be made known in writing to me at Shop No.23, Shree Vrindavan CHS Ltd., B/H Woodland Cinema, Virar (W), Tal-Vasai, Dist-Palghar, Pin 401 303 within 15 days from the date of issue of this notice, failing which society shall proceed to change the name as per rules & regulation.

**Place: Virar**
**Date: 20.09.2024**

(V.S.RIDDHI)
(ADVOCATE)

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 90
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ९०
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

*मुंबई : अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाउंडेशन च्या स्वाभिमान सी एस आर उपक्रमाद्वारे दुर्बल घटकातील चार हजार महिलांचे तीनशे स्वयंसहाय्य गट तयार करून त्यांचे सक्षमीकरण झाले आहे. या महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण मिळाले असून आता त्या महिला नियमितपणे उत्पन्न मिळवत आहेत. या महिला उद्योजकांना सहाय्य करण्यासाठी अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाउंडेशनने या महिलांसाठी सणासुदीच्या दिवसात आपल्या विविध कार्यालयांमध्ये स्टॉल लावून आपल्या उत्पादनांची विक्री करण्याची संधी दिली. याद्वारे या महिलांनी वेगवेगळ्या प्रकारच्या मेणबत्त्या, वारली पेंटिंग, मसाले, कृत्रिम दागिने आणि गृह सजावटीच्या वस्तू आदींची विक्री करून उत्पन्न मिळवले. अदाणी इलेक्ट्रिसिटी च्या कर्मचाऱ्यांनी उत्साहाने या वस्तू खरेदी करून या महिलांना सहाय्य केले. आदाणी इलेक्ट्रिसिटीच्या बोरिवली कार्यालयात अशाच एका प्रदर्शनातील स्टॉलवर महिला आपल्या उत्पादनांची विक्री करताना दिसत आहे. अदाणी इलेक्ट्रिसिटी च्या उपनगरातील अन्य कार्यालयांमध्येही असेच स्टॉल उभारण्यात आले होते.*



# स्वच्छता कर्मचारी हा मुंबईचा खरा हिरो - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी) येथे 'स्वच्छता ही सेवा' राज्यस्तरीय अभियानाचा प्रारंभ



प्रतिनिधी
■ मुंबई

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये 'स्वच्छ भारत अभियान' सुरू करून एक चळवळ उभी केली. त्याचे फलीत म्हणजे आज देशभरात हे अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. स्वच्छता हा आरोग्याचा मंत्र असून मुंबईमध्ये सखोल स्वच्छता मोहीम अर्थात डीप क्लिन ड्राईव्हच्या माध्यमातून रस्ते साफ करणे, रस्ते झाडणे, पाण्याने रस्ते धुणे हे काम सुरू आहे. यामुळे मुंबईचे प्रदुषण खूप कमी झाले आहे. याकामी स्वच्छता कर्मचारी हाच खरा मुंबईचा हिरो असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित, १७ सप्टेंबर २०२४ ते दिनांक २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान "स्वच्छता ही सेवा अभियान २०२४" या पंधरवडा कार्यक्रमाचा शुभारंभ स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी) येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते बुधवारी करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली.

मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, प्रधान सचिव (नगर विकास) डॉ. के. एच. गोविंदराज, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. श्रीमती अश्विनी जोशी यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. उपायुक्त (परिमंडळ १) डॉ. (श्रीमती) संगीता हसनाळे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) संजोग कबरे, प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) प्रशांत तायशेटे, सहायक आयुक्त (डी विभाग) शरद उघडे, सहायक आयुक्त (ए विभाग) जयदीप मोरे यांच्यासह विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते.

या अभियानासाठी कार्यक्रमासाठी घनकचरा व्यवस्थापन विभाग, विविध प्रशासकीय विभागातील (वॉर्ड) मिळून सुमारे १ हजार कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) अंतर्गत ३ महाराष्ट्रीय बटालियनचे २५० विद्यार्थी, मारवाडी विद्यालय, जे.जे. गर्ल्स हायस्कूल, सेंट झेवियर्स स्कूल (गोरेगाव) चे विद्यार्थी तसेच विविध सामाजिक स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आजच्या स्वच्छता मोहिमेसाठी ४ डंपर, ४ जेसीबी, ३ मिनी कॉम्पॅक्टर, ४ लहान वाहने, बीच क्लिनिंग मशीन (१), बॉब कॅट मशीन आदी संयंत्रांचा वापर करण्यात आला. स्वराज्यभूमीवर राबवलेल्या या उपक्रमातून सुमारे ३० मेट्रिक टन कचरा संकलन करण्यात आले.

मुख्यमंत्री शिंदे यांनी शुभारंभ केलेले हे राज्यस्तरीय अभियान महात्मा गांधी जयंती म्हणजे २ ऑक्टोबरपर्यंत चालणार असून राज्यातील नागरी व ग्रामीण भागात 'स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. या स्वच्छता पंधरवडा मोहिमेकरिता सर्वांची भागीदारी असायला हवी, असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले. ते म्हणाले की, स्वच्छता ही सेवा अभियानाच्या उपक्रमाद्वारे आर.आर.आर. (रिड्यूस, रियूज, रिसायकल) केंद्र उभारून पर्यटन स्थळावर शुन्य कचरा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमअंतर्गत वृक्षारोपण आणि सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. त्याचबरोबर नियमित स्वच्छ न होणारी ठिकाणे शोधण्यात आली असून अशी ठिकाणे कायमस्वरूपी स्वच्छ राहतील, याकरिता त्रिसुत्री नियोजन करण्यात आले आहे. यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ झाल्यानंतर स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी) येथे मुख्यमंत्र्यांनी स्वत: स्वच्छतेची सुरूवात केली. त्यानंतर त्यांनी ट्रॅक्टर चालवून बीच क्लिनिंग मशीनद्वारे कचरा संकलन केले. त्याचबरोबर 'करूया वाईट विचार नष्ट, स्वच्छ करूया आपला महाराष्ट्र' असा संदेशही फलकावर लिहून स्वाक्षरी केली.

# देशाच्या विकासासाठी 'वन नेशन वन इलेक्शन'ची गरज - ना. रामदास आठवले

## केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुर केलेल्या वन नेशन वन इलेक्शन प्रस्तावाचे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने स्वागत

प्रतिनिधी
■ मुंबई

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय मंत्रीमंडळाने एक देश एक निवडणुक (वन नेशन वन इलेक्शन) या प्रस्तावाला आज मंजुरी दिली. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने सादर केलेल्या एक देश एक निवडणुक (वन नेशन वन इलेक्शन) या अहवालाला आज केंद्रीय मंत्रीमंडळाने स्वीकृत करुन मंजुरी दिली. केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुर केलेल्या वन नेशन वन इलेक्शन प्रस्तावाचे रिपब्लिकन पक्षाचे वतीने आपण स्वागत करीत आहोत. देशाच्या विकासासाठी वन नेशन वन इलेक्शन अर्थात एक देश एक निवडणुक ची गरज असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले आहे.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानात देशात दर 5 वर्षांनी निवडणुक झाली पाहिजे हे सुचविलेले आहे.



भक्कम लोकशाहीसाठी दर 5 वर्षांनी निवडणुक होणे आवश्यक आहे.

देशाचा विकास करतांना निवडणुकीवर वारंवार मोठा खर्च केल्याने विकास कामांमध्ये अडथळा येतो. देशाचा जोरदार विकास करण्यासाठी दर 5 वर्षांनी पंचवार्षीक निवडणुक झाली पाहिजे. यापुर्वी विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका दर 5 वर्षांनी होत असत. अलिकडच्या काळात मात्र तसे होत नाही. पण पुन्हा असे विधानसभा आणि लोकसभा निवडणुका दर 5 वर्षांनी एकत्र झाल्या तर निवडणुकांवर होणारा अमाप खर्च वाचला जाईल.त्या वधलेल्या निधीतून देशाचा विकास अधिक वेगाने होण्यास मदत होईल.त्यासाठी एक देश एक निवडणुक (वन नेशन वन इलेक्शन) ची सुरुवात आपल्या देशात झाली तर ती देशाच्या विकासासाठी चांगली राहील.

देशाच्या विकासासाठी निवडणुकीमध्ये होणारा अमाप खर्च वाचला तर तो खर्च देशाच्या विकासासाठी कारणी लावता येईल. त्यामध्ये देशाचे हित आणि फायदा आहे. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्यावतीने वन नेशन वन इलेक्शन प्रस्तावाचे आम्ही स्वागत करीत आहोत. अशी प्रतिक्रिया रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिली आहे.

# कै.जयवंत परब यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त श्रध्दांजली

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय कामगार सेना सरचिटणीस, माजी नगरसेवक कै. जयवंत परब यांच्या चौथ्या पुण्यतिथी निमित्त प्रभाग क्र 67 मधील सी स सावंत सभागृह, गणेश चौक, डी एन नगर येथे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.



त्याप्रसंगी उपस्थित समर्थ पतपेढीचे अध्यक्ष प्रकाश परब, उपाध्यक्ष प्रदीप कुडतरकर, ऍड मनोहर नायक, उपविभागप्रमुख, माजी नगरसेवक संजय पवार, अशोक जाधव, ज्योत्स्ना दिघे, अनिता बागवे, बेलापूर संपर्कप्रमुख दत्ता तांडेल, शाखासंघटक पूजा पाटील, उपशाखाप्रमुख राजू नेटके, कार्यालयप्रमुख संदीप खानविलकर, बाबाजी भोगले, मधुकर विरभद्रे, नरेंद्र चिखलीकर, सुनील परब, अविनाश बारस्कर, मनोज पोईपकर, नितीन इंदुलकर, गणपत जाधव, सुनील कमुरले, संजय परब, दिपक चव्हाण, शाम लालवाणी, सुरेश फटनानी, मीरा कांगडे, साक्षी पाटील, मंजू दर्जी, विजय खवणेकर, मनोहर खामकर, दिपक भोसले, बाळा येरुणकर, सुहासिनी सावंत, मीना जाधव व शिवसैनिक उपस्थित होते.

# जोगेश्वरी रेल्वे टर्मिनसचे काम लवकर पूर्ण करा, तसेच स्थानकावरुन लोकल सुरु करा

## खासदार रविंद्र वायकर यांच्या पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांना सुचना

प्रतिनिधी
■ मुंबई

जोगेश्वरी रेल्वे टर्मिनसचे काम लवकरात लवकर पूर्ण करून त्याचे लोकार्पण करण्यात यावे, अशी सूचना करताच हे काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असून हे काम पूर्ण झाल्यावर येथून कोकणासाठी गाड्या सोडण्याची आग्रही भुमीका मांडताच हे काम पूर्ण झाल्यावर गाडी सोडण्याचे नियोजन करण्यात येईल , असे आश्वासन पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांना बैठकीत दिले. तसेच जोगेश्वरीतील प्रवाशांच्या बऱ्याच वर्षाच्या मागणीनुसार जोगेश्वरी रेल्वे स्थानकावरून लोकल सोडण्यात यावी, याचे नियोजन करण्यात यावे, अशी सुचना ही वायकर यांनी यावेळी केली.

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या रेल्वे स्थानकाशी निगडीत प्रवाश्यांच्या समस्या सोडवण्यासाठी खासदार रविंद्र वायकर यांनी गुरुवारी जोगेश्वरी रेल्वे स्थानकावर रेल्वेच्या आधीकाऱ्यासोबत बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला माजी नगरसेवक सदानंद परब, पंकज यादव, पश्चिम रेल्वेचे डीसीम विशाल झवेरी, मालमत्ता विभागाचे राहुल चौधरी, मुंबई महानगर पालिकेच्या मार्केट विभागाचे अधीकारी पृथ्वीराज चव्हाण, धुमाळे, प्रियांका आंबोळकर, गणेश शिंदे, विभाग प्रमुख विजय धीवर, विशाल परब,मिलिंद कापडी, प्रियांका पेडणेकर, धीरज परब, आदी उपस्थित होते.

या बैठकीत खासदार वायकर यांनी रेल्वेचे ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे रेल्वे स्थानकाजवळील नवलकर मार्केटच्या पुनविकासाचे काम रखडले आहे. त्यामुळे या कामासाठी आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे, अशा सूचना त्यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्याना दिल्या. जोगेश्वरी टर्मिनसचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, टर्मिनसचे काम पूर्ण झाल्यावर येथून कोकण रेल्वे साठी गाड्या सोडण्यात याव्यात. जोगेश्वरी रेल्वे स्थानकावरून लोकल सोडण्यात यावी, रेल्वे स्थानकावरील साफ् सफाईला प्राधान्य द्यावे, जोगेश्वरी रेल्वे स्थानकावरील लिफ्ट बसवण्याचे काम लवकर पूर्ण करावे, सुभाष नगर तसेच जवाहर नगर येथे सरकते जिने बसवण्यात यावे, आंबोली पूर्व-पश्चिम पादचारी पुल उभारण्यात यावा, जोगेश्वरी रेल्वे स्थानकावर सी.सी कॅमेरा बसवण्यात यावा, १०८ नंबरची रुग्नवाहीका रेल्वे स्थानकाजवळ ठेवण्यात यावी, रेल्वे स्थानकावर वैद्यकीय सेवा सुरु करावी, स्थानकावरील स्वच्छता गृह साफ ठेवण्यात यावे, रेल्वेच्या मोकळ्या जागेचे सुशोभीकरण करण्यात यावे, रेल्वेच्या अखत्यारातील गटाराची लाईन सातत्याने भरलेली असते. ती वेळोवेळी साफ करण्यात यावी, आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सुचनाही खासदार वायकर यांनी यावेळी रेल्वेचे आधीकारी यांना केल्या.

# शनिवार व रविवारच्या मध्यरात्री मध्य रेल्वेवर ट्रॅफिक आणि पॉवरब्लॉक

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेच्यावतीने २१ व २२.०९.२०२४ च्या मध्यरात्री ठाणे स्टेशनवर पादचारी पूल गर्डर्स डी-लाँच करण्यासाठी ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. हा पॉवर ब्लॉक रात्री २२.३० ते ०४.३० वाजता - (०६.०० तास) अप आणि डाऊन ट्रान्स-हार्बर मार्ग आणि सहाव्या मार्गावर असणार आहे. त्यामुळे अप आणि डाऊन ट्रान्स-हार्बर मार्ग: कोपर खैरणे (प्लॅटफॉर्म वगळून) ते ठाणे (प्लॅटफॉर्मसह) सहाव्या मार्गावर: दिवा ते मुलुंड (क्रॉसओव्हर वगळून) रेल्वे वाहतुकीवर परिणाम होणार आहे.

ब्लॉकमुळे अप मेल/एक्स्प्रेस गाड्यांचे डायव्हर्शन करण्यात येणार आहे.सहाव्या मार्गावर चालणाऱ्या खालील मेल/एक्स्प्रेस गाड्या कल्याण/दिवा ते मुलुंड/ विद्याविहार स्थानकांदरम्यान अप जलद मार्गावर वळवण्यात येतील. बाहेरगावी कामायनी एक्स्प्रेस , मडगाव- लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस मडगाव- मुंबई जनशताब्दी एक्स्प्रेस, गोरखपूर- लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस, मडगाव- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तेजस एक्स्प्रेस गोरखपूर - मुंबई कुशीनगर एक्स्प्रेस , जयनगर- लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस, भुवनेश्वर - मुंबई कोणार्क एक्स्प्रेस, शालीमार- लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस, विशाखापट्टणम - लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस गोरखपूर - लोकमान्य टिळक टर्मिनस अतिजलद एक्स्प्रेस या लांब पल्ल्यांच्या गड्यांवरही परिणाम होणार आहे.

ठाणे येथून २२.०१ ते ००.०५ वाजेपर्यंत वाशी/पनवेल करीता सुटणाऱ्या उपनगरीय सेवा आणि ठाणे करीता वाशी येथून २१.३७ ते पनवेल येथून २३.१८ वाजेपर्यंत जाणाऱ्या उपनगरीय सेवा रद्द राहतील.


## यादव समाज नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

नोंदणी क्रमांक- मुंबई/ डब्ल्यू (एफ् एस् ) क्रेडीट/ ४५२/८४-८५
**मुख्य कार्यालय :** २७४/१, मिनर्व्हा बिल्डींग, माधवदास पास्ता मार्ग, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४.

### ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

या सूचनेद्वारे यादव समाज नागरी सहकारी पतपेढीच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, यादव समाज नागरी सहकारी पतपेढीची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता वनिता विकास मंडळ (मराठी हायस्कूल), प्लॉट नं. २७९, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ४०० ०७५ येथे घेण्यात येणार आहे. कृपया पतपेढीच्या सर्व सभासदांनी या सभेला वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती .

**सभासदांनी कृपया खालील सूचनांची नोंद घ्यावी.**

१. ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पतपेढीच्या दादर व ठाणे शाखेच्या कार्यालयात सूचना फलकावर लावण्यात आली आहे.
२. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचा पतपेढीचा ४० वा वार्षिक अहवाल छापण्यात आला असून तो पतपेढीच्या दादर येथील कार्यालयातून सकाळी ११.०० ते १.०० व दुपारी २.०० ते ७.०० या वेळेत तसेच ठाणे शाखेच्या कार्यालयातून कार्यालयीन वेळेत सभासदांनी घेऊन जावा.
३. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात १०वी, १२वी व पदवी व डिप्लोमा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेच्या छायांकित पत्रिकेसह दि. २६.०९.२०२४ पर्यंत पतपेढीच्या मुंबई व ठाणे येथील कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज आणून द्यावेत. या विद्यार्थ्यांना दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी घाटकोपर पूर्व येथे होणा-या वार्षिक सर्वसाधारण सभेत रोख पारितोषिक देण्यात येईल.

**विशेष सूचना : सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतपेढीचा वार्षिक अहवाल पोष्टाने (टपालाद्वारे) पाठविण्यात येणार नाही तरी सर्व सभासदांनी पतपेढीच्या कार्यालयीन वेळेत येऊन घेऊन जावा हि विनंती.**

**दिनांक : २९.०७.२०२४**
**यादव समाज पतपेढीच्या संचालक मंडळाच्यावतीने**

**सही /-**
**श्री. चंद्रकांत रामचंद्र तांबडे**
**सरचिटणीस**



## सिडको
शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व. श्री.अनिल केशव घरत व इतर ३४, राहणार – शेलघर, गव्हाण, ता. पनवेल. जि. रायगड –४१०२१६(अर्जदार)

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. सतनाम बिल्डर्स व डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) गिरीष मुरलीधर मट्टा २) हर्ष गिरीश मट्टा ३) श्रीलक्ष्मी सुपेरिअर होम्स एलएलपी तर्फे भागीदार श्री. हर्ष गिरीश मट्टा ४) महेश भजनलाल मट्टा** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३५३३ | १०.०९.२०२४ | पुष्पक नोड | २६ | ३५१ | ३१००चौ.मी. पैकी १५५० चौ.मी. | १३.०८.२०२४ | २१.०८.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)
सिडको/जनसंपर्क/२३३/२०२४-२५

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in



## महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

### सुचना-एसआरएम-३९

खालील निविदा https://eprocurement.mahagenco.in वर प्रकाशित केल्या आहेत.

| अ. क्र. | ई–निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ६६०मेगावॅट/ओएस/ टी–३९७/आरएफएक्स– ३००००५१७३४ | कोराडी, टीपीएस, कोराडी येथील ६६० मेगावॅट युनिट ८, ९ व १० मध्ये आऊटडोअर प्लान्टचे क्लीनिंग/हाऊसकीपिंग व संबंधित सेवांकरिता द्वैवार्षिक कंत्राट. | रु. १९८,१७२.८३ / रु. १९,४६७,२८३.२० |
| २ | ६६०मेगावॅट/डब्ल्युटीपी/ टी–३९८/आरएफएक्स – ३००००५१७३८ | ३x६६० मेगावॅट, केटीपीएस,कोराडी येथे डीएम प्लान्टकरिता ॲक्टिव्हेटेड कार्बनचा पुरवठा. | रु. १९,१७०.०० / रु. १,५६७,०१०.०० |
| ३ | ६६०मेगावॅट/डब्ल्युटीपी/ टी–३९९/आरएफएक्स– ३००००५१७२६ | ३x६६० मेगावॅट, केटीपीएस,कोराडी येथील डीएम प्लान्टच्या आयोन एक्सचेंज व्हेसल्सचे परीक्षण व देखभालीकरिता कार्यकंत्राट. | रु. ९,७२३.६९ / रु. ६२२,३६९.४४ |
| ४ | ६६०मेगावॅट/बीएम/ टी–४००/आरएफएक्स– ३००००५१३०२ | ई–टेंडरिंगच्या माध्यमातून केटीपीएस, कोराडी येथे कोल मिल पॅकेज नूतनीकरणा दरम्यान युनिट ८, ९ व १० (६६० मेगावॅट) येथे बसवण्यात आलेल्या ३० टन क्षमतेच्या कोल मिल हॉइस्ट/ईओटी क्रेन्सचे चालू कामात बिघाड दुरुस्ती करिता पूणवेळ सेवा अधिकारी पुरविण्याचे कार्य. | रु. ८,५२०.०० / रु. ५०१,९८४.०० |
| ५ | ६६०मेगावॅट/सीएचपी/ टी–४०१/आरएफएक्स– ३००००५१६१६ | ३ x ६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे स्टॅकर रिक्लेमर –१ चे स्लू बेअरिंग बदलणे आणि बॅलेन्सिंग करण्याचे कार्य कंत्राट. | रु. ६३,२००.०० / रु. ५,९६९,९९९.०० |
| ६ | ६६०मेगावॅट/सीएचपी/ टी–४०२/आरएफएक्स– ३००००५१८२४ | सीएचपी, ३ x ६६० मेगावॅट, केटीपीएस,कोराडी येथे ड्राइव्ह शाफ्टसमवेत ट्रिपर ट्रॉली गीयर बॉक्सची दुरुस्ती व रिव्हॅम्पिंगचे कार्य. | रु. १२,५००.०० / रु. ९००,०००.०० |

ई–निविदेसाठी विक्रेत्यांना त्यांच्या संस्थेची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशिलासाठी संकेतस्थळावर लॉग ऑन करा.
कोणत्याही प्रश्नांकरीता संपर्क साधावा: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: +९१–८४११९५८६२२, ई–मेल आयडी: eepurchasekoradi@mahagenco.in

हस्ता/–
मुख्य अभियंता (ओ ॲण्ड एम)
महानिर्मिती, केटीपीएस, कोराडी.



## Hinduja Housing Finance Limited

**कॉर्पोरेट कार्यालय:** क्र. १६७-१६९, अण्णा सलाई, सैदपेट, चेन्नई – ६०००१६. तमिळनाडू
**शाखा कार्यालय:** बी-२०९, एव्हरेस्ट सी.एच.एस.एल., साई नगर, अंबाडी रोड, वसई पश्चिम, महाराष्ट्र – ४०१२०२

**प्राधिकृत अधिकारी संपर्क क्र.**

(१) श्री. सौरभ कुमार नापित (आरएलएम) ७८७४८२८७८९ ई-मेल: saurabhkumar@hindujahousingfinance.com
(२) श्री. बंटी रामराखियानी (आरआरएम) ९०२९००४७०१ ई-मेल: bunty.ramrakhiyani@@hindujahousingfinance.com
(३) श्री. रोहित ब्रह्मणे (सीएलएम) ८७९३७८१६४७ ई-मेल: rohitramesh@@hindujahousingfinance.com
(४) श्री. वरून प्रकाश (सीएलएम) ९००४९१९३९३ ई-मेल: varunuday@@hindujahousingfinance.com
(५) श्री. अमोल वाकोडे (सीएलएम) ८१६९७६७६१३ ई-मेल: amoluttamrao@@hindujahousingfinance.com
(६) श्री. सुनील बाथम (सीआरएम) ९८१९७३११७१ ई-मेल: sunil@hindujahousingfinance.com
(७) श्री. अनिष कुमार (सीआरएम) ८२०९९८११६४ ई-मेल: anishkumar.r@@hindujahousingfinance.com

### जोडपत्र IV ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या अंतर्गत हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (एचएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कंपनीच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांच्याद्वारे खाली नमूद कर्जदार/ हमीदार ह्यांना नमूद सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्यासाठी मागणी सूचना जारी करण्यात अली होती. कर्जदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना ह्याद्वारे कर्जदार/ हमीदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे देण्यात येत आहे की येथे खाली वर्णन करण्यात मालमत्तेच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ च्या पोट कलम (४) अंतर्गत त्याना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून ताबा घेतला आहे. सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात नमूद कायद्याच्या कलम १३ च्या पोट कलम (८) अंतर्गत असलेल्या तरतुदीकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे. विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यत येत आहे की मालमत्तांशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार झाला असल्यास व्याजासह येथे खाली नमूद रकमेचा एचएचएफएल ह्यांच्याकडे भरणा करण्यासाठी बाध्य असतील.

| कर्जदार / हमीदाराचे नाव | कर्ज खाते क्रमांक | सुरक्षित मालमत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता) | मागणी सूचना दिनांक आणि रक्कम | ताब्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| श्रीमती विनायकी ईमॅन्युअल (कर्जदार) आणि श्री ह्यगीन अल्मेडा (सह-कर्जदार) | एमएच/एमयूएम/ व्हीएसव्हीआर/ ए ००००००५२८ | सदनिका क्र. २०६, इमारत क्र. २, ए विंग, इमारतीचे नाव: आरोही मिठीला कॉम्प्लेक्स, गट क्र. ६६/२, गाव कापसे सफाळे पश्चिम पालघर मेट्रो मुंबई, महाराष्ट्र, भारत – ४०११०२. गाव/ मौजे: कापसे, प्लॉट क्र. सर्वे क्र. ६६, हिस्सा क्र. २ सब-रजिस्ट्री + जिल्हा पालघर. इमारतीमधील अपार्टमेंट/ सदनिका. विक्री करारानुसार उपलब्ध सीमा: उत्तर: दामोदर लक्ष्मण वेडगा ह्यांची जमीन; दक्षिण: हेमलता हरीश्चंद्र घरत ह्यांची जमीन; पूर्व: दामोदर लक्ष्मण वेडगा आणि प्रकाश गोविंद पाटील ह्यांची जमीन; पश्चिम: रवींद्र विष्णू काटकर ह्यांची जमीन. | रु. १२,२५,४९०/- (रुपये बारा लक्ष पंचवीस हजार चारशे नव्वद मात्र) करीता ०७.०५.२०२४ | १४.०९.२०२४ |
| श्री. अरुसेल्वन मुरुगेसन (कर्जदार) आणि श्रीमती आनंदी मुरुगेशन (सह-कर्जदार) | एमएच/एमयूएम/ व्हीआयआरए/ ए००००००३५६ | सदनिका क्र. १०१, पहिला मजला, श्री गणेश अपार्टमेंट, डेरावली, पनवेल, रायगड पनवेल, महाराष्ट्र ४१०२२१. | रु. १८,८९,७४५/- रुपये अठरा लक्ष एकूणनव्वद हजार सातशे पंचेचाळीस मात्र) २०.०४.२०२४ करीता | १८.०९.२०२४ |
| श्री. संतोष तिवारी (कर्जदार) आणि श्रीमती नीतू तिवारी (सह-कर्जदार) | एमएच/एमयूएम/ व्हीआयआरए/ ए००००००१२९ | उप निबंधक, ठाणे ह्यांच्या अधिकारक्षेत्रामधील गाव आदिवली-ढोकाळी, ता. अंबरनाथ सदनिका क्र. जी १, तळ मजला, शिवगंगा पार्ट, बी विंग, उल्हासनगर ३ ठाणे सदनिका मोजमाप ४२२ चौ. फू. (महापालिका प्रभाग क्र. २६, खाता क्र. १४२०) एस आर क्रमांक: ११, हिस्सा क्र. ३५/१, मोजमाप साधारणपणे ६०० चौ. मी. पैकी ६०० चौ. मी. आणि राहणर: यू. एन क्र. २४४ (पार्ट) शीट क्र. २३, उल्हासनगर ३ जिल्हा ठाणे ४२१००२. हे इमारतीमधील अपार्टमेंट/ सदनिका आहे. बी विंगच्या सीमा पुढील प्रमाणे: पूर्वेस किंवा त्या दिशेने: पंजाब कॉलनी, पश्चिमेस किंवा त्या दिशेने: शिवगंगा ए विंग, उत्तरेस किंवा त्या दिशेने: हॉस्पिटल क्षेत्र, पंचायती हॉल, दक्षिणेस किंवा त्या दिशेने: मोहन प्लास्टिक बंगलो, सर्व हक्कांसह बांधलेली इमारत आणि जोडण्या | रु. २९,०८,७८७/- (रुपये एकोणतीस लक्ष आठ हजार सातशे सत्त्याऐंशी मात्र) करीता २८.०८.२०२३ | १७.०९.२०२४ |
| श्री. प्रताप रामण्णा शेट्टी (कर्जदार) आणि रामण्णा शेट्टी (सह-कर्जदार) | एमएच/एमयूएम/ केएलव्हायएन/ ए००००००२५८ | गाव मोरबी पोस्ट खारघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, नवी मुंबई येथे वसलेल्या इमारत साई सदन आणि श्री साई बाबा कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. घर मालमत्ता क्र. १३८७ आणि १३९१, तिसऱ्या मजल्यावरील ४३३ चौ. फू. मोजमाप असलेल्या सदनिका क्र. ए ३०२ चा सर्व खंड आणि भूखंड सीमा: उत्तर: इमारत, पूर्व: इमारत, पश्चिम: अंतर्गत रोड, दक्षिण: अंतर्गत रोड, सर्व हक्कांसह बांधलेली इमारत आणि जोडण्या | रु. २३,५८,५३६/- (रुपये तेवीस लक्ष अठ्ठावन्न हजार पाचशे छत्तीस मात्र) करीता ०९.०८.२०२१ | १८.०९.२०२४ |
| श्री. सुधीर तिवले (कर्जदार) आणि श्री. पोपट तिवले (सह-कर्जदार) आणि श्रीमती अनिता तिवले (सह-कर्जदार) | एमएच/एमयूएम/ केएलव्हायएन/ ए०००००००७९ आणि एमएच/ एमयूएम/ केएलव्हायएन/ ए००००००७७३ | सेक्टर ११, कामोठे, नवी मुंबई ता. पनवेल, जिल्हा रायगड मधील प्लॉट क्र. ३८ वरील पंचशील कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. च्या चौथ्या मजल्यावरील ३७.०१ चौ. मी. चटई क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. ए ४०३ चा सर्व खंड आणि भूखंड. सर्व हक्कांसह बांधलेली इमारत आणि जोडण्या | रु. २३,३२,०५६/- (रुपये तेवीस लक्ष बत्तीस हजार छपन्न मात्र) करीता २९.१२.२०२२ | १९.०९.२०२४ |
| श्री. दशरथ तातले (कर्जदार) आणि श्रीमती संगीता तातले (सह-कर्जदार) | एमएच/एमयूएम/ बीपीयूआर/ ए०००००००७५ | ग्रामपंचायत चिर्पोली-बामणे, हद्दीमधील जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. गट क्र. १२७, १३६, प्लॉट क्र. १० चा सर्व खंड आणि भूखंड. सदनिका मोजमाप ७०० चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ. सदनिका क्र. २०४, २ रा मजला, सिद्धी अपार्टमेंट, प्लॉट क्र. १० चिर्पोली शहापूर जिल्हा ठाणे ४२१६०१ | रु. १८,०५,४०२/- (रुपये अठरा लक्ष पाच हजार चारशे पाच मात्र) करीता २५.०९.२०२४ | १७.०९.२०२४ |

**कर्जदार/ हमीदार ह्यांना संवैधानिक सूचना**
कर्जदार/हमीनदारांना याद्वारे सावधगिरी बाळगली जाते की सार्वजनिक लिलाव/निविदांद्वारे मालमत्ता यापुढे कधीही विकली जाऊ शकते आणि म्हणून ही सुरक्षा नियम ६, ८ आणि ९ अंतर्गत नोटीस म्हणून देखील मानली जाऊ शकते ( व्याज) अंमलबजावणी नियम, २००२. तपशीलवार यादी आणि पंचनामा असू शकत नाही अशा मालमत्तेचे छायाचित्रण केले गेले आहे म्हणून अडथळ्यांमुळे रेकॉर्ड केले गेले.

**दिनांक: २०.०९.२०२४**
**ठिकाण: कल्याण**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाऊसिंग फायनांस लिमिटेड**

मनुष्य स्वभावत: कितीही चांगला असला तरी शिक्षणाने त्याच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय देशाची प्रगती होत नाही.



- लोकमान्य टिळक

वृत्तमानस
मुंबई, शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४

# महायुती-महाविकास आघाडीची कसोटी...

सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. अद्यापि ही निवडणूक जाहीर झालेली नसली तरी ती अंदाजे कधी होणार याची कल्पना सत्ताधारी आणि विरोधकांना असल्याने ते आपापल्या परीने कामाला लागले आहेत. हे निवडणूक लोकसभेप्रमाणेच महायुतीला म्हणजेच सत्ताधाऱ्यांना सोपे जाईल असे वाटत नाही. तर ती विरोधक म्हणजेच महाविकास आघाडीला सत्तेवर बसवेल याचीही गॅरंटी देता येत नाही. त्यामुळेच हे निवडणूक महा विकास आघाडी विरुद्ध महायुती अशी अत्यंत चुरशीची ठरणार हे मात्र नक्की. कारण भाजप आणि त्याच्यासोबत असलेल्या इतर घटक पक्षांनी लोकसभेमध्ये 400 पारची गॅरंटी दिली होती. मात्र तो आपला विश्वाशी आकडा त्यांना गाठचा आला नाही. यामुळे महायुतीमध्ये काहीशी भीती तर महाविकास आघाडीमध्ये काहीसा उत्साह संचारला आहे हेही नाकारू चालणार नाही. त्यामुळे विधानसभेची निवडणूक दोघांनाही टफ जाणार आहे हे नक्की. त्यामुळेच महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्व पक्ष आपापल्या पद्धतीने कामाला लागले आहेत. या परिस्थितीचा फायदा घेत आपल्या पक्षाला जास्त कसा फायदा होईल याचे खेळ रचले जात आहे. त्यामुळेच ते स्ट्राइक रेट वर आले आहेत. राज्यात कोणाचा स्ट्राइक रेट जास्त आहे त्याच्या वाटूयाला जास्त जागा असा हा ढोबळ प्लॅन आहे. अर्थात तो महायुती मध्येही आहे आणि महाविकास आघाडीमध्ये देखील. या स्ट्राईक रेटमध्ये महायुतीतील भाजप आणि महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे यांना शिवसेनेची तारेवरची कसरत करावी लागणार आहे. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस आणि शरद पवार राष्ट्रवादी यांनाही या कसरतीमध्ये भाग घ्यावा लागणार आहे. राज्याचा पुढील मुख्यमंत्री कोण हे जर ठरवायचे असेल तर त्यासाठी या पक्षांना आत्ताच रणरीती आखावी लागणार आहे. म्हणजेच आपल्या पार्टीला जास्त जागा घेऊन त्या निवडून देखील आणाव्या लागणार आहेत. तीच परिस्थिती महायुतीची देखील असणार आहेत. येथेही भाजपला एकनाथ शिंदे यांचे शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत काथ्या कूट करून जागांचे वाटप करावे लागणार आहे. म्हणूनच कोणाचा स्ट्राईक रेट किती याला महत्त्व आले आहे. महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा कोणताही तिढा नसून लोकसभा निवडणुकीत ज्याचा स्ट्राइक रेट जास्त होता त्याच पक्षाला जास्त जागा, हे जागावाटपाचे सूत्र असेल आणि जिंकून येण्याची क्षमता हा निकषसुद्धा असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्यामुळे महायुतीतील जागावाटपाचे सूत्र जरी समोर आले असले, तरी त्यामुळे राजकीय वादविवाद आणि गोंधळ होणे अपरिहार्य मानावे लागेल. कारण एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केल्यानंतर अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसनेही तातडीने बैठक घेऊन काही चर्चा केल्याचे समजते. लोकसभा निवडणुकीतील यशाच्या फॉर्म्युल्यावर जर विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटप करायचे ठरले, तर त्यामध्ये अजित पवार यांना खूपच कमी जागा मिळू शकतात, याची जाणीव अजित पवार यांनाही आहे. कारण लोकसभेमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पाच जागा लढवल्या. त्यापैकी फक्त एक जागा निवडून आली होती आणि त्यांचा स्ट्राइक रेट फक्त 20 टक्के होता. भाजपने 28 जागा लढवल्या होत्या आणि त्यांच्या फक्त नऊ जागा निवडून आल्या होत्या, तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने 15 जागा लढवल्या होत्या आणि त्यांचे सात उमेदवार विजयी झाले होते. साहजिकच स्ट्राइक रेटचा विचार करता सर्वात जास्त स्ट्राइक रेट हा एकनाथ शिंदे यांच्याच पक्षाचा आहे. त्या खालोखाल भाजपचा आणि सर्वात कमी स्ट्राइक रेट हा अजित पवार यांच्या पक्षाचा आहे. अर्थात, हा निकष वापरून विधानसभेतील उमेदवार ठरवता येणार नाही, हे लक्षात आल्यानेच संबंधित उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमताही तपासली जाणार आहे. विविध प्रकारच्या पक्ष फुटींमुळे स्थानिक पातळीवरील राजकारण ढवळून निघाले आहे ते पाहता उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमता ठरवणेसुद्धा अवघड जाणार आहे. कारण मुळात एखादा उमेदवार सध्या कोणत्या पक्षाशी निष्ठावान आहे हे ठरवणेसुद्धा अवघड झाले आहे. जेव्हा महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि महायुती अशा दोनच आघाड्या समोरासमोर निवडणूक लढवत होते तेव्हा उमेदवारांचा विचार करत असताना कोणतीही अडचण येत नसे. जागावाटप झाल्याप्रमाणे जो तो पक्ष आपल्या उमेदवाराला तिकीट देत असे. पण आता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांमध्ये फूट पडल्याने स्थानिक पातळीवरसुद्धा आपोआपच तेवढ्या प्रमाणात गट निर्माण झाले आहेत. या ठिकाणी जो आमदार गेल्या निवडणुकीत निवडून आला होता त्याला तिकीट द्यायचे ठरवले तर तो आमदार सध्या कोणत्या गटाची बांधिलकी मानत आहे हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. साहजिकच दुसऱ्या गटाला आपला उमेदवार शोधण्यासाठी पुन्हा एकदा निवडून येण्याची क्षमता तपासून पहावी लागणार आहे. अर्थात, प्रत्यक्ष जागावाटप झाल्यानंतर या गोष्टी समोर येणार आहेत. पण त्यापूर्वीच एकनाथ शिंदे यांनी हा स्ट्राइक रेटचा मुद्दा मांडल्यामुळे 288 जागांचे वाटप करत असताना स्ट्राइक रेटचे गणित कसे मांडणार हासुद्धा कळीचा मुद्दा ठरणार आहे. 288 पैकी निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे दीडशेपेक्षा जास्त जागा लढवण्यावर भाजप ठाम आहे, तर अजित पवार यांनी पूर्वीपासून आम्हाला 80 जागा हव्यात असे म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांनीसुद्धा आम्हाला 100 पेक्षा जास्त जागांची अपेक्षा आहे, असे सूचित केले आहे. या सर्व अपेक्षांची एकूण बेरीज 288 या आकड्यामध्ये बसत नसल्यानेच स्ट्राइक रेटच्या आधारे जागावाटपाचे सूत्र ठरवताना अनेक अडचणी निर्माण होणार आहेत. लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणूक यातील प्रचाराचे विषय आणि प्राधान्यक्रमही वेगवेगळे असल्याने लोकसभा निवडणुकीतील विजयाच्या आधारे विधानसभा निवडणुकीचा उमेदवार ठरवण्याचा निकष कदाचित चुकूही शकतो. एका लोकसभा मतदारसंघामध्ये पाच ते सहा आमदार असल्यामुळे प्रत्येक मतदारसंघाची बांधणी आणि विचारसरणी वेगळ्या प्रकारे असते. जरी एखाद्या मतदारसंघात एका पक्षाचा खासदार निवडून आला तरी त्या मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघात त्या खासदाराने विजयी आघाडी घेतली असेल, असे सांगता येत नाही. प्रत्येक पक्षाचा गड आणि बालेकिल्ला ठरला असतो. विधानसभा निवडणुकीत हा गड आणि बालेकिल्ला राखण्याचा जास्त प्रयत्न केला जातो. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीची गणिते अशी वेगळी असल्याने केवळ स्ट्राइक रेट न तपासता लोकसभा निवडणुकीत संबंधित विधानसभा मतदारसंघांमध्ये कोणत्या पक्षाने चांगली कामगिरी केली हे ठरवून त्या आधारे जागावाटप करणे जास्त शास्त्रीय ठरू शकते. वाटाघाटीमध्ये आपली 'बार्गेनिंग पॉवर' वाढवण्यासाठी राजकीय नेते अशा प्रकारची विधाने करत असतात. महायुतीच्या नेत्यांनी लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे निश्चितच धडा घेतला आहे. त्यामुळे फारसे ताणून धरण्याच्या मनस्थितीत आणि परिस्थितीत कोणताही पक्ष नाही. महायुती एकत्र उभी राहिली तरच पुन्हा सत्ता मिळू शकते याची जाणीव सर्व नेत्यांना आहे. त्यामुळे येत्या काही कालावधीमध्ये जागावाटपाचे खरे सूत्र निश्चित होऊन जागावाटप अंतिम केले जाईल; पण विधानसभा निवडणुकीत जर विजय मिळवायचा असेल आणि पुन्हा सत्तेवर यायचे असेल तर उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमता हा सर्वात महत्त्वाचा निकष असेल. कारण स्ट्राइक रेट हा शब्द क्रिकेटमधून आला आहे आणि क्रिकेटमध्ये कसोटी, एकदिवसीय आणि टी20 सामने या प्रत्येक प्रकारात एकाच खेळाडूचा स्ट्राइक रेट वेगळा असतो. लोकसभा निवडणुकीचा स्ट्राइक रेट विधानसभा निवडणुकीत वापरला तर तो यशस्वी होईलच याची कोणतीही खात्री देता येत नाही. म्हणूनच या निवडणुकीत महायुती महाविकास आघाडीमध्ये खरा कसोटीचा सामना राहणार आहे.

# श्राद्धपक्ष, पुनर्जन्म, पिंड, कावळा... प्रश्नोत्तरे !

मकरंद करंदीकर
makarandsk@gmail.com

मी हे जे काही लिहितो आहे ते, ज्यांना काही करायचेच आहे पण कर्मकांडे आणि अन्य गोष्टींबद्दल गोंधळ आहे त्यांच्यासाठी आहे. ज्यांचा यावर विश्वास नाही त्यांच्या मताचाही आदर आहे. एकदा पितृपंधरवडा सुरु झाला की या विषयावर बरीच चर्चा वाचायला मिळते. त्यात ही सगळी अंधश्रद्धा, कुजकट शेरेबाजी, आपण किती पुरोगामी आहोत हे हिरीरीने मांडण्यासाठी अनेक लेख, पोस्ट्स, व्यंगचित्रे यांचा भडीमार असतो. पितरांप्रती आदर व्यक्त करण्याच्या प्रथा तर सगळ्याच धर्मांमध्ये आहेत आणि त्या त्या धर्मातील बहुतेक सर्वजण त्या पाळतात. पण याची थट्टा, टवाळी फक्त हिंदू धर्मातच होते.

उत्सुकतेपोटी केलेला माझा या विषयाचा थोडा अभ्यास, काही चांगल्या जाणकारांचे मार्गदर्शन, स्वतःला आलेले अनेक अनुभव यावरून अनेक निष्कर्ष काढता आले आणि ते माझ्या अनेक प्रश्नांना आणि शंकांना खुपसे अचूक उत्तर देणारे आहेत. मी यापूर्वीही या विषयी लिहिले आहे. पण पितृपक्ष आला की गोंधळात टाकणारे लेख पुन्हा पुन्हा येऊ लागतात. माध्यमांमधून हिंदू धर्माच्या टवाळक्या सुरु होतात. त्याच्या खुलाशासाठी काही मुद्द्यांची वार्षिक पुनरावृत्ती तर कांही नवीन माहिती देण्याचा हा प्रयत्न आहे.

१) मृत्यूनंतरचे जीवन आणि मोक्षाची जी संकल्पना, हिंदू धर्मामध्ये मांडलेली आहे तशी अन्य कुठल्याही संस्कृतीत इतक्या परिपूर्णपणे मांडलेली नाही. मात्र यासाठी हिंदू धर्मामध्येच हजारो वर्षे प्रचलित असलेल्या पुनर्जन्म, कर्म सिद्धांत, पंचमहाभूतांनी बनलेला मनुष्य देह, यासारख्या गोष्टी एकदा समजल्या तर मग जन्ममृत्यू साखळीतील एकही गोष्ट अगम्य रहात नाही. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ चार्ल्स डार्विन यांच्या उत्क्रांतीवादाच्या शोधाच्या हजारो वर्षे आधी हिंदू धर्मातील उत्क्रांतीचे तत्वज्ञान हेच सांगते आहे. अगदी ढोबळमानाने एखाद्या एकपेशीय जीवापासून अनेकदा बदल होत होत सजीव तयार झाले असा थोडक्यात सिद्धांत ! हिंदू धर्मातील तत्वज्ञान काय सांगते ? सप्तपाताळ, मानवलोक आणि सप्तस्वर्ग हे काय आहे ? लक्ष चौऱ्यांशी जन्मांनंतर मनुष्य जन्म लाभतो, म्हणजे काय ? डार्विनला फक्त देहाचीच उत्क्रांती सांगता आली. हिंदू धर्मात देहाबरोबरच त्याचे पूर्वकर्मफल, पापपुण्य अशा अनेक गोष्टींचा एकत्रित विचार केलेला आहे. विज्ञानाला मनुष्य जन्मापर्यंतच उत्क्रांती सांगता आली आहे. पण आपल्या धर्माने मात्र पुढे भू, भुव, महा, जन , तप आणि सत्य लोक / स्तर असे नंतरच्या उत्क्रांतीचे टप्पेही सांगितलेले आहेत. तेथील कामकाजाची माहिती दिली आहे. माणसाच्या मृत्यूनंतर त्याचा देह (कोष) गळून पडला तरीही प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, ज्ञानमय हे कोष तसेच राहून पुढे प्रगती करतात. मनुष्यदेहातील पाणी, वायू, अग्नी, आकाश या सर्व ऊर्जा (energy ) असल्याने law of indestructibility of energy नुसार त्या नष्ट न होता अनंतात विलीन होतात म्हणजे एका मोठ्या कोषात ( Universal Reservoir ) खेचल्या जातात. शरीराचे material जळून ते अन्य अनेक materials मध्ये रूपांतरित होते.

२) आपण नेहेमी ऐकतो की " विज्ञानाची इतकी प्रगती झाली आहे की आता माणसाची पावले चंद्रावरसुद्धा उमटली "! वगैरे .. पण एक अतिशय महत्वाची गोष्ट आपण विसरतो. माणसाचे चंद्राला पाय जरी लागले तरी त्या चंद्रामुळे पृथ्वीवर येणारी भरती आणि ओहोटी बंद झालेली नाही. त्याचा आपल्यावर होणारा परिणाम बदललेला नाही.

३ ) माणसाचा देह हे जरी मटेरियल असले तरी आत्मा ही नष्ट न होणारी शक्ती आहे. येथे एक महत्वाची गोष्ट अशी की या शक्तीवर एक किंवा अनेक जन्मांमधून तयार झालेल्या आसक्ती, भावभावना, इच्छा यांचे संस्कार झालेले असतात. हिंदू तत्वज्ञानानुसार जिवंत माणूस हा त्याच्या, देह सोडून गेलेल्या पूर्वजांच्या आत्म्यांच्या साखळीचाच एक भाग असतो.

४ ) अत्यंत महत्वाची गोष्ट - जिवंत असतांना अनेकदा माणसाच्या देहाच्या आकाराच्या प्रमाणात त्याला कमी अधिक अन्न लागते. देह सोडल्यावर आत्म्याला अन्नाचा केवळ वास पुरेसा असतो. त्यामुळे तेथे क्वांटिटीचा संबंध नसतो. पदार्थांच्या वासानेच तो तृप्त होतो. म्हणूनच आत्म्याला ठेवल्या जाणाऱ्या जेवणाच्या पानावर वासापुरते थोडे थोडे अन्न वाढले जाते. त्याचप्रमाणे त्या आत्म्याला अन्नातील नक्की कुठला रस आवडेल याची कल्पना नसल्याने चवीच्या




सर्व रसांचे म्हणजे- कडू, गोड, तिखट, खारट, तुरट आणि आंबट अशा सर्व चवीचे पदार्थ श्राद्धाला केले जातात. उदा - कारल्याची भाजी, आवळ्याची-आमसुलाची चटणी, लाडू- खीर, वडे, गवार - भोपळ्याची भाजी इत्यादी. तीव्र मधुमेह असलेल्या माणसाने जिवंतपणी गोड खाणे पूर्ण बंद केले असले तरी त्याच्या मृत्युनंतर, त्याला ते बंधन पाळायची गरज नसते. मधुमेह शरीराला होतो,आत्म्याला नाही.

५ ) आणखी एक महत्वाची गोष्ट अशी आहे की आपल्या शास्त्रात पितरांच्या ३ पिढ्यांना आवाहन केले जाते. त्याबरोबरच कुटुंबातील त्या आधीच्याही मोक्ष / मुक्ती / सद्गती न मिळलेल्यांना, ज्यांच्यावर रीतसर दहनसंस्कार होऊ शकले नाहीत अशांना, गर्भातच मरण पावलेल्यांना, तसेच विविध अवस्थेत मृत पावलेल्यांना अन्न / पिंड दिले जातात. शस्त्राघाताने मृत्यू आलेल्या, घातपाताने मरण आलेल्या, संन्यास घेतलेल्या इत्यादी पूर्वजांसाठी करायच्या श्राद्धासाठी विशिष्ट दिवस राखून ठेवण्यात आले आहेत.

६ ) श्राद्धासाठी जर जाणकार पुरोहित मिळाला नाही, जेवणासाठी शात्रोक्तपणे पदार्थ करता आले नाहीत, सगळे धार्मिक विधी करणे शक्य झाले नाही, कुठल्याही कारणामुळे परवडत नाही असे असेल तरी अत्यंत श्रद्धेने अर्पण केलेला, जो जमेल, जसा जमेल तसा अन्न नैवेद्य पितरांना नक्कीच पोचतो. कृपया त्यासाठी कर्ज काढून, उधार उसनवार, बडेजाव करू नयेत.

७ ) कांही जणांना वाटते कशावरून हे सर्व पितरांना पोचते ? आपण ३६४ दिवस पितरांसाठी काहीही करीत नाही. मग केवळ श्राद्धाच्या, सर्वपित्रीच्या एखाद्या दिवशी सर्व पितरांसाठी मिळून चमचा चमचा वाढलेल्या अन्नाचा इतका विचार कशासाठी करायचा ? समजा पितरांपर्यंत नाही पोचले तरी कावळा आणि इतर पक्षी, कीटक, प्राणी हे तरी ते अन्न खातीलच ना ?

८ ) ते अन्न खाणारे कावळा आणि इतर पक्षी, कीटक, प्राणी हे जीवनसाखळीची एकेक कडी असते. त्या मूक प्राण्यांचे आपल्याला आशीर्वाद मिळतात. पर्यावरणाच्या संदर्भामध्ये कावळा हा तर आपल्या अवतीभवतीचे, आपल्या दृष्टीने अनेक त्याज्य पदार्थ खातो व स्वच्छता राखतो. माणसाला सर्वाधिक प्राणवायू, सावली देणारे, जमिनीची धूप रोखणारे वड - पिंपळासारखे वृक्ष तर कावळ्याच्या विष्ठेतूनच रुजतात. त्यामुळे कावळ्याला आत्मा दिसतो की नाही याच्या विचारापेक्षा त्याची ही उपयुक्तता, आपला स्वार्थ म्हणून तरी आपण जोपासायला हवी.

९ ) हल्ली मृत माणसांच्या नावाने, वृत्तपत्रांमधून वर्षानुवर्षे त्यांचे फोटो, कविता, श्रद्धांजलीचा मजकूर, टीव्हीवर जाहिराती, गावभर मोठमोठे फ्लेक्स बोर्ड अशा गोष्टी हजारो रुपये खर्चून केल्या जातात. अगदी कळकळीने भावना व्यक्त केलेल्या दिसतात. व्हॉट्स ॲप, फेसबुक यावरूनही हे मेसेज फिरतात. कशावरून ते या मृत व्यक्तींना / पितरांना पोचते, असा प्रश्न कुणीही विचारत नाही. त्यापेक्षा या जाहिरातींचे हजारो रुपये, गरिबांना द्या, असे कुणीही का म्हणत नाही ? बहुतेक सगळी माध्यमे ही फक्त हिंदूंच्याच बाबतीत पुरोगामी आहेत. पण ती देखील असल्या जाहिराती छापून पैसे कमविण्याचा धंदा करतातच ना !

१० ) आपल्या धर्मानुसार आत्म्यांना अन्न अर्पण करणे हेच फार महत्वाचे मानलेले आहे. त्या ऐवजी कांही मंडळी कोरडा शिधा ( तांदूळ, गहू, साखर, डाळ इत्यादी ) अर्पण करतात. पण विचार करा, एखादा अत्यंत भुकेला माणूस तुमच्या पुढे उभा आहे. त्याला त्यावेळी तुम्ही जरी १ / १ गोण भरून डाळ,तांदूळ हे पदार्थ दिलेत तर त्यावेळी त्याची भूक भागेल का ? ते तुमचे पुण्यकर्म ठरेल पण श्राद्ध मात्र नक्कीच ठरणार नाही ! अन्नदान हे असे एकच दान आहे की ते घेणारा, त्याचे पोट भरल्यावर तरी तृप्तीने " आता पुरे, आणखी नको " असे म्हणतो. अन्य कुठल्याही प्रचलित दानांच्या बाबतीत असे घडू शकत नाही. ते फक्त अन्नदानाच्या बाबतीतच घडते.

११ ) तुमच्या दिवंगत आईवडिलांनी तुम्हाला अगदी स्पष्ट सांगितले असेल / लिहून ठेवले असेल की त्यांचे क्रियाकर्म, श्राद्ध करू नका, तरीही त्यांच्या मृत्युनंतर या गोष्टी तुम्ही नक्कीच करा. कारण माणसे असे कांही सांगतात तेव्हा त्यांचे विचार हे इथल्या अनुभवानुसार आणि ज्ञानानुसार असतात. पण परलोकात गेल्यावर, आपण पृथ्वीवर मुलाबाळांना असे सांगून चूक केली, असे जर त्यांच्या लक्षात आले तर ते तुम्हाला पुन्हा येऊन " माझे श्राद्ध कर रे बाळा " असे सांगू शकत नाहीत. त्यामुळे हजारो वर्षे आपल्या धर्मात अस्तित्वात असलेले विधी, एक दिवस करायला काय हरकत आहे ?

१२) दिवंगत पूर्वजांच्या स्मृतीप्रित्यर्थ एखाद्या संस्थेला देणगी देणे, पाणपोई / विहीर बांधणे, मंदिराला दान देणे ही सर्व खूप मोठी सत्कार्ये / पुण्यकर्मे आहेत. पण हे श्राद्धाला पर्याय नक्कीच नाहीत.

१३) आपल्या धर्मामध्ये असाही एक विश्वास आहे की माणसाबद्दलच्या सर्व गोष्टी देवाने स्वतःच्या हातात ठेवल्या आहेत. पण माणसाला संतती व संपत्ती देण्याची सर्व सूत्रे मात्र त्याने माणसाच्या दिवंगत पूर्वजांवर सोपविली आहेत.

१४ ) कर्मफळाचा बाऊ करू नका. तुमची जन्मपत्रिका अचूक असेल तर त्यातील ग्रहस्थिती ही तुमचे जन्म घेताना असलेले गुण दाखविणारे प्रगतीपुस्तक असते. त्यावरून तुमचे आयुष्य कसे असू शकेल याचे केवळ अनुमान करता येते. पण तसेच अचूक घडत नाही. ते तुमचे भविष्य नसतेच मुळी ! कारण तुमच्या आयुष्यात चांगल्या कर्तृत्वाने तुम्हाला अनेक गोष्टी पूर्ण बदलता येतात. किंबहुना तेच करण्यासाठी तुम्ही जन्म घेतलेला असतो. आधीच्या इयत्तेतील प्रगतीपुस्तक हे तुमच्या तोपर्यंतचे "कर्मफळ" दाखविते. पुढच्या इयत्तेत तुम्ही जोरदार अभ्यास करून सुवर्णपदकही जिंकू शकता. म्हणूनच अत्यंत अशिक्षित, गरीब आणि मागास भागात जन्मलेला माणूसही खूप मेहेनतीच्या जोरावर डॉक्टर, सनदी अधिकारी, वैज्ञानिक झालेला पाहायला मिळतो. रिक्षावाल्याची मुलगी सीए, भांडीवाल्या बाईचा मुलगा कलेक्टर, हमालाची मुलगी डॉक्टर झालेली आपण पाहतो. कर्माचे फळ सांगणारा कर्मविपाक सिद्धांताबरोबरच तुमचे प्रयत्न, श्रद्धेने केलेली मेहनत फळाला येते.

१५ ) आताच्या युगात सर्व संदर्भ, व्यवहार, दैनंदिन आयुष्य असे सगळेच खूप बदलले आहे. लाखो ब्राह्मणांनी गेल्या कांही पिढ्यांपासून आपले व्यवसाय बदलले. दान घेणे ( प्रतिग्रह ) बंद केले असून आता ते दान, देण्या देऊ लागले आहेत. त्यामुळे या कामामध्ये प्रशिक्षित असलेल्या ब्राह्मणाला त्याचा मोबदला म्हणून जरूर दान करावे. पण ज्याला अन्नाची अत्यंत गरज आहे अशा गरिबाला अन्नदान करणे सर्वात महत्वाचे आहे.

१६ ) मनुष्य जन्मात आत्म्याच्या अनेक इच्छा अपूर्ण राहिलेल्या असतात. मृत्यूपश्चात त्याच्या धन, पैसा, स्थावर, कपडे, सोनेनाणे अशा जड रूपातील वस्तू म्हणजे त्याच्या देहाची गरज असते. तो येथेच सोडून गेलेला असतो. पण आपल्या श्रद्धेनुसार आत्मा मात्र हा अन्नाच्या वासामुळे तृप्त होतो. म्हणूनच त्याला अन्न अर्पण करण्याला महत्व दिलेले आहे. याच कारणामुळे श्राद्धामध्ये अत्यंत उत्तम सुगंध असलेली फुले, चंदन, उदबत्त्या वापरल्या जातात.

१७ ) मेटा सायन्सचे श्री. जॉर्ज मिक यांनी लिहिलेले " आफ्टर वुई डाय व्हॉट देन ?" नावाचे एक पुस्तक आहे. त्याचा मराठी अनुवाद ( " मृत्यूनंतर होते तरी काय? अनुवाद - पद्मा कुलकर्णी ) पुण्याच्या प्रसाद प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे. त्यात मिक यांनी या विषयावर जगभर केल्या गेलेल्या शेकडो वैज्ञानिक प्रयोगांची माहिती दिली आहे. यात नावानिशी माहिती, आत्म्याची छायाचित्रेही दिली आहेत. त्यात हिंदू तत्वज्ञानाचा पुसटसा उल्लेखही केलेला नाही. तरी त्यांचे सर्व निष्कर्ष मात्र , हिंदू धर्मातील या विषयीची सर्वच्या सर्व अनुमाने खरी आहेत यावर शिक्कामोर्तब करतात. ज्या ख्रिश्चन धर्मात पुनर्जन्मच नाही, तो धर्म मानणारे शास्त्रज्ञ पुनर्जन्म या विषयावर संशोधन करायला कचरत नाहीत.

१८ ) जातपात, राजकीय मते, पुरोगामी आणि अतिवैज्ञानिक विचार अशा गोष्टी क्षणभर बाजूला ठेऊन आपण शांतपणे हिंदू धर्माबद्दल विचार करू या ! या देशात, या धर्मात हजारो वर्षे आणि आजवर आपले कोट्यवधी पूर्वज जे काही करीत होते ते सर्व मागासलेले व त्या अंधश्रद्धा होत्या का ? ते सर्वच मूर्ख होते काय? हजारो वर्षात त्यामध्ये कुणीही पुरोगामी, वैज्ञानिक विचारांचा उपजलाच नाही कसा ?

१९) स्मशान हे हिंदू धर्मात भगवान शंकराचे स्थान मानले गेले आहे. तेथे जाऊन पार्ट्या करणे, केक कापणे हे हिंदूंना हिणवण्यासाठी केले जाते. कुठल्या कबरस्थानात जाऊन पार्ट्या करण्याची हिंमत होणार नाही. पण अनेक परधर्मीय विदेशी मंडळी मात्र आपल्या या शास्त्राकडे आकर्षित होत आहेत. भारतात येऊन श्राद्ध करतात. रशिया, कझाकिस्तान, स्वित्झर्लंड येथील महिलांनी गया येथे येऊन श्राद्ध केल्याचे फोटो प्रसिद्ध झाले होते. ५ वर्षांपूर्वी तोमोका मुशिगा या जपानी महिलेले हिंदू श्राद्ध पद्धतीवर संशोधन करून डॉक्टरेट पूर्ण केली आहे. या विषयावरील तिचे अनेक लेख आंतरराष्ट्रीय जर्नल्सनी प्रसिद्ध केले आहेत.

२०) गेल्या कांही वर्षांत, " घरामध्ये आपल्या दिवंगत नातेवाईकांचे फोटो लावू नयेत, त्यामुळे त्यांना पुढची गती लाभत नाही " असा विचार, समज, सल्ला ऐकायला मिळतो. यापूर्वी घरांमध्ये, जुन्या घरांच्या पडवी / ओसरीवर, राजवाड्यांमध्ये ३ / ३ पिढ्यांमधील नातेवाईकांचे फोटो किंवा चित्रे लावलेली असायची. मग इतक्या पिढ्यांना पुढील गती लाभलीच नसेल का ? पण आता असे झाले आहे की कित्येक जण आईवडील हयात असतांना त्यांच्याशी नीट वागत नाहीत. खाणेपिणे, औषधपाणी यांची हेळसांड करतात. दैनंदिन व्यवहार, पैसे, जमीनजुमला, इस्टेट यात त्यांना फसवितात, अन्याय करतात. अनेकदा अशा गोष्टी गैरमार्गाने हडप करतात. त्यामुळे त्यांच्या फोटोंपुढे उभे राहतांना लाज वाटते, अपराधीपणा वाटतो. म्हणून मग फोटोच नकोत. पण सचोटीने वागणाऱ्यांना असे वाटण्याची गरजच नसते. उलट अभिमानाने आपल्या पुढच्या पिढ्यांना, त्यांची सन्मानाने ओळख करून देता येते. तुमच्या घरात लावलेल्या फोटोमुळे त्या आत्म्याची पुढची गती ठरत नसते, तर ती त्याच्या कर्मावरच ठरते.

या पूर्ण विषयावर आपल्याकडे अत्यंत सुसंगत सिद्धांत असूनही, अनेक ग्रंथ उपलब्ध असून त्यावर संशोधनच होत नाही. शेकडो वर्षे आपल्यावर राज्य करणाऱ्या आक्रमकांनी आपल्यात न्यूनगंड पेरला आहे. त्यामुळे या सर्व गोष्टी अवैज्ञानिक,अंधश्रद्धा म्हणून आधीच फेटाळल्या जातात. ज्याचे पुरावे आपल्याला सापडले नाहीत किंवा शोधता आलेले नाहीत "त्या गोष्टीच असू शकत नाहीत" असे आपल्याला म्हणता येणार नाही हे सर्वात महत्वाचे आहे.

श्राद्ध करावे की नाही, श्रद्धा कुठली आणि विज्ञान कुठले हे ज्याचे त्याने ठरवावे. आपल्या धर्मातील या एका अत्यंत महत्वाच्या गोष्टीची नीट माहिती करून घ्यावी. त्यानंतर आजच्या काळाशी सुसंगत असे काय करावे, हे प्रत्येकाने आपल्या सारासार विवेकानुसारच ठरवावे. त्याला तसे स्वातंत्र्य दिलेले आहे.

## पत्र मानस

### पितृपक्षात श्राद्धकर्म करायला हवे

जन्मापासून मृत्यूपर्यंतच नव्हे तर मृत्यूनंतरही जीवाच्या उद्धारासाठी काय करावे, याविषयी सखोल विवेचन सांगणारे एकमेब शास्त्र म्हणजे हिंदू धर्मशास्त्र ! ८४ लक्ष योनी फिरल्यानंतर मिळणाऱ्या मानवी जन्माची दोन उद्दिष्ट्ये असतात. एक म्हणजे प्रारब्धभोग भोगून संपवणे आणि दुसरे म्हणजे अध्यात्मिक साधना करून शिवात्माशी म्हणजेच भगवंताशी एकरूप होणे असे अध्यात्मशास्त्र सांगते; मात्र प्रारब्धभोग भोगून संपवताना मनुष्यप्राणी त्याच्यावरील चांगल्या वाईट संस्कारामुळे अनेक चांगली वाईट कर्मे करतो ज्याचे फळ निर्माण होऊन ते भोगण्यासाठी त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. आयुष्यभरात कमावलेली संपत्ती, नात्यांमधील देवाणघेवाण, अर्धवट राहिलेले व्यवहार यांमुळे मृत्यूनंतरही प्रत्येक जीव सद्गतीला प्राप्त होतोच असे नाही. काही जीव मृत्यूनंतही अडकून राहतात. अशांच्या शांतीसाठी हिंदू धर्मात विविध विधी सांगितले आहेत, मृत्यू पावलेल्या आपल्या नातेवाईकांचा पुढील मार्ग सुकर व्हावा यासाठी केल्या जाणाऱ्या विधींनाच श्राद्ध विधी किंवा श्राद्ध कर्म म्हटले जातात. भाद्रपद पौर्णिमेनंतर सर्वपित्री अमावास्येपर्यंतच्या काळात समस्त पीतर हे पृथ्वीच्या जास्तीत जास्त जवळ आलेले असतात. आपले जवळचे नातेवाईक ज्या तिथीला निर्वर्तले असतील त्या तिथीला त्यांच्या सद्गतीसाठी ब्राह्मणभोजन द्यावे असे शास्त्र सांगते. पितर कावळयाच्या रूपात येऊन अन्नग्रहण करतात असा प्रघात मागील काही वर्षांपासून पडला आहे त्यामुळे या तिथींना कावळयालाही घास दिला जातो. प्रभू श्रीरामचंद्रांनी आपले पिता दशरथाच्या सद्गतीसाठी श्राद्धकर्म केल्याचा उल्लेख रामायणात आढळतो. छत्रपती शिवरायांनी आपल्या आई वडिलांचे श्राद्ध केले आहे. त्यामुळे याविषयी कोणतीही शंका न बाळगता पितृपक्षात प्रत्येकाने श्राद्ध कर्म करावे.

- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी

*मीरा भाईंदर : गवळी समाज संघटनेचे खजिनदार व समाज सेवक विनायक काते आपल्या वाढ दिवसाचं औचित्य साधून भाईंदर येथिल समर्पण वृद्धाश्रमातील वृद्धांना एक महिना पुरतील एवढे डायपर वाटप करताना दिसत आहेत .सोबत राजन पवार ,अनिल कोटकर शाम खेडेकर व संजय जगताप आदी मान्यवर .*




## म ह त्त्वा चे

### रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल :** श्री प्रल्हाद राय झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट, पनवेल -नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघटना आणि आम्ही रक्तदाते पनवेलचे यांच्यातर्फे रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार 22 सप्टेंबर रोजी सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत श्री पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर, विश्राळी नाका, पनवेल येथे हे शिबिर होणार आहे. यावेळी सेल्फी पॉईंट उभारण्यात येणार आहे. या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन एड. मनोहर सचदेव यांनी केले आहे.

### ठाण्यात आज पाणी पुरवठा बंद

**ठाणे :** ठाण्याच्या औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेतंर्गत पाईप लाईन दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम पूर्ण होण्यास २४ तासांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याने या काळात ठाण्यातील अनेक भागातील पाणी पुरवठा बंद राहणार आहे. एक दिवस उशिराने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा-मानपाडा व वागळे (काही भागात) प्रभाग समितीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो. दरम्यान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरूत्व वाहिनीचे कटाई नाका ते शीळ टाकी येथे दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर होणार आहे. ठाणे शहरातील काही भागांचा पाणी पुरवठा शुकवार (२० सप्टेंबर) रात्री बारा वाजेपर्यत २४ तासांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. ठाणे महापालिकेअंतर्गत प्रभाग २६ व ३१ चा काही भाग वगळता दिवा, मुंब्रा यासह कळवा प्रभाग समितीमधील सर्व भागांमध्ये व वागळे प्रभाग समितीमधील रुपादेवी पाडा, किसन नगर नं. २, नेहरुनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणी पुरवठा २४ तासासाठी पूर्णपणे बंद राहील. पाणी पुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे.

## राहुल गांधींना जीवे मारणारी धमकी सहन करणार नाही...

# ईंट का जवाब पत्थर से देंगे - पटोले

- कोकणात काँग्रेस पक्ष वाढवण्यावर भर द्या, विधानसभेला कोकणातून जास्तीत जास्त जागा जिंका - विजय वडेट्टीवार
- महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीची कोकण विभागीय आढावा बैठक भाईंदरमध्ये संपन्न

**प्रतिनिधी**
**भाईंदर**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सत्ताधारी पक्षाचा खासदार, एक आमदार व एका केंद्रीय मंत्र्यांने दिलेल्या धमक्या धमक्या गंभीरपणे घेतल्या पाहिजेत. राहुल गांधी यांचा देश-विदेशात नावलौकिक व विश्वासार्हता प्रचंड वाढली आहे. नरेंद्र मोदी व आरएसएस विरोधात लढणारे देशातील ते एकमेव नेते असून राहुल गांधी भाजपासमोर मोठे आव्हान बनले आहेत त्यामुळेच घाबरलेला भारतीय जनता पक्ष व त्यांच्या मित्र पक्षाचे नेते त्यांना सातत्याने जीवघेण्या धमक्या देत आहेत, पण राहुलजी गांधी अशा धमक्यांना घाबरत नाहीत असे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले.

विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी काँग्रेस पक्षाची कोकण विभागीय आढावा बैठक भाईंदर (पश्चिम) येथे पार पडली. या बैठकीला काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते




सतेज पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, सचिव बी. एम. संदीप, प्रदेश कार्याध्यक्ष मुझफ्फर हुसेन, आमदार भाई जगताप, माजी खासदार हुसेन दलवाई, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, महेंद्र घरत, अविनाश लाड यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी उपस्थितीत होते.

रमेश चेन्नीथला पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात आज काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष आहे, विधानसभा निवडणुका मविआ एक होऊन लढणार आहे. कोकण विभागात काँग्रेस पक्षाचे संघटन मजबूत करून या भागात काँग्रेस पक्षाला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी काम करा. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे सरकार येईल व नरेंद्र मोदी सरकार हटवण्याची सुरवात महाराष्ट्रातून होईल असा विश्वास रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले की, राहुल गांधी यांनी सातत्याने हिंसेचा विरोध करून 'नफरत की बाजार में मोहब्बत की दुकान' सुरु केली. केंद्र सरकारने देशात दहशतीचे वातावरण निर्माण केले असताना राहुल गांधी यांनी ४००० किमीची पदयात्रा काढून देशातील वातावरण बदलवून टाकले. देशाच्या संविधानासाठी, लोकशाहीच्या रक्षणासाठी त्यांनी ही यात्रा काढली. राहुल गांधी हे संयमी नेते आहेत पण भाजपा त्यांच्यावर जीवावर उठले आहे, त्यांना सातत्याने धमक्या दिल्या जात आहेत. काँग्रेस पक्ष हे सहन करणार नाही, ईंट का जवाब पत्थर से देंगे, असा इशारा पटोले यांनी दिला.

विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, महायुती सरकारला सत्तेचा अंहकार झाला आहे, सर्वसामान्य जनतेला गाडीखाली चिरडून टाकणारे सत्ताधारी पक्षातील नेत्यांचेच नातवाईक आहेत. महायुतीचे सरकार भ्रष्ट मार्गाने आलेले आहे, आजही वाड्या वस्त्यावर ५० खोके एकदम ओके, हे विसरले नाहीत. भ्रष्ट युती सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार केला. पंतप्रधानांनी ज्यांच्यावर ७० हजार

▸ कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप केला, त्यालाच चार दिवसांनी सरकारमध्ये घेतले व तिजोरीच्या चाव्या दिल्या. ना खाऊंगा, ना खाने दुंगा म्हणाऱ्यांनीच भ्रष्टाचाऱ्यांना सत्तेत घेतले. भ्रष्टाचारावर बोलण्याचा भाजपाला अधिकार नाही. विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुका होतील, त्या निवडणुकाही महत्वाच्या आहेत त्यासाठी आतापासूनच काम करा. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा विजय होऊन मविआचाच मुख्यमंत्री होईल असा विश्वासही थोरात यांनी व्यक्त केला.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यावेळी म्हणाले की, महायुती सरकारने भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे. आरोग्य विभागात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे, ॲम्ब्युलन्स खरेदीत घोटाळा केला आहे. हे सरकार कमीशनखोर, खोकेबाज, धोकेबाज सरकार असून या सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यातही भ्रष्टाचार केला आहे. धारावी पुनर्वसनाच्या नावाखाली मुंबईतील कोट्यवधी रुपयांची जागा अदानीला विकली जात आहे. भाजपा युती सरकारने महाराष्ट्र गुजरातला गहाण ठेवला आहे. विरोधी पक्षेते राहुल गांधी यांना जिवघेण्या धमक्या देणाऱ्यांचाही वडेट्टीवार यांनी समाचार घेतला तसेच आगामी निवडणुका लक्षात घेऊन कोकणात काँग्रेस पक्ष वाढवण्यावर भर द्या, जिद्दीने कामाला लागा व कोकणातून जास्तीत जास्त जागेवर विजय मिळवा असे आवाहन वडेट्टीवार यांनी केले.

## एनएमएमटी बस सुरु करण्याची उरणच्या जेष्ठ नागरिकांची मागणी

**प्रतिनिधी**
**उरण**

नवी मुंबई महानगरपालिकेची एन एम एम टी बससेवा पुन्हा सुरू करावी अशी मागणी उरणच्या जेष्ठ नागरीक व मॉर्निंग कट्टा ग्रुपने केली आहे. त्यासाठी उरण शहरात सह्यांची मोहीम सुरू करण्यात आली असून त्याचा नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. फेब्रुवारी मध्ये खोपटे येथे झालेल्या भीषण अपघातानंतर नवी मुंबईसाठी प्रवासाची जीवन रेखा ठरलेली महानगरपालिकेची एनएमएमटी बस सेवा व्यवस्थापनाने कामगारांची सुरक्षा आणि तोट्यात चालणारा मार्ग ठरवून अनिश्चित काळासाठी बंद केली आहे. याचा फटका उरणच्या प्रवाशांना बसत आहे.



यामध्ये विशेषत: जेष्ठ नागरिक,महिला,विद्यार्थी व कामगार यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांना आपलं निश्चित ठिकाण गाठण्यासाठी पुन्हा एकदा धोकादायक खाजगी वाहतुकीचा आसरा घ्यावा लागला आहे. परिणामी वेळ आणि अधिकच्या खर्चाची भार आता उरणकरांच्या खिशावर पडणार आहे.शुक्रवार रात्री पासून उरण ते नवी मुंबई दरम्यानच्या ३०,३१ आणि ३४ या क्रमांकाच्या मार्गावरील एन एम एम टी ची बस सेवा पूर्ण बंद करण्यात आली आहे.

## अंनिस चे प्रा. प्रवीण देशमुख 'आधारस्तंभ' पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी**
**अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील साने गुरुजी स्मारक वडघर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचेच्या प्रा प्रवीण देशमुख यांना ज्येष्ठ कवयित्री निरजा यांच्या हस्ते आधारस्तंभ पुरस्काराने रविवारी सन्मानित करण्यात आले.

यावेळी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक राजीव तांबे, अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्र ट्रस्टचे विश्वस्त सचिव दीपक गिरमे, सदस्य गणेश चिंचोले, अरविंद पाखले, राज्यकारिणी आणि सदस्या ॲड. मुक्ता दाभोलकर, मिलिंद देशमुख,




रायगड जिल्हा अध्यक्ष भाऊ सावंत आदि मान्यवर आवर्जून उपस्थित होते.या कार्यक्रमाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या २०० पेक्षा जास्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली.

प्रा प्रवीण देशमुख यांनी हा पुरस्कार त्यांच्या पत्नी व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कृतिशील कार्यकर्त्या सुरेखा देशमुख यांच्या सह स्वीकारला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचे व्यवस्थापकीय संपादक राहुल थोरात यांनी प्रा प्रवीण देशमुख आणि कुटुंबीयांच्या श्रम वेळ आणि पैसा या तिन्हीच्या योगदानाबद्दल गौरवास्पद माहिती उपस्थितांना दिली. त्यामध्ये प्राध्यापक देशमुख यांच्या निवृत्ती निमित्त, वाढदिवसानिमित्त आणि मुलाच्या सत्यशोधकी विवाहाच्या निमित्ताने प्रत्येक वेळी एक लाख रुपयाचा धनादेश महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला दिल्याचा आवर्जून उल्लेख केला. आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता मागील दोन वर्षात देशमुख कुटुंबियांनी एकंदरीत तीन लाखाची देणगी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला दिल्याचे त्यांनी आवर्जून सांगितलं.



*ठाणे : 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष, तसेच "कामगारहृदयसम्राट" म्हणून ओळखले जाणारे व कष्टकरीवर्गाचा बुलंद आवाज असणारे, मा. राजन राजे यांचा ६७वा वाढदिवस बुधवार, दि. १८ सप्टेंबर-२०२४ रोजी, 'धर्मराज्य पक्षा'च्या ठाणे कार्यालयात मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि कामगार सभासद मोठ्यासंख्येने उपस्थित होते.*

## पालिकेतर्फे अनधिकृत बॅनर्स विरुध्द कारवाई

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या अनधिकृत बॅनर्स विरुध्द नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने 8 ही विभागात कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील 8 ही विभागात दि.18/09/2024 व दि.19/09/2024 रोजी या दोन दिवसात छोटे बॅनर 1893 व मोठे बॅनर 623 असे एकुण 2516 बॅनर्स हटविण्याची कारवाई करण्यात आली. तसेच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरातीचे बॅनर प्रिंट करुन देणारे एकुण 22 प्रिंटींग करणाऱ्या व्यवसायीकांना विभाग कार्यालयामार्फत लेखी सुचना देण्यात आल्या. त्यात नवी मुंबई महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयाची परवानगी असल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे जाहिरात/बॅनर्स/पोस्टर्स छापु नये व तसे केल्यास त्यांना महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम 1995 चे कलम 3 नुसार कारवाई करण्यात येईल अश्याही सुचना देण्यात आल्या.यापुढे अनधिकृत बॅनर्स/होर्डींग्ज विरुध्द कारवाई तीव्र करण्यात येणार आहे याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

## टिटवाळा उपविभागातील 184 वीज चोरांविरुद्ध गुन्हे दाखल

### 44 लाखांची वीजचोरी उघड

**प्रतिनिधी**
**कल्याण**

महावितरणच्या टिटवाळा उपविभागात वीज चोरांविरुद्ध धडक मोहीम नियमितपणे सुरू आहे. उपविभागातील सर्वाधिक गळती असलेल्या वीज वाहिनीवर गेल्या दीड महिन्यात केलेल्या तपासणीत १८४ जणांकडे ४४ लाख रुपयांची वीजचोरी आढळली. या सर्व १८४ जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार मुरबाड पोलिस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा आणि कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली १ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या दीड महिन्याच्या कालावधीत ही कारवाई करण्यात आली. मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयांतर्गत टिटवाळा मंदिर, बल्याणी, बनेली, मांडा पश्चिम भागात १३४ तर गोवेली शाखेंतर्गत म्हारळ व वरप भागात ५० जणांकडे वीज चोऱ्या आढळून आल्या. यात वीजबिल थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या ४० ग्राहकांचा समावेश आहे. टिटवाळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहायक अभियंते धनंजय पाटील, तुकाराम घोडविंदे, कनिष्ठ अभियंते सचिन पवार, अलंकार म्हात्रे आणि त्यांच्या टिमने ही कामगिरी केली.


### शहापूर नगरपंचायत, शहापूर. जि. ठाणे.

मु. पो. शहापूर, जि. ठाणे. पिन - ४२१६०१

जा.क्र.श. न. प / बांध / ११०७ / २०२४ — दिनांक - १९/०९/२०२४

**फेर निविदा सूचना**

Name of Work- Appointment of Agency for GIS Based Base map creation & Door to Door Property Tax Assessment Survey of All Properties and supply installation, implementation and integration of offline with response QR code solution for Shahapur Nagarpanchayat,to assist tax assessment process and to provide all required data in prescribed format

तांत्रिक कारणामुळे सदर कामाची निविदा भरण्याची मुदत दि. ३०/०९/२०२४ रोजी दु. ३.०० वा पर्यंत आहे.

सही/-
( शिवराज वि. गायकवाड )
मुख्याधिकारी
शहापूर नगरपंचायत, शहापूर


## जागृतेश्वर तलाव स्वच्छ करीत 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचा नवी मुंबईत शुभारंभ



**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

स्वच्छता ही नियमित करण्याची गोष्ट असून स्वच्छतेमध्ये सातत्य राखणे गरजेचे आहे. यादृष्टीने 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने 'स्वच्छता ही सेवा (SHS) पंधरवडा' जाहीर करण्यात आला असून या अंतर्गत राबविण्यात येणा-या 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियानात सर्व नवी मुंबईकर नागरिक उत्साहाने सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करतील असा विश्वास नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केला.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 14 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2024 या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता ही सेवा पंधरवड्याचा शुभारंभ वाशी सेक्टर 6 येथे जागृतेश्वर तलाव परिसर सखोल स्वच्छता मोहीमेव्दारे संपन्न झाला. यामध्ये नमुंमपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे, माजी आमदार संदीप नाईक, 'स्वच्छ महाराष्ट्र मिशन'चे राज्य संचालक नवनाथ वाठ व उपआयुक्त मल्लिकार्जुन पाटील, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड तसेच महानगरपालिकेचे विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि 'स्वच्छ नवी मुंबई मिशन'च्या वुमन आयकॉन श्रीम. रिचा समित व युथ आयकॉन नामांकित जलतरणपटू शुभम वनमाळी त्याचप्रमाणे विविध स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, एनएसएसचे विद्यार्थी, शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक 600 हून अधिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### बृहन्मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्रे क्र. | बोली क्र. २०२४_एमसीजीएम_१०८६५९८_१ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | जीटीबी रुग्णालय शिवडी येथील मुख्य इमारतीमधील गंजलेल्या प्रेशराइज्ड नॅचरल गॅस पाईपलाईन बदलणे. |
| निविदेचे शुल्क | १३२०/- + (१८.०% जीएसटी) |
| ई-निविदा मूल्य (अंदाजे मूल्य) | नग दर निविदा |
| बोली सुरक्षा ठेव/ इरठे | रु. १०,०००.०० |
| निविदेच्या वितरण आणि विक्रीचा दिनांक | २०.०९.२०२४ रोजी स. १०.०० वा. पासून |
| निविदेची विक्री आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृतीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ | २७.०९.२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत |
| पूर्व बोली बैठक, वेळ आणि ठिकाण | लागू नाही |
| लिफाफा ए उघडणे | ०१.१०.२०२४ रोजी १६.२० वा. नंतर |
| पत्रव्यवहारासाठी पत्ता | वैद्यकीय अधीक्षक, जीटीबी हॉस्पिटल, जेरबाई वाडिया रोड, शिवडी, मुंबई ४०००१५ |
| बोली उघडण्यासाठी ठिकाण | वैद्यकीय अधीक्षक ह्यांचे कार्याल्यामध्ये ऑन लाईन |

पीआरओ/१३३०/जाही/२०२४-२५
**स्वमर्जीने औषधोपचार करू नका.**

सही/-
वैद्यकीय अधीक्षक,
जीटीबीएच



### भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्र. ०५

**फेर ई- निविदा सुचना क्र. ८१ सन २०२४-२५ प्रसिद्ध करणे बाबत**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील खालील काम वर्तमान पत्रात प्रसिद्ध करणे.

| अनु. क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र ०५ च्या अंतर्गत असलेल्या महानगरपालीका जुन्या प्रशासकीय इमारतीची दुरुस्ती करणे. | २,०९,५६,७३५/- |
| २ | भिनिशमनपा प्रभाग क्रं. ०१ कोंबडपाडा येथे साईबाबा मंदीर जवळील पसिरात सभामंडप बनविणे (आमदार निधि ) | १४,९४,६४०/- |

सबब कामाची फेर ई निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर mahatenders.gov.in दि.२०/०९/२०२४ ते दि.२६/०९/२०२४ रोजी पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा संकेतस्थळावर दि. २६/०९/२०२४ रोजी दु. ४.०० वाजे पर्यंत स्विकारण्यांत येतील.

जा.क्र. /ज.सं.वि./१२६८
दिनांक : १९/०९/२०२४

सही/-
प्र. शहर अभियंता
भिवंडी नि.श. महानगरपालिका, भिवंडी

## आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाची गाडी पोहोचली पाणी न घेताच

**अमरावती :** मेळघाटात गुरुवारी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास यवतमाळवरुन चिखलदरा जाणारी एसटी बस मोठा गावालगत अचानक पेटली. बस पेटल्यामुळे प्रवाशांमध्ये खळबळ उडाली. या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी बसचा मात्र जळून कोळसा झाला. बसला आग लागल्याची माहिती प्रवाशांनी तत्काळ अग्निशमन दलाला दिली. मात्र अग्निशमन दलाची गाडी पाण्याविना घटनास्थळी दाखल झाली. त्यामुळे नागरिकांनी खासगी टँकर मागवून आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र या बसचा जळून कोळसा झाला. नेर आगाराची बस नेहमीप्रमाणं यवतमाळवरून चिखलदरा इथं जात असताना मोठा गावाच्या घाट वळणावर बसच्या समोरील इंजिन अचानक भडकलं. एसटी बस समोरुन पेटल्याचं चालकाला लक्षात येताच त्यांनी प्रसंगावधान राखत वाहक आणि प्रवाशांना सूचित केलं. त्यामुळे वाहक चालकासह सर्व प्रवासी बसमधून पटकन खाली उतरले.



**म ह त्त्वा चे**

### पाण्याच्या जारचा धक्का लागल्याने मुलांना मारहाण

**बारामती :** पाण्याच्या जारचा धक्का लागला म्हणून दोन मुलांना मारहाण केल्याची घटना बारामती जिल्ह्यातील भिगवण येथे घडली. यानंतर दोन गट भिडल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी भिगवण पोलिसात १६ जणांवर अँट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर भिगवण बंद ठेवत आरोपींच्या अटकेची मागणी करण्यात आली आहे. बारामती जिल्ह्यातील भिगवण येथे १७ सप्टेंबरला कार्यक्रम असल्याने दोन जण पिण्याच्या पाण्याचे जार आणण्यासाठी गेले होते. दरम्यान पाणी आणण्यासाठी गेलेल्या दोन अल्पवयीन मुलांकडून पाण्याच्या जारचा धक्का लागला. या कारणातून दोन्ही मुलांना मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणानंतर भिगवण पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीवरून १६ जणांवर अँट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून एकास अटक करण्यात आली आहे.सदर घटनेत मारहाण करण्यात आलेल्यांमधील एका जणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मात्र अन्य मारहाण करणारे अद्याप सापडलेले नाहीत. यामुळे उर्वरित आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी आज भिगवणमध्ये बंद पाळण्यात आला असून निषेध मोर्चा देखील काढण्यात आला.

### जाळपोळ, दगडफेक रोखण्यासाठी अश्रुधूराचा वापर

**नंदुरबार :** एका धार्मिक रॅलीदरम्यान झालेल्या दगडफेकीनंतर, नंदुरबारमधील माळीवाडा, इलाही चौक आणि मच्छी बाजार परिसरात तुफान दगडफेक झाली. यावेळी, उपद्रव्यांनी पोलीस अधीक्षकांच्या वाहनासह खाजगी वाहनांचीही तोडफोड केली. एवढेच नाही, तर तीन घरे आणि तीन दूचाकीना आग लावण्याचाही प्रयत्न करण्यात आला.
अखेर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना आश्रू धुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांकडून आटोकाट प्रयत्न करण्यात आले. घटनेचा परिणाम शहरातील इतर भागांतही झाल्याचे दिसत आहे. या घटनेनंतर अफवा पसल्या आणि नागरिकांचीही धावपळ उडाली. यामुळे दुकाने, व्यापारी प्रतिष्ठाने बंद झाली, शाळा देखील सोडण्यात आल्या. परिणामी बाजारपेठांमध्ये शुकशुकाट दिसत आहे.

### भुईबावडा-रिंगेवाडीत एसटी बस कलंडली, चार प्रवासी जखमी

**वैभववाडी :** भुईबावडा रिंगेवाडी येथे समोरून येणाऱ्या ट्रकला बाजू देताना पुणे-पणजी ही एसटी बस उलटली. यात चार प्रवासी जखमी झाले. त्यांच्यावर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महिनाभरातील हा एसटीचा दुसरा अपघात आहे. जखमीमध्ये आनंदा बबन सोनुले, पुष्पा नारायण कांबळे यांचा समावेश आहे. पुण्याहून पणजीला निघालेली एसटी बस (क्रमांक एमएच१४, केक्यू- ५९३७) भुईबावडा घाट उतरून वैभववाडीकडे येत होती. भुईबावडा रिंगेवाडी पुलानजीक बस आली असताना समोरून आलेल्या ट्रकला बाजू देण्यासाठी बस चालकाने वेग कमी करीत गाडी बाजूला घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी बाजूपट्टीवरून गाडी घसरत रस्त्याबाहेर जाऊन कलंडली.अपघाताची माहिती मिळताच तहसीलदार सूर्यकांत पाटील हे तातडीने घटनास्थळी पोहोचले.

# मनोज जरांगेंची प्रकृती खालावली

## उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी उपचार घेण्यास नकार

**प्रतिनिधी**
■ **जालना**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आजचा तिसरा दिवस असून, तिसऱ्या दिवशी मनोज जरांगे पाटील यांची तब्येत काही प्रमाणात खालवलीय. शरीरातील साखर कमी झाल्याने त्यांना थकवा जाणवत आहे. यातच जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या वैद्यकीय पथकाने आज जरांगे यांची तपासणी केलीय.



मनोज जरांगे यांना जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी उपचार घेण्याची विनंती केली. मात्र मनोज जरांगे यांनी उपचार घेण्यास नकार दिला असल्याचं जिल्हा आरोग्य अधिकारी जयश्री भुसारे यांनी सांगितले.

याआधी उपोषणाच्या दुसऱ्या दिवशीही मनोज जरांगे यांची आरोग्य विभागाच्या डॉक्टरांच्या पथकाने तपासणी केली होती. यावेळी जरांगे यांची शुगर डाऊन झाली होती आणि ब्लड प्रेशर आणि ऑक्सिजन लेव्हल नॉर्मल असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं होतं.

दुसऱ्या दिवशीही जरांगे यांचा अशक्तपणा वाढला होता. त्यावेळीही त्यांना उपचार घेण्याची विनंतीडॉक्टरांनी केली. मात्र त्यासाठी त्यांनी डॉक्टरांना नकार दिला.

दरम्यान, आज उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी राजरत्न आंबेडकर मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. यावेळी बोलताना राजरत्न आंबेडकर म्हणाले की, जरांगे पाटलांच्या केसाला जरी धक्का लागला तर येणाऱ्या काळात सत्ताधारी आणि विरोधकना प्रचाराला सुद्धा उतरता कामा नये अशी परिस्थिती महाराष्ट्रात उभी करू, असा इशारा त्यांनी सरकारला दिलाय

# अनियंत्रित ट्रक पलटी होऊन 85 शेळ्या ठार

## अकोला- हैदराबाद महामार्गावरील दुर्घटना

**प्रतिनिधी**
■ **हिंगोली**

शेळ्यांची वाहतूक करणारा भरधाव ट्रक अनियंत्रित होऊन पलटी झाला. यात ट्रकमध्ये असलेल्या शेळया दाबल्या जाऊन सुमारे ८५ शेळया ठार झाल्या आहेत. सदरचा अपघात अकोला- हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर रात्रीच्या सुमारास घडला असून यात एक कोटीच्या जवळपास नुकसान झाले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथून व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या शेळया खरेदी केल्या होत्या. या शेळया घेऊन हैदराबादकडे विक्रीसाठी नेल्या जात होत्या. दरम्यान मध्यरात्री



दोन वाजता चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने हिंगोलीच्या कनेरगावजवळ रस्त्याच्या कडेला ट्रक पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रकमधील शेळया ह्या रस्त्याच्या खाली फेकल्या गेल्या. यावेळी शेळयांच्या अंगावर ट्रक पडल्याने अनेक शेळयांचा जागीच मृत्यू झाला आहे.

या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेत अनेक शेळयांना वाचवलं. तर ट्रकमधील चालक व वाहकाला देखील वाचवण्यात यश आले आहे. या संपूर्ण घटनेमध्ये व्यापारी व शेतकऱ्याचे तब्बल एक कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे.



*शिर्डी : राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी आज श्री साईबाबा समाधी मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. त्यानंतर त्यांच्या हस्ते पूजा व आरती करण्यात आली.यावेळी राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, पोलीस अधीक्षक राकेश ओला, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर उपस्थित होते. यावेळी राज्यपाल राधाकृष्णन यांनी द्वारकामाई व गुरस्थान मंदीराचेही दर्शन घेतले. साईबाबा संस्थानच्यावतीने श्री साईबाबांची मूर्ती देऊन राज्यपाल महोदयांचे स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे शिर्डी विमानतळावर आगमन झाले.*

# माथेरान शहरात ई-रिक्षाला अपघात

## घोड्यावरील प्रवाशी पर्यटकाला धडक देत रिक्षा उलटली

**प्रतिनिधी**
■ **कर्जत**

माथेरान शहरात ई रिक्षाला अपघात घडला असून यामध्ये रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या घोड्यावरील प्रवाशी पर्यटक महिलेला दुखापत झाली असून ती थोडक्यात बचावली.मात्र इ रिक्षा पलटी झाली.रिक्षा चालक वेगात असून तो मोबाईलवर बोलत असल्याने हा अपघात घडल्याचे प्रत्यक्ष दर्शी पर्यटक सांगत आहेत. माथेरान शहरांत ई रिक्षा चालू झाल्यानंतर चा हा पहिला अपघात आहे.

माथेरान शहरात प्रथमच पर्यटकांच्या सेवेत ई रिक्षा धावू लागली आहे.गेली वर्ष भर या ई रिक्षेचा पायलट प्रोजेक्ट पर्यटक आणि ग्रामस्थांच्या सेवेत यशस्वी पार पडला.अनेक संघर्ष उभा करीत सुरू झालेला माथेरान येथील ई रिक्षा प्रोजेक्टचा प्रवास अखेर न्यायालयाने देखील याला मंजुरी देत सात रिक्षा वरून आता 20 रिक्षा माथेरानच्या



हिरव्यागार वनात रस्त्यावर प्रवाशांच्या सेवेत धावताना दिसत आहेत.दरम्यान आज माथेरान येथून दस्तुरी नाका येथे निघालेली रिक्षा क्रमांक 16 या रिक्षेला माथेरान इंदिरा गांधी नगर येथे अपघात घडला.चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला.या अपघातात रस्त्यावर घोड्यावरून प्रवास करीत असलेल्या पर्यटक महिलेच्या पायाला ही रिक्षा धडकल्याने पर्यटक महिला जखमी झाली.यावेळी रिक्षा मध्ये काही प्रवाशी प्रवास करीत असल्याचे समजून येत असून रस्त्याच्या बाजूला ही रिक्षा जावून उलटली आहे. स्थानिक उपस्थित जागरूक नागरिकांनी लागलीच पुढे धाव घेत रिक्षा सरळ करीत रस्त्यावर उचलून ठेवली आहे. चालक हा अतिवेगात रिक्षा चालवत मोबाईलवर बोलत असल्याचा आरोप जखमी पर्यटक हे सांगत आहेत.मात्र जर पाहिले तर माथेरान शहरात ई रिक्षा धावत असताना रस्त्यावर मालवाहू घोडे असो की पर्यटक सवारी घोडे हे रस्त्याच्या मधोमध चालत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# हायटेक चोरांचा राज्यभर धुमाकूळ

## ड्रोनच्या घिरट्या वाढल्यानं नागरिक संभ्रमात

**प्रतिनिधी**
■ **बीड**

महाराष्ट्रातले चोरही आता हायटेक झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये रात्री ड्रोन उडताना दिसत आहे. अचानक एक ड्रोन येतो, गावात चक्कर मारतो आणि निघून जातो. हा ड्रोन कोणाचाय, कुठून आला, कशासाठी आणि कोण उडवतंय याचा थांगपत्ता पोलिसांनाही नसल्याची परिस्थिती आहे. ड्रोनच्या घिरट्या आणि गावात होणाऱ्या चोऱ्यांमुळं आता ग्रामीण भागात या ड्रोनच्या धास्तीनं लोकांना रात्री गस्त घालावी लागत आहे.

महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये रात्री अपरात्री ड्रोनच्या घिरट्या वाढल्यानं नागरिक चक्रावून गेले आहेत. ग्रामीण भागात गेल्या काही



दिवसांपासून ड्रोनची अक्षरशः दहशत असल्याचं दिसून येतंय. रात्री लोक आपापल्या घरातून बाहेर पडतायत. पोलिसांच्या गाड्यांना थांबवून चौकशा केल्या जात आहेत. ड्रोन कॅमेराच्या भितीमुळं लोक कीर्तनासाठीही बाहेर पडायला तयार नाहीत. चोऱ्या वाढल्यानं हातावर हात ठेवून बघत बसण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. गेल्या काही दिवसात मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये रात्री ड्रोन फिरत असल्यानं मोठा गोंधळ उडाल्याचं चित्र आहे.

# सदावर्तेंच्या एसटी बँकेच्या सभेत राडा

## एकमेकांना धक्काबुक्की, पोलिसांवर खुर्च्या फेकल्या

**प्रतिनिधी**
■ **भंडारा**

भंडाऱ्यात ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या पॅनेलकडून एसटी ट्रान्सपोर्ट बँकेची सभा बोलवण्यात आली होती. मात्र या सभेत राडा झाल्याचे पाहायला मिळाले. सभेमध्ये पोलिसांवर खुर्च्या फेकण्यात आल्या आणि एकमेकांना धक्काबुक्की झाल्याचेही पाहायला मिळाले. यानंतर एसटी कामगार कृती समितीने सभेतून बाहेर पडत लगतच्या दुसऱ्या सभागृहात वार्षिक सभा आटोपली. मात्र सत्ताधाऱ्यांनी ही सभा तहकूब केल्याची घोषणा केली. यानंतर मारहाण केल्याप्रकरणी सदावर्तेंच्या समर्थकांनी विरोधकांविरुद्ध भंडारा पोलिसात तक्रार दाखल केली. तर विरोधकांनी सदावर्तेंवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा ठराव मांडला.



एसटी ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेकडून सर्वसाधारण 71 व्या सभेचे भंडाऱ्यात आयोजन करण्यात आले होते. ही सभा ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या पॅनलकडून आयोजित केली होती. मात्र, एसटी कामगार कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ही सभा उधळून लावली. वार्षिक विशेषांकावर सत्ताधाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि प्रभू श्री राम यांच्यासह नथुराम गोडसे यांचे छायाचित्र लावल्याचा मुद्दा विरोधकांनी रेटून धरला, तसेच सत्ताधाऱ्यांना आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी धारेवर धरलं. यावेळी विरोधकांनी अहवालाची पुस्तकं फाडून फेकली. वाद वाढल्यानंतर सभेत एकमेकांना धक्कबुक्की झाली. यावेळी विरोधकांनी खुर्च्यांची तोडफोड करत फेकाफेकी केली.

काही खुर्च्या पोलिसांनी फेकून मारण्यात आल्या. अशावेळी एसटी कामगार कृती समितीने सभेतून बाहेर पडत बाजूच्या दुसऱ्या सभागृहात वार्षिक सभा आटोपण्याचा प्रयत्न केला. मात्र सत्ताधाऱ्यांनी ही सभा तहकूब केल्याची घोषणा केली. यानंतर गुणरत्न सदावर्ते यांनी 35 लाखांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप करत विरोधकांनी त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा ठराव मांडला. तर दुसरीकडे खुर्च्या फेकून मारल्या प्रकरणी गुणरत्न सदावर्ते यांच्या सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी विरोधकांच्या विरोधात भंडारा पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

# सीए ॲनाच्या मृत्यूची केंद्र करणार चौकशी

**प्रतिनिधी**
■ **पुणे / नवी दिल्ली**

कामाच्या अतिताणामुळे एका 26 तरुणीचा मृत्यू झाल्याचा दावा तिच्या आईने केलाय.ॲना सेबेस्टियन पेरायिल असं निधन झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट तरुणीचं नाव होतं. ॲना ही अर्न्स्ट & यंग या विख्यात कंपनीत काम करत होती.ॲनाच्या आईने यासंदर्भात पत्र लिहित कंपनीवर आरोप केले होते. आता केंद्राकडून याप्रकरणाची दखल घेण्यात आली आहे.

जुलै महिन्यात तिचं निधन झालं. मात्र मृत तरुणीच्या आईने लिहलेले भावनिक पत्र आता सोशल मीडियावर व्हायरल होतंय.चार्टर्ड अकाउंटंट असलेल्या ॲना यांच्या आईने तिच्या ऑफिस मधील वरिष्ठांवर गंभीर आरोप केले आहेत. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. मृत तरुणीच्या



आईने पत्र लिहून आपला राग व्यक्त केला आहे. ॅनाच्या कार्यालयातील वरिष्ठ तिला इतकं काम द्यायचे की ती गेल्या काही दिवसांपासून खूप तणावात होती. तिच्यावर कामाचं दबाव टाकला जात होता. कामाच्या ओझ्याखाली असलेली आमची लेक मरण पावली आहे, असा आरोप तिच्या आईने पत्रातून केलाय. आम्ही एक उत्तम कार्यालय आणि तिथले वातावरण पोषक ठेऊ आणि ॲना यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सामील होतो असं कंपनीच्या वतीने सांगण्यात आलंय.दरम्यान केंद्रीय श्रम शक्ती मंत्रालयाने या प्रकरणाची दखल घेतली असून योग्य ती चौकशी करून कार्यवाही करण्याचे आदर्श दिले आहेत.

# नेरुळमध्ये अनधिकृत झोपड्यांविरुध्द कारवाई

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या अनधिकृत झोपड्यां विरुध्द नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात कारवाई करण्यात आली.

उपरोक्त विषयानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत येणारे नेरूळ पुर्व येथील भगवान बाबा गार्डन, सेक्टर 9, नेरूळ ग्रीनलॅन्ड अपार्टमेंट जवळ नवी मुंबई महापालिका जल उदंचन केंद्रासमोर भर रस्त्यात पदपथावर अनधिकृत झोपड्या वसवण्यात आल्या आहेत. त्या झोपडपट्टयांमधून अवैध व्यवसाय सुरु असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच त्या ठिकाणी रात्री



20 ते 25 लोक फुटपाथवरच झोपत असल्यामुळे सर्वसामान्य महिलांना वाट काढणे कठीण झाले आहे. त्याचबरोबर सर्वसामान्य नागरीकांना सदर रहिवाशांचा त्रास सहन करावा लागत आहे. अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रांमधुन जाहीर करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आज "बी" विभाग नेरूळ, अतिक्रमण विभागामार्फत सदर ठिकाणावरील अनधिकृत झोपड्या हटविण्याची कारवाई करण्यात आली असून सामान जप्त करण्यात आले आहे.

## 13 वर्षीय मुलीवर बलात्कार, गुन्हा दाखल

■ **पनवेल**

तेरा वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी आरोपी फैय्याज महंमद शेख याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोकसोसह बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित मुलगी पनवेल रेल्वे स्टेशन रोड परिसरात राहणारी असून तिचे 11 सप्टेंबर रोजी अपहरण केल्याप्रकरणी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर त्या मुलीचा शोध घेतला असता तिने आरोपी फैय्याज शेख याने त्याच्या घरात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची माहिती पोलिसांना दिली. आरोपीला अद्याप अटक करण्यात आली नाही. याप्रकरणी महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सुषमा पाटील अधिक तपास करत आहेत.

# गायकवाड आणि बोंडेंना समर्थन नाही पण राहुल गांधींनी सांभाळून बोलावं - चंद्रशेखर बावनकुळे

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहुल गांधी आरक्षण विरोधी असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. एवढंच नाही तर संपूर्ण गांधी कुटुंब आरक्षणविरोधी असल्याचा आरोप त्यांनी केलाय. ते आज नागपूर येथे बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिल्या १०० दिवसाचा लेखाजोखा त्यांनी मांडला, त्यावेळी त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

आरक्षणाच्या संदर्भातील राहुल गांधी यांचे विधान अत्यंत गंभीर असून, त्यांच्या पोटातील



ओठावर आलं आहे. राहुल गांधी ज्यावेळी महाराष्ट्रात येतील त्यावेळी त्यांना ओबीसी, एसटी समाजातील सर्व एकत्रितपणे आरक्षणाबद्दल भूमिका स्पष्ट करा असं खडसावून विचारू.- चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष, भाजपा

एमएसपी वाढल्यानं शेतकऱ्यांना फायदा झालाय. शेतकऱ्यांना आधारभूत किंमतीपेक्षा जास्त भाव मिळेल. बासमती तांदूळ, कांदा उत्पादक, यांना फायदा होणार आहे. कर सवलतही दिली आहे. मोठा फायदा मध्यमवर्गीय लोकांना होताना दिसत आहे. सशक्त तरुण योजनेचे काम सुरू झाले आहे. माझी लाडली बहीण योजनेसह अनेक योजना सुरू आहेत, महिलांना रोजगार देण्याचं काम सुरू आहे.

संजय गायकवाड, अनिल बोंडे यांना समर्थन नाही : संजय गायकवाड किंवा अनिल बोंडे यांना समर्थन नाही. पण राहुल गांधी यांनी सांभाळून बोललं पाहिजे. नेहरू यांनी आरक्षण विकासाला अडसर असल्याचं म्हटलं होतं. राहुल गांधी यांनी बुद्धीहीन लोकांना आरक्षण मिळते, जे आरक्षण मिळाले ते बुद्धीहीन आहेत का? राहुल गांधी तेच म्हणत आहेत. आम्ही ठरवलं आहे जेव्हा कधी राहुल गांधी महाराष्ट्रात येतील तेव्हा त्यांना आरक्षणावर प्रश्न विचारू, मोदीजींबद्दल ते खोटे बोलले, तुमची भूमिका स्पष्ट करा नंतर बोला, अशी आमची भूमिका असल्याचं बावनकुळे म्हणाले.

# रत्नागिरीत साकारणार 40 फुटी बुद्धमूर्तीसह ध्यानकेंद्र

**प्रतिनिधी**
■ **रत्नागिरी**

शहरातील संसारे उद्यानामध्ये ४० फूट उंचीची भगवान गौतम बुद्धांची ध्यानस्थ मूर्ती असलेले ध्यानकेंद्र उभारण्यात येणार आहे. पालकमंत्री उदय सामंत यांच्या संकल्पनेतून उभारण्यात येणाऱ्या या ध्यानकेंद्रासाठी २० कोटी रुपये खर्च येणार आहे. हे महाराष्ट्रातील पहिले केंद्र असून, त्याचे काम सुरू झाले आहे. या प्रशस्त इमारतीत १२० नागरिकांना एकाचवेळी ध्यान करता येणार आहे.

या कामासाठी शासनाकडून पहिल्या टप्प्यात पाच कोटी, तर दुसऱ्या टप्प्यात १५ कोटी रुपये मिळाले आहेत. या ध्यानकेंद्रामुळे रत्नागिरी शहरात आध्यात्मिक केंद्र सुरू होणार आहे. पर्यटनवाढीसाठी पालकमंत्री सामंत यांनी रत्नागिरी शहरात ही नवी संकल्पना आणली आहे. शहरातील संसारे उद्यानात या ध्यानकेंद्राचे काम सुरू आहे. पूर्वी या उद्यानाची देखभाल दुरुस्ती होत नव्हती. त्यामुळे उद्यानाची



दुरवस्था झाली होती. मात्र, आता या जागेत हे ध्यानकेंद्र उभारले जात आहे. येथील इमारतीत नागरिकांना ध्यान सभागृह, आध्यात्मिक बुक स्टॉल, सुशोभित उद्यान आणि वाहनतळाची व्यवस्था असेल. रत्नागिरी नगर परिषदेने ध्यानकेंद्र उभारण्याचे काम स्वामी कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले आहे.

पालकमंत्री सामंत यांनी गेल्या काही दिवसांमध्ये शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी विशेष पावले उचलली आहेत. मारुती मंदिर येथील छत्रपती शिवाजी पुतळयाजवळ उभारलेली शिवसृष्टी, जिजामाता उद्यानात संभाजींचा पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा आणि स्वा. सावरकर पुतळयाजवळ म्युरल्स उभारण्यात आली आहेत.

## राष्ट्रीय सब ज्युनियर जंप रोप स्पर्धा, मुंबई उपनगरची 19 पदकांची कमाई

**मुंबई :** नांदेड येथे नुकत्याच झालेल्या २१ व्या राष्ट्रीय सब ज्युनियर जंप रोप स्पर्धेत मुंबई उपनगरच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी करताना ४ सुवर्ण, २ रौप्य, १३ कांस्य अशी एकूण १९ पदकांची कमाई केली. या स्पर्धेत विविध राज्यांतून ३०० पेक्षा जास्त खेळाडूंनी भाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष नरेंद्रदादा चव्हाण यांनी केले. क्रीडा संकुल, यशवंत महाविद्यालय येथे झालेल्या या स्पर्धेत मुंबई उपनगरच्या १२ खेळाडूंचा सहभाग होता. या स्पर्धेत मुंबई उपनगरच्या युग पटेल, आरोही कांबळे, हर्ष कांबळे, आशनी नितीन काळे, मन पटेल, उत्कर्ष शाह, मन मारू, नम्र वासानी, नैती वासानी यांनी पदके जिंकली. नम्र वासानी ने १ सुवर्ण, ३ कांस्य पदके पटकावली. तर आरोही कांबळे, नैती वासानी ने प्रत्येकी १ सुवर्ण, १ रौप्य, १ कांस्य पदक जिंकले. मन पटेलने १ सुवर्ण, २ कांस्य पदकांची कमाई केली. युग पटेलला १ सुवर्ण, १ कांस्य पदक मिळाले. प्रशिक्षक विद्धेश मोरे यांचे मार्गदर्शन खेळाडूंना लाभले. पदक विजेत्या खेळाडूंचे खास अभिनंदन मुंबई सब अर्बन जंप रोप संघटनेचे अध्यक्ष, स्वप्नील पहुरकर, सचिव, सौ. वर्षा काळे, खजिनदार, योगेश सांगळे यांनी केले.



## बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या दोन्ही प्रकारात भारत अव्वल

### खुल्या गटात चीनचा पराभव, मुलींनी जॉर्जियाचा केला पराभव

वृत्तसंस्था
■ बुडापेस्ट

FIDE चेस ऑलिम्पियाड 2024 मध्ये, सात फेऱ्या पूर्ण केल्यानंतर भारत खुल्या आणि महिला या दोन्ही प्रकारांमध्ये 14 गुणांसह अव्वल आहे. बुधवारी सातव्या फेरीत खुल्या गटात 4 सामने झाले. भारताचा युवा ग्रँडमास्टर डी गुकेशने चीनच्या वेई यीवर शानदार विजय मिळवला. त्याच्या विजयामुळे भारताने चीनचा 2.5-1.5 असा पराभव केला. तीन सामने अनिर्णित राहिले. हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेत खेळण्यासाठी चार फेऱ्या बाकी आहेत. स्पर्धेची 11वी आणि अंतिम फेरी 22 सप्टेंबर रोजी खेळवली जाईल.

महिला संघाने जॉर्जियावर 3-1 असा विजय मिळवला त्याचवेळी, भारतीय महिला संघाने बुधवारी 45 व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये जॉर्जियावर 3-1 असा शानदार विजय मिळवत आपली विजयी मोहीम सुरू ठेवली. ग्रँडमास्टर आर वैशालीने लेले जावाखिशविलीचा पराभव केला आणि वंतिक अग्रवालने बेला खोटेनाश्विलीचा चार सामन्यांत पराभव केला. हरिका द्रोणवल्ली आणि दिव्या देशमुख यांचा सामना अनिर्णित राहिला.

1,884 खेळाडू सहभागी होत आहेत 11 सप्टेंबरपासून सुरू झालेले हे ऑलिम्पियाड 22 सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. या बुद्धिबळ



ऑलिम्पियाडमध्ये खुल्या गटात 195 देश आणि महिला गटात 181 देश सहभागी होत आहेत. यात 1,884 खेळाडू (ओपनमध्ये 975 आणि महिलांमध्ये 909) भाग घेत आहेत.

1924 मध्ये पहिल्यांदा बुद्धिबळ ऑलिम्पियाड खेळले गेले बुद्धिबळ ऑलिम्पियाड ही एक बुद्धिबळ स्पर्धा आहे, ज्यामध्ये जगभरातील देशांचे संघ भाग घेतात. हे प्रथम 1924 मध्ये खेळले गेले. FIDE या स्पर्धेचे आयोजन करते. ही स्पर्धा दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. सन 2022 मध्ये भारतात प्रथमच बुद्धिबळ ऑलिम्पियाडचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा चेन्नई येथे पार पडली.

सोव्हिएत युनियनकडे सर्वाधिक 18 सुवर्णपदके आहेत. अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांकडे 6-6 सुवर्ण आहे. ऑनलाइन बुद्धिबळ ऑलिम्पियाड 2020 आणि 2021 मध्ये COVID-19 दरम्यान आयोजित करण्यात आले होते. भारताने एकदा कांस्यपदक जिंकले आहे.

## 'लोकल बॉय' अश्विन ठरला टीम इंडियाचा 'तारणहार' बिकट सुरुवातीनंतर संघाला गाठून दिला त्रिशतकी पल्ला

### पहिल्या दिवसाखेर अश्विन नाबाद १०२, जाडेजा ८६धावांवर मैदानात

वृत्तसंस्था
■ चेन्नई

टीम इंडियाची अवस्था एका वेळेस बिकट होती. भारताच्या १५० धावाही झाल्या नव्हत्या आणि त्यांनी सहा विकेट गमावल्या होत्या.पहिल्याच दिवशी भारताचा 'फ्लॉप शो' होणार, असे दिसत होते. पण यावेळी भारतासाठी तारणहार ठरला तो चेन्नईचा 'लोकल बॉय' रवीचंद्रन अश्विन. कारण अश्विनने फक्त भारताची पडझड थांबवली नाही तर शतकासह भारताला पहिल्याच दिवशी धावांचा डोंगरही उभारून दिला. अश्विनच्या शतकाच्या जोरावरच भारताला ३०० धावांचा पल्ला गाठता आला. अश्विनने यावेळी नाबाद १०२ धावांची खेळी साकारली, तर जाडेजाने नाबाद ८६ धावा फटकावल्या. त्यामुळे भारताला पहिल्या दिवस अखेर ६ बाद ३३९ अशी मजल मारता आली.

बांगलादेशने भारताविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यावेळी अश्विन भारताकडून आठव्या क्रमांकावर फलंदाजीला आला, तर जाडेजा सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. अश्विनने दमदार फटकेबाजी करत कसोटी कारकिर्दीतील सहावे शतक



**अश्विन-जाडेजाने मोडला २४ वर्षे जुना विक्रम**

*रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जाडेजा फलंदाजीसाठी मैदानात आले तेव्हा बांगलादेशच्या गोलंदाजांचे दडपण भारतीय संघावर स्पष्टपणे दिसत होते. यानंतर अश्विनने आक्रमक पवित्रा घेत पहिल्या षटकापासूनच बांगलादेशच्या गोलंदाजांवर हल्ला चढवण्यास सुरुवात केली. त्याला जडेजानेही चांगली साथ दिली आणि संघाची धावसंख्या झटपट २०० धावांच्या पुढे गेली. दोघांनी मिळून ७व्या विकेटसाठी १५० हून अधिक धावांची भागीदारी करताना २४ वर्ष जुना विक्रमही मोडीत काढला. यापूर्वी, भारताकडून बांगलादेशविरुद्ध ७व्या विकेटसाठी सर्वाधिक धावांची भागीदारी करण्याचा विक्रम सौरव गांगुली आणि सुनील जोशी यांच्या नावावर होता, ज्यांनी २००० मध्ये ढाका कसोटी सामन्यात १२१ धावांची भागीदारी केली होती, जी आता अश्विनच्या आणि जडेजाच्या नावावर आहे.*

झळकावले. महत्त्वाची बाब म्हणजे हा सामना पाहण्यासाठी त्याचे वडीलही चेपॉक स्टेडियमवर आले होते.अश्विनने १०८ चेंडूंचा सामना करत शतक पूर्ण केले. ज्यामध्ये त्याने १० चौकार आणि २ षटकार मारले.तो आता १०२ आणि रवींद्र जाडेजा ८६ धावांवर नाबाद परतले आहेत. रवींद्र जडेजा आणि रविचंद्रन अश्विन यांनी १९५ धावांची नाबाद भागीदारी केली.

बांगलादेशने टॉस जिंकत भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. बांगलादेशच्या हसन महमुदने यावेळी भारताला एकामागून एक तीन धक्के दिले. हसनने प्रथम रोहितला ६ धावांवर असताना बाद केले. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या शुभमन गिलला तर हसनने भोपळाही फोडू दिला नाही. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या विराट कोहलीकडून भारताला मोठ्या आशा होत्या. पण कोहलीला यावेळी फक्त सहा धावाच करता आल्या. त्यामुळे भारताची ३ बाद ३४ अशी दयनीय अवस्था झाली होती. यावेळी भारताची पडझड एका बाजूला शांतपणे उभा राहून यशस्वी जैस्वाल पाहत होता. यशस्वीला यावेळी ऋषभ पंतची थोड्या वेळासाठी चांगली साथ मिळाली.

पंतने यावेळी ३९ धावांची आक्रमक खेळी केली, पण चुकीचा फटका मारत तो बाद झाला. त्यामुळे ही जोडी फुटली. पण यशस्वी मात्र खेळपट्टीवर उभा होता. यशस्वीने यावेळी अर्धशतक पूर्ण केलं. पण अर्धशतकानंतर तो जास्त काळ खेळपट्टीवर टिकला. नाही यशस्वीने यावेळी ९ चौकारांच्या जोरावर ५६ धावांची खेळी साकारली. यशस्वी बाद झाल्यावर लोकेश राहुलली लगेच बाद झाला आणि भारताची ६ बाद १४४ अशी वाईट अवस्था झाली होती.

## अफगाणिस्तानने रचला इतिहास, प्रथमच दक्षिण आफ्रिकेला केले पराभूत



वृत्तसंस्था
■ शारजाह

अफगाणिस्तानने दक्षिण आफ्रिकेला प्रथमच कोणत्याही आंतरराष्ट्रीय फॉर्मेटमध्ये पराभूत करून इतिहास रचला आहे. बुधवारी शारजाहच्या मैदानावर झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात संघाने दक्षिण आफ्रिकेला 106 धावांत आटोपले. त्यानंतर 26 षटकांत 4 गडी गमावून लक्ष्य गाठले. अफगाणिस्तानकडून वेगवान गोलंदाज फजलहक फारुकीने 4, अल्लाह गझनफरने 3 आणि राशिद खानने 2 बळी घेतले. फलंदाजीमध्ये गुलबदिन नायबने 34 धावा आणि अजमतुल्ला उमरझाईने 25 धावा केल्या. ज्यामुळे संघाला सहज विजय मिळवता आला. यासह अफगाणिस्तानने 3 सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

अफगाणिस्तानचा ऐतिहासिक विजय तिन्ही फॉरमॅटमध्ये अफगाणिस्तानने प्रथमच दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला. याआधी दोन्ही संघांमध्ये 3 टी-20 आणि 2 वनडे सामने खेळले गेले आहेत. दक्षिण आफ्रिकेने सर्व जिंकले होते. अफगाणिस्तानने आता इतिहास बदलला आणि दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले.

T-20 विश्वचषकातील पराभवाचा स्कोअर निकालात काढला या वर्षी 26 जून रोजी टी-20 विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत दोन्ही संघ शेवटचे आमनेसामने आले होते. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानला 56 धावांत ऑलआउट केले. दक्षिण आफ्रिकेने अवघ्या 9 षटकांत पुन्हा सामना जिंकला. अफगाणिस्तानने आता बरोबरी साधली आणि एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेला 106 धावांत गुंडाळले. त्यानंतर अवघ्या 26 षटकांत सामना जिंकला.

वेन मुल्डरने अर्धशतक ठोकले नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेची सुरुवात खूपच खराब झाली. 36 धावांवर संघाने 7 विकेट गमावल्या. टोनी डीजॉर्ज केवळ 11, काइल व्हॅरियन 10 आणि रीझा हेंड्रिक्स केवळ 9 धावा करू शकले. 3 फलंदाजांना खातेही उघडता आले नाही, तर कर्णधार एडन मार्करामला केवळ 2 धावा करता आल्या.

त्यानंतर वेन मुल्डरने अर्धशतक झळकावले आणि संघाला 100 धावांच्या पुढे नेले. त्याच्यासोबत बॉर्न फॉर्च्युनने 16 धावा केल्या. नांद्रे बर्जरने एक धाव घेतली, तर लुंगी एनगिडीला खातेही उघडता आले नाही. संघाला 33.3 षटकात केवळ 106 धावा करता आल्या.

## मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनचे निवासी पंच प्रशिक्षण शिबिर

■ मुंबई

येत्या २१ व २२ सप्टेंबर रोजी मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनच्या वतीने पंचांचे निवासी प्रशिक्षण शिबिर राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे श्रमसाफल्य निवास, खंडाळा येथे आयोजित करण्यात आले आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष अमोल गजानन कीर्तीकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन २१ सप्टेंबर, दुपारी ३ वाजता होईल. या शिबिरात मीनानाथ धानजी, तांत्रिक समिती अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आणि मालोजी भोसले, तांत्रिक समिती सचिव, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन हे मार्गदर्शन करतील. सामन्यांवरील पंचांची कामगिरी, देहबोली - निर्णय क्षमता, पंचांची सेवा ज्येष्ठता, पंचांचा आत्मसन्मान, पंचांची सुरक्षितता या विषयावर देखील शिबिरात चर्चा आयोजित करण्यात आली आहे.

रविवारी शिबिरात कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. या शिबिराच्या प्रवेशाबाबत सचिन नाक्ती, मोबाईल क्रमांक : ७५०६०३५१२८, नरेंद्र लाड, मोबाईल क्रमांक : ९१६७३५३५६५, प्रशांत भगत, मोबाईल क्रमांक : ९७६९८३९३५१ यांच्याशी संपर्क साधावा.

## घाटकोपरमध्ये तरुणाची हत्या

**मुंबई :** घाटकोपरमध्ये पूर्ववैमनस्यातून चौघांनी दोन तरुणांवर धारदार हत्याराने वार केले. या घटनेत एका तरुणाचा मृत्यू झाला असून गुन्हे शाखेने याप्रकरणी चार आरोपींना अटक करून घाटकोपर पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले.घाटकोपरच्या भटवाडी परिसरात राहणारा परेश गोटल (२८) याचा परिसरात राहणाऱ्या तरुणांसोबत काही महिन्यांपूर्वी वाद झाला होता. तो मंगळवारी रात्री परिसरातून जात असताना पुन्हा आरोपींसोबत त्याचा वाद झाला. यावेळी आरोपींनी त्याला बेदम मारहाण केली. त्यानंतर त्याच्यावर धारदार चाकूने अनेक वार केले. त्याला वाचवण्यासाठी आलेल्या त्याच्या भावावरही आरोपींनी वार केले. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले. दोघांना तत्काळ राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वी परेशचा मृत्यू झाला. तर त्याच्या भावावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## शिंदे गटाचे संजय गायकवाड यांच्या विरोधात काँग्रेस आणि भीमशक्ती संघटनेची निदर्शने

### खासदार चंद्रकांत हांडोरे यांच्या नेतृत्वाखाली कारवाईची झाली मागणी

■ मुंबई

काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांच्या विरोधात शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी वादग्रस्त विधान केल्याच्या निषेधार्थ दक्षिण मध्य मुंबई जिल्हा काँग्रेस तसेच भीमशक्ती या संघटनेच्या वतीने आज चेंबूर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी गायकवाड यांच्यावर कडक कारवाईची मागणी करत आंदोलनकर्त्यांनी त्यांच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या.

खासदार राहुल गांधींची जीभ जो छाटेल त्याला ११ लाख रुपये बक्षीस देण्यात येईल असे चिथावणीखोर आणि वादग्रस्त व्यक्तव बुलढाण्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केले होते. हा मोर्चा काँग्रेसनेते आणि खासदार चंद्रकांत हांडोरे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आले. यावेळी हुकुमराज मेहता, संगीताताई हंडोरे, शशिकांत बनसोडे, एन. के. कांबळे, विजय मोरे, आदी पदाधिकारी सहभागी झाले होते. त्यांनी संजय गायकवाड या मस्तवाल आमदारावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 'जागतिक कृषी पुरस्कारा'ने गौरव

प्रतिनिधी
■ मुंबई

जागतिक कृषी पुरस्कारामुळे महाराष्ट्राच्या शाश्वत शेतीच्या प्रयत्नांवर जगाने मोहोर उमटवली आहे. महाराष्ट्राने नेहमीचे भारतातील कृषी क्षेत्रात प्रयोगशीलता राबवल्याचे या पुरस्कारामुळे सिद्ध झाले, अशा शब्दांत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रदान करण्यात आलेल्या जागतिक कृषी पुरस्कारांबद्दल कौतुकोद्गार काढले आहेत.

पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या कामाची दखल घेऊन



'वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरम'कडून त्यांना जागतिक कृषी पुरस्काराने काल सन्मानित करण्यात आले. फोरमचा हा दुसराच पुरस्कार असून हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुख्यमंत्री + शिंदे यांना प्रदान करण्यात आला. जागतिक बांबू दिनाच्या औचित्याने या समारंभाचे आयोजन करण्यात आले. एनसीपीएच्या सभागृहात झालेल्या या समारंभास महाराष्ट्र कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, 'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम'चे अध्यक्ष डॉ. रुडी रॅबिंगे, फोरमचे आशिया प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. विलियम्स दार, आफ्रिका प्रांताचे उपाध्यक्ष प्रो. लिंदवे सिंबादा, अमेरिका प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. केनिथ क्वीन, फोरमचे भारतातील संचालक तथा इंडियन चेंबर ऑफ फूड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष डॉ एमजे खान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमचा जागतिक कृषी पुरस्कार हा महाराष्ट्रातील राबणाऱ्या शेतकऱ्यांना अर्पण करत असल्याचे नमूद करून महाराष्ट्राला शेतीच्या क्षेत्रातही पहिल्या क्रमांकाचे राज्य बनविण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

## शिवसेना महिला आघाडीचे सुनील केदार यांना 'जोडे मारो'

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना बंद करण्याच्या वक्तव्याचा केला निषेध



■ मुंबई

सत्तेत आल्यास मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना बंद करु, असे वक्तव्य करणाऱ्या काँग्रेसच्या सुनील केदार यांच्याविरोधात काल मुंबईत शिवसेना महिला आघाडीने जोडे मारो आंदोलन केले. लाडकी बहिण योजनेचा विरोध करणाऱ्या काँग्रेसी मानसिकतेचा महिला शिवसैनिकांनी धिक्कार केला. या आंदोलनात आमदार यामिनी जाधव, प्रवक्त्या आणि माजी आमदार डॉ. मनिषा कायंदे, शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांच्यासह शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या.

परदेशात जाऊन आरक्षण रद्द करण्याचे भाष्य करणारे काँग्रेस नेते राहुल गांधी आणि सुनील केदार विरोधात शिवसेना महिला आघाडीकडून मुंबईतील बाळासाहेब भवन येथे जोडे मारो आंदोलन करण्यात आले. परदेशात जाऊन देशाचा अपमान करणे, पंतप्रधानांबद्दल अपशब्द बोलणे, आरक्षण रद्द करण्याची भाषा नतद्रष्ट काँग्रेसचे लोक करत आहे, अशी टीका डॉ. मनिषा कायंदे यांनी केली. त्या पुढे म्हणाल्या की, नागपूर जिल्हा बँक घोटाळ्यातील जामिनावर सुटलेला आरोपी सुनील केदार याला राज्यातील महिला धडा शिकवतील. काँग्रेस नेत्यांकडून वारंवार महिलांचा अपमान केला. शाहबानो या मुस्लिम महिलेला घटस्फोटातून पोटगी मिळू नये म्हणून काँग्रेसने विरोध केला होता. यातून काँग्रेस महिला विरोधी असल्याची टीका डॉ. कायंदे यांनी केली.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. २१/२०२४- २०२५ (मुंबई) करीता**

दिनांक १३/०८/२०२४ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक वृत्तमानस, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मिलेनियम बिझनेस पार्कची देखभाल व दुरूस्ती.. महापे येथील मिलेनियम बिझनेस पार्क सेक्टर- ३ मधील इमारत क्र.७ चे रेट्रो फिटिंग व वॉटर प्रूफिंग उच्च शक्तीचे फायबर ग्लास रिपेअर मोर्टर (थर्मोसेट) व टॅक्टाइल क्वालिटी ऍक्रेलिक सिंथेटिक रोमी व्हिस्कस पेस्टसह करणे. | ₹३९,७४,१०४.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २५/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

जा.क्र./का.अ.(मुख्या)/ P-316822 /२०२४

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र. उप.प्र.अभि./इ.प्र./५५०६/पी व आर/प.उ.-२ दि. १९/०९/२०२४

**जाहीर सूचना**

संस्कृती भवन (इमारत भवन) प. उ.-२ यांच्या कार्यालयात दैनंदिन स्वच्छता करण्यासाठी हाऊस किपींगची सेवा पुरविण्यासाठी दि.01.10.2024 ते दि.31.03.2025 पर्यंत कंत्राटी कामगारांची नेमणूक करावयाची आहे. यासाठी सदर कामासाठी फक्त स्थानिक अनुभवी अशासकीय संस्थांची सोडत पध्दतीने निवड करण्याबाबतची जाहीर सूचना म.न.पा. संकेतस्थळावर Portal.mcgm.gov.in प्रदर्शित करण्यात आली आहे. सदर निविदेची तारीख दि. 27.09.2024 आहे.

इच्छुक संस्था या योजनेची सर्व माहिती मुख्य लिपिक (व्यय) इमारत प्रस्ताव (प.उ.-२) यांच्या कार्यालयात कोणत्याही कामाच्या दिवशी शनिवार व सुट्टीचा दिवस सोडून लेखी अर्ज रु.950/- अधिक 18% जीएसटी या किमतीत रोख स्वरुपात चलन काढून दि. 23.09.2024 ते दि. 26.09.2024 या दिवशी सकाळी 10.30 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत विकत घेऊ शकतात. तसेच E.M.D. Deposit दि.27.09.2024 रोजीपर्यंत दुपारी 1.00 वाजेपर्यंत भरता येईल.

पीआरओ/१३१५/जाही/२०२४-२५

सही/-
उप-प्रमुख अभियंता (इ.प्र.) प. उ.-२

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई**
**(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक )**
म्हाडा MHADA

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२१८७७८५ ईमेल - rreeamhada@gmail.com

**ई - निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता अ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, कुलाबा संक्रमण शिबिर, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४००००५ यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता मुंबई शहर जिल्हातील मुं.इ दु व पु मंडळ म्हण्डा, सा.बा.वि., कें.सा.बां.वि. रेल्वे, सिडको, एमएमआरडीए व बूमनपा मधील नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी १ नमुन्यातील शतमान तत्वावर ई- निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | इमारत दुरुस्ती क्रमांक | निविदा ठेवलेली रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | निविदा शुल्क (विना परतावा) | कामाची करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इमारत क्र. ७ ७डी, ९-९, ११-११एफ, मुसाफिरखाना रोड, मुंबई. (मंडळ निधिचे काम) | २५,८१,२६५/- | २५,८१३.०० | ५२०००.० (५०% FDR स्वरुपात व ५०% देयकातून) | वर्ग - ५अ व त्यावरील | रु.५९०.०० | १८ महिने (पावसाळासह) |

| अ.क्र. | स्टेज | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | जाहिरात दिनांक | २०.०९.२०२४ |
| २ | निविदा विक्री सुरुवात दिनांक (ऑनलाईन) | २०.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून |
| ३ | निविदा विक्री बंद दिनांक (अनिलाईन) | २७.०९.२०२४ सध्यांकाळी ५.३० पर्यंत |
| ४ | निविदा स्विकृती सुरुवात दिनांक (ऑनलाईन) | २०.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून |
| ५ | निविदा स्विकृती अंतिम दिनांक (ऑनलाईन) | २७.०९.२०२४ सध्यांकाळी ५.३५ पर्यंत |
| ६ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ३०.०९.२०२४ सकाळी ११.०० पासून |
| ७ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | ३०.०९.२०२४ दुपारी १२.०० पासून |

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाई(ई-निविदा) दोन लिफाफे पध्दतीची असेल. निविदेसंबंधी सुचना, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाची संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द होईल.
२. निविदा संबंधित दस्तऐवज अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर पाहून डाऊनलोड/अपलोड करता येईल, तसेच निविदा फार्म दिनांक २०.०९.२०२४ (सकाळी १०.०५ बाजूपासून) ते दिनांक २७.०९.२०२४ (सध्यांकाळी ५.४५ पर्यंत) संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल.
३. वरील निविदेचे निविदा शुल्क व इसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावे लागेल.
४. तांत्रिक निविद्य दिनांक ३०.०९.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून कार्यकारी अभियंता अ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, कुलाबा संक्रमण शिबिर, कफ परेड, कुलाबा, मुंबई यांचे दालनात संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल.
५. निविदाकाराने निविदा सादर करताना अपलोड केलेली सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी तांत्रिक निविदा उघडण्याच्या वेळी सादर करावीत.
६. निविद्यकाराने सादर केलेली माहिती व स्कॅन केलेल्या प्रती pdf फॉरमॅट मध्ये तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावी.
७. निविदाकाराचे डीजीटल हस्ताक्षर हे वर्ग २/३ असावे.
८. कार्यकारी अभियंता अ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, यांचेकडे ( निविदा स्विकृती अधिका-यांकडे) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहिल.
९. निविदा जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधणकारक आहे.
१०. निविदाकारास निविदासंबंधीची संपूर्ण माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावरुन मिळवावी.
११. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराणे काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजुर केली जाईल अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर सूचना पाहावी.

CPRO/A/704


Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता अ-विभाग,
मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## पार्सल देण्यास उशीर झाल्याने महिलेची शिवीगाळ, फूड डिलीव्हरी बॉयची आत्महत्या

**चेन्नई:** पार्सल आणायला उशीर झाला म्हणून फूड डिलीव्हरी करणाऱ्या बॉयला अनेकवेळा बेदम मारहाण झाल्याच्या घटना अनेकदा समोर आल्या आहेत. एवढंच नाही तर डिलीव्हरी बॉयला मारहाणीच्या घटनांचे व्हिडीओ देखील अनेकदा सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचे पाहायला मिळतात. आता अशीच एक धक्कादायक घटना तामिळनाडूच्या चेन्नईमध्ये घडली आहे. एका फूड डिलीव्हरी बॉयने पार्सल देण्यास उशीर केल्यामुळे एका महिला ग्राहकाने शिवीगाळ करत तक्रार दिल्याने फूड डिलीव्हरी बॉयने आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. तामिळनाडूच्या कोलाथूरमधील एका १९ वर्षीय फूड डिलीव्हरी बॉयने मंगळवारी राहत्या घरी आत्महत्या केली. मात्र, आत्महत्या करण्याच्या आधी फूड डिलीव्हरी बॉयने एक सुसाईड नोट लिहून ठेवली होती. सुसाईड नोट समोर आल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली. सुसाईड नोटमध्ये म्हटलं की, आपण किराणा सामान देण्यासाठी एका ग्राहकाकडे गेलो होतो. मात्र, त्या महिला ग्राहकाने आपल्याला शिवीगाळ केली. त्यामुळे आत्महत्या करत असल्याचं सुसाईड नोटमध्ये म्हटलं आहे.



## केंद्रीय मंत्री बिट्टु यांच्यावर FIR

नवी दिल्ली

राहुल गांधींविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी केंद्रीय मंत्री रवनीत सिंह बिट्टू यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. कर्नाटक प्रदेश काँग्रेस कमिटीच्या एका अधिकाऱ्याने याबाबत तक्रार केली होती. भारतीय न्याय संहितेच्या कलम 353 (2) (खोटी माहिती किंवा अफवा पसरवणे), 192 (दंगल भडकवण्याचा प्रयत्न) आणि 196 (धर्म किंवा जातीच्या आधारावर द्वेष पसरवणे) अंतर्गत बिट्टू यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर केंद्रीय मंत्री म्हणाले की, मी माझ्या वक्तव्याबद्दल माफी मागणार नाही, तर गांधी कुटुंबाने पंजाब जाळल्याचे संसदेत सांगेन. पंजाबमध्ये आम्ही आमच्या अनेक पिढ्या गमावल्या आहेत.

# सोनिया आणि राहुल गांधींचे अपशब्द विसरलात का?

## भाजपाध्यक्ष नड्डा यांचा खर्गेंना टोला

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

भाजप आणि काँग्रेसमध्ये पत्रांद्वारे आरोप-प्रत्यारोपांची फेरी सुरू झाली आहे. याआधी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून राहुल गांधींविरोधात केल्या जाणाऱ्या वादग्रस्त वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली होती. आता भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी खर्गे यांना पत्र लिहून प्रत्युत्तर दिले आहे.



नड्डा यांनी आपल्या पत्रात लिहिले की, खर्गे यांना आपल्या राजकीय अपरिहार्यतेमुळे वारंवार अपयशी ठरलेल्या प्रॉडक्टला वारंवार लॉन्च करण्याच्या प्रयत्नात पंतप्रधान मोदींना पत्र लिहिले आहे. मात्र, ते पत्र वाचल्यानंतर काँग्रेस पक्ष अद्यापही सत्यापासून दूर असल्याचे स्पष्ट होते. खर्गे यांनी यांचे पत्र पाहता त्यांनी राहुल गांधींसह आपल्या अन्य नेत्यांच्या गैर वक्तव्यांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. ज्या व्यक्तीने देशाच्या पंतप्रधानांसह संपूर्ण ओबीसी समाजाला चोर म्हणत शिवीगाळ केली , देशाच्या पंतप्रधानांसाठी अत्यंत अशोभनीय शब्द वापरले, पंतप्रधानांना मारहाण करण्याची भाषा केली; त्या राहुल गांधी यांच्यासाठी खर्गे यांनी पत्र लिहिणे कितपत योग्य आहे, असा सवाल खर्गे यांनी विचारला आहे.

राहुल गांधी यांच्या मातोश्रींनीच पंतप्रधान मोदी यांच्यासाठी 'मौत का सौदागर' शब्द वापरला होता, याची आठवण नड्डा यांनी खर्गेंना करून दिली. ते पुढे म्हणाले, देशातील सर्वात जुना राजकीय पक्ष आता आपल्या प्रसिद्ध राजपुत्राच्या दबावाखाली 'कॉपी अँड पेस्ट' पक्ष बनला आहे, हे अत्यंत खेदजनक आहे. काँग्रेस पक्ष आता राहुल गांधींचे दुर्गुण स्वीकारू लागला आहे.

काँग्रेस आणि कंपनीच्या नेत्यांनी गेल्या 10 वर्षात 110 पेक्षा जास्त वेळा देशाच्या पंतप्रधानांना शिवीगाळ केली आहे आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे यात काँग्रेसचे सर्वोच्च नेतृत्वही सहभागी आहे. त्यावेळी काँग्रेसच्या शब्दकोशातून राजकीय शुद्धता, शिष्टाचार, शिस्त, शिष्टाचार हे शब्द का गायब होतात का असेही नड्डा यांनी म्हटले आहे.

## आयपीएस अधिकारी शिवदीप लांडेंचा तडकाफडकी राजीनामा

वृत्तसंस्था
पाटणा

बिहार केडरचे मराठमोळे आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांनी पोलीस सेवेचा राजीनामा दिला आहे. यासंदर्भातील माहिती शिवदीप लांडे यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून दिली आहे. शिवदीप लांडे यांनी जवळपास १८ वर्ष पोलीस खात्यात सेवा केली आहे. शिवदीप लांडे यांना बिहारमधील सिंघम म्हणून ओळखलं जातं. दरम्यान, शिवदीप लांडे यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. त्यांनी अचानक राजीनामा का दिला? याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही.

"जय हिंद! माझा प्रिय बिहार, गेली १८ वर्षे शासकीय पदावर सेवा दिल्यानंतर आज मी या पदाचा राजीनामा दिला आहे. एवढ्या वर्षात मी बिहारला माझ्या आणि माझ्या कुटुंबापेक्षा वरचढ मानले आहे. माझ्या सरकारी नोकरीच्या कार्यकाळात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्याबद्दल मी माफी मागतो. आज मी भारतीय पोलीस सेवेचा (आयपीएस) राजीनामा दिला आहे. परंतु, मी बिहारमध्येच राहीन आणि भविष्यातही बिहार माझे कार्यस्थान असेल", असं शिवदीप लांडे यांनी आपल्या फेसबुक पोस्टमध्ये म्हटलं आहे.

शिवदीप लांडे हे बिहार केडरचे आयपीएस अधिकारी असले तरी त्यांनी महाराष्ट्र पोलीस सेवेतही काही वर्ष काम केलेलं आहे. मुंबईमध्ये अंमली पदार्थ विरोधी पथकात असताना त्यांनी अनेक धडाकेबाज कारवाया केल्या होत्या. शिवदीप लांडे यांना गुन्हेगारांवर बेधडक कारवाई करण्यासाठी ओळखलं जायचं. अंमली पदार्थ विरोधी पथकात कार्यरत असताना त्यांनी अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर चांगलाच वचक बसवला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक ठिकाणी यशस्वी छापे टाकण्यात आले होते.



शिवदीप लांडे २००६ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असून ते मूळ महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील आहेत. दरम्यान, काही आठवड्यांपूर्वी शिवदीप लांडे यांची बिहारमधील पूर्णियामध्ये आयजी पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी या पदाची जबाबदारीही स्वीकारली होती. मात्र, आयजी पदाचा पदभार घेऊन काही दिवस होताच शिवदीप लांडे यांनी आज (१९ सप्टेंबर) आपल्या पोलीस सेवेचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे शिवदीप लांडे यांनी तडकाफडकी राजीनामा देण्याचं कारण काय? याबाबत आता अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

पान १ वरुन

### पूर्वीचे सरकार हफ्ते घेणारे पण आम्ही देणारे...

ही योजना जितकी बदनाम कर्ता येईल तेवढी विरोधकांनी केली. या योजनेच्या विरोधात कॉंग्रेस आहे. कॉंग्रेसने गेल्या 60 वर्षात देशाचे वाटोळे केले, त्या कॉंग्रेसला माझ्या लाडक्या बहीणींचा सुखी संसार कसा आवडणार? आणि म्हणून त्यांच्याकडून आपण काय अपेक्षित करणार. अशा विरोधकांशी कशाला ठेवायचं नातं, कायमचे बंद करा त्यांचं खातं. ज्या लोकांनी माझ्या लाडक्या बहीणींच्या या योजनेत खोडा घालण्याचा प्रयत्न केला आहे त्या लोकांना माझ्या या बहिणी योग्य वेळेला जोडा दाखवल्याशिवाय राहणार नाहीत, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कालच कोणी तरी म्हणाले या योजनेची काही फायदा होणार नाही. मी यांना एवढेच सांगतो की कुठल्याही राजकीय लाभासाठी ही मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना चालू केलेली नाही. राज्यातल्या माता भगिनींच्या आयुष्यात सुखाचे समाधानाचे दिवस आले पाहिजे हीच आमची भावना आहे. मघाशी अजित पवारांनी सांगितले की 33 हजार कोटी या योजनेसाठी बाजूला काढले आहेत. ही योजना कायम सुरू राहील. आम्ही तुमचे भाऊ तुम्हाला सांगतो या दीड हजारचे दोन हजार होतील, तुम्ही आणखी ताकद दिली तर दोनचे तीन हजार होतील. या पेक्षाही जास्त देण्याची संधी मिळाली तर आम्ही हात आखडता घेणार नाहीत, हा शब्द आपल्याला देतो. कारण ही गरीबी आम्ही पहिली आहे. सर्वसामान्य कुटुंबातून आम्ही आलो आहेत. मी सुद्धा शेतकऱ्याचा मुलगा आहे, महिन्याची काटकसर काय असायची ही मी माझे आईच्या डोळ्यात पाहिली आहे. माझ्या पत्नीच्या डोळ्यात पाहिली आहे. एकनाथ शिंदे म्हणाले, सर्वसामान्यांसाठी दीड हजार म्हणजे छोटी रक्कम नाही, दीड हजार म्हणजे वर्षाचे 18 हजार. दोन बहिणी असतील तर वर्षाला 36 हजार रुपये, सासूबाई असल्या तर त्यांचे वर्षाला 18 हजार रुपये, 54 हजार रुपये वर्षाचे. गॅस सिलिंडर मोफत देतो त्याचे वर्षाचे 2400 रुपये, किसान सन्मान योजना शेतकऱ्यांसाठी 6 हजार केंद्राचे आणि 6 हजार राज्य सरकारचे असे 12 हजार रुपये आपण वर्षाचे देतो. यासोबत मुलींचे शिक्षण देखील मोफत करत आहोत. तसेच ज्यांना डॉक्टर व्हायचे आहे, इंजीनियर व्हायचे आहे, ज्या मुलींना उच्च शिक्षण घ्यायचे आहे अशा मुलींच्या शिक्षणाची फी माफ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. एकनाथ शिंदे म्हणाले, शेतकऱ्यांचे आपण वीज बिल माफ करत आहोत, त्याचे तर पैसे आपण धरतच नाही. मुलीचा जन्म झाला 5 हजार, पहिलीत गेली 6 हजार, पाचवीत गेली 7 हजार, अकरावीत गेली 8 हजार, वयाच्या आठराव्या वर्षांपर्यंत त्या मुलीच्या खात्यात एक लाख रुपये टाकण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. केंद्राच्या आणि राज्याच्या या सगळ्या योजनांमधून आम्हाला यांच्या लाडक्या बहिणींना लखपती झालेले बघायचे आहे.

# अमेरिकेतील न्यायालयाचं भारत सरकार व अजित डोवालांना समन्स

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नूच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी दिवाणी खटला दाखल केल्यानंतर अमेरिकेतील एका न्यायालयाने या प्रकरणी भारत सरकारला समन्स बजावलं आहे. न्यूयॉर्कमधील जिल्हा न्यायालयाने जारी केलेल्या समन्समध्ये भारत सरकार, भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, आर अँड एडब्ल्यूचे (रॉ) माजी अध्यक्ष सामंत गोयल, रॉचे एजंट विक्रम यादव आणि अमेरिकास्थित भारतीय व्यापारी निखिल गुप्ता यांची नावं आहेत. न्यायालयाने २१ दिवसांमध्ये या समन्सला उत्तर देण्यास सांगितलं आहे.



भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने यावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटलं आहे की "ही चिंतेची बाब आहे. आम्ही याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी सुरू केली आहे". परराष्ट्र मंत्रालयाची बाजू मांडताना अरिंदम बागची म्हणाले, "एका भारतीय व्यक्तीविरोधात अमेरिकेतील न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे. एक हत्येच्या कटाचं प्रकरण भारतीय अधिकाऱ्याशी जोडलं गेलं आहे, हा आमच्यासाठी चिंतेचा विषय आहे. हे आमच्या सरकारी धोरणाविरोधात आहे. त्यामुळे आम्ही याप्रकरणी चौकशी करत आहोत".

यावर्षी, मे महिन्यात भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर याप्रकरणी प्रतिक्रिया देताना म्हणाले होते की "भारत या प्रकरणाची कसून चौकशी करत आहे". दरम्यान, या प्रकरणाचा भारत व अमेरिकेच्या संबंधांवर कोणताही परिणाम होणार नाही असं जयशंकर यांनी म्हटलं होतं. पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले होते, "अमेरिकेने चांगल्या भावनेने काही माहिती आमच्या निदर्शनास आणून दिली आहे. कारण तिथे घडलेल्या काही घटना या आमच्या संबंधांवर परिणाम करू शकतात. आम्ही त्या प्रकरणाची कसून चौकशी करत आहोत. या प्रकरणात भारताचा कसलाही सहभाग नाही. त्यामुळे, या प्रकरणाचा उभय देशांच्या संबंधांवर कसल्याही प्रकारचा परिणाम होणार नाही".

अमेरिकेचे भारतातील राजदूत एरिक गार्सेटी यांनी एनडीटीव्हीला सांगितलं की, "आम्हालाही असं वाटत नाही की या प्रकरणाचा भारत व अमेरिकेच्या संबंधांवर परिणाम होईल". गुरपतवंतसिंग पन्नू हा भारत, भारतीय नेते व भारतीय संस्थांविरोधात भडकाऊ भाषणं द्यायचा. तो भारताला नेहमी धमक्या द्यायचा. केंद्र सरकारने २०२० मध्ये त्याला दहशतवादी घोषित केलं होतं.

## मस्क यांच्या कंपनीने अंधांसाठी बनवले उपकरण

### अमेरिकेच्या एफडीएने दिली मंजुरी

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

एलन मस्क यांच्या ब्रेन-चिप स्टार्टअप कंपनी न्यूरालिंकने अंधांसाठी एक उपकरण तयार केले आहे. कंपनीचा दावा आहे की ज्यांचे दोन्ही डोळे गेले आहेत त्यांनाही हे उपकरण पाहण्यास मदत करेल. या डिव्हाइसला अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) मान्यता मिळाली आहे. न्यूरालिंकने या उपकरणाला ब्लाइंडसाइट असे नाव दिले आहे.

मस्क म्हणाले की, ज्यांचे दोन्ही डोळे गेले आहेत किंवा ज्यांच्या ऑप्टिक नर्व्हला इजा झाली आहे त्यांच्यासाठी हे उपकरण उपयुक्त ठरेल. जन्मापासून अंध असलेल्यांना हे उपकरण दिसण्यास मदत करेल, असा दावाही करण्यात आला आहे.

डिव्हाइसवर पूर्वीपेक्षा कमी रिझोल्यूशनमध्ये दिसेल मस्क यांनी म्हटले की, हे उपकरण सुरुवातीला कमी-रिझोल्यूशनमध्ये दिसेल. हळूहळू दृष्टी सुधारेल. एवढेच नाही तर उपकरण बसवणाऱ्या व्यक्तीला इन्फ्रारेड आणि अल्ट्राव्हायोलेट लहरीही पाहता येणार आहेत.

## जरांगेंना बिग बॉसमध्ये घ्या !

पान 1 वरुन...

स्वतः शरद पवारही आले तरी ओबीसी आरक्षण कुणीच संपवू शकत नाही. त्यांनी आपल्या आंदोलनाच्या बॅनरवर तुतारीचे चिन्ह टाकावे. त्यानंतर बारामतीच्या इशाऱ्यानुसार आंदोलन करावे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जरांगे नामक व्यक्तीच्या सांगण्यानुसार हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट व बॉम्बे गॅझेट लागू करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना हा अधिकार कुणी दिला? त्यांना कायदा नावाची गोष्ट तरी कळते का? असा कटू सवालही लक्ष्मण हाके यांनी यासंबंधी उपस्थित केला. या माणसाच्या सूचनेनुसार महाराष्ट्राचा मुख्यमंत्री जीआर काढतो, याची आम्हाला लाज वाटते. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण या माणसांना आंतरवाली सराटीला जाण्यास वेळ आहे. पण ओबीसीच्या एकाही आंदोलकाला भेटण्यासाठई वेळ नाही. राहुल गांधी तुम्ही ओबीसीची भाषा करता, पण पृथ्वीराज चव्हा नामक जातीवादी माणूस आंतरवाली सराटीला जाऊन आला. त्यांनीही ओबीसींची भावना जाणून घ्यावी, असे ते म्हणाले. बिग बॉसच्या लोकांनी या जरांगेंना आपल्या कार्यक्रमात घेतले पाहिजे. माझी त्यांना विनंती आहे. कारण, जरांगेंची त्याहून अधिक लायकी नाही, असे हाके म्हणाले.

## 'पन्नू प्रकरणी' भारताला अमेरिकन कोर्टाचे समन्स

### दहशतवादी पन्नूवर हत्येचा कट रचल्याचा गुन्हा

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू याच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी अमेरिकेतील न्यायालयाने मंगळवारी भारत सरकारला समन्स पाठवले. या समन्समध्ये भारताचे NSA अजित डोवाल, माजी RAW प्रमुख सामंत गोयल, RAW एजंट विक्रम यादव आणि उद्योगपती निखिल गुप्ता यांचीही नावे आहेत.

अमेरिकन कोर्टाने या समन्सला 21 दिवसांत उत्तर देण्यास सांगितले आहे. पन्नूने हत्येचा कट रचल्याप्रकरणी अमेरिकेतील जिल्हा न्यायालयात खटला दाखल केला होता. न्यूयॉर्कमध्ये पन्नू यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा कट रचल्याचा आरोप अमेरिकेने गेल्या वर्षी केला होता. यात भारताचा हात होता. हा कट उधळून लावला.

समन्सला उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, हे समन्स पूर्णपणे चुकीचे आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, ही बाब आमच्या निदर्शनास आल्यावर आम्ही कारवाई केली. याप्रकरणी उच्चस्तरीय समितीही स्थापन करण्यात आली आहे.

अमेरिकन सरकारने जूनमध्ये उत्तरे मागवली होती 26 जून रोजी अमेरिकेने खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू यांच्याविरुद्ध हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी भारताकडे जबाबदारी मागितली होती. आम्ही हा मुद्दा थेट भारत सरकारकडे मांडला आहे, असे अमेरिकन सरकारचे उप परराष्ट्र सचिव कर्ट कॅम्पबेल यांनी सांगितले होते. तपास समितीकडूनही अहवाल मागवण्यात आला होता. वास्तविक, भारतीय नागरिक निखिल गुप्ता याला चेक रिपब्लिक पोलिसांनी पन्नूच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी 30 जून 2023 रोजी अटक केली होती. निखिलचे 14 जून 2024 रोजी अमेरिकेला प्रत्यार्पण करण्यात आले.

## कर्नाटकातील भाजप आमदारावर बलात्काराचा गुन्हा दाखल

**बंगळुरु :** कर्नाटकातील राजराजेश्वरी नगरमधील भाजप आमदार मुनीरत्ना यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना एका खासगी रिसॉर्टमध्ये घडली. आमदारासह सात जणांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. मुनीरत्न आधीच न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यांच्यावर ठेकेदाराला धमकावणे, शिवीगाळ करणे आणि मारहाण केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी मुनीरत्न यांना 14 सप्टेंबर रोजी अटक केली. 30 सप्टेंबरपर्यंत ते न्यायालयीन कोठडीत आहेत. भाजप आमदार मुनीरथना यांच्यावर दलित ठेकेदार चेल्वराजू यांना जीवे मारण्याची धमकी, जातीवर आधारित शिवीगाळ आणि लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. कोलार जिल्ह्यातील मुलबागल शहराजवळील नांगली गावातून त्याला अटक करण्यात आली.



**मुंबई ।** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सवाला प्रचंड गर्दीत भेट दिली.

## शास्त्रीय संगीताला ओळख मिळवून देणारे महाराज चक्रधर सिंह यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंचे गौरवोद्गार

वृत्तसंस्था
रांची

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले छत्तीसगडच्या रायगड जिल्ह्यात आयोजित ३९ व्या चक्रधर सोहळ्यात सहभागी झाले होते. यावेळी ना. रामदास आठवले म्हणाले की, या सांस्कृतिक महोत्सवात सहभागी होऊन आपण तीर्थक्षेत्रात आलो आहोत असे वाटते. अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून देशविदेशातील नामवंत कलाकार गेल्या 39 वर्षांपासून अखंडपणे आपल्या अद्वितीय प्रतिभेचे दर्शन घडवत आहेत, हीच खऱ्या अर्थाने महाराजा चक्रधरसिंहजींना खरी श्रद्धांजली आहे.



रामदास आठवले म्हणाले की, महाराज चक्रधर सिंह हे स्वत: आदिवासी राजा होते, ते मूळचे चंद्रपूर महाराष्ट्र चे आहेत. त्यांनी छत्तीसगड मध्ये कथ्थक 'रायगड घराणे' या चौथ्या घराण्याची निर्मिती करून शास्त्रीय कला आणि संगीताच्या क्षेत्रात देशाला जागतिक पटलावर गौरवले आहे हे अतिशय आश्चर्यकारक आहे. ना. राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले की, जेव्हा महाराज चक्रधर सिंह यांनी चक्रधर समारंभाची सुरुवात केली तेव्हा हा उत्सव संगीत क्षेत्रातील रोपट्यासारखा होता, ज्याचे आता देशातील नामवंत कलाकारांच्या सहभागाने मोठ्या सांस्कृतिक वृक्षात रूपांतर झाले आहे. छत्तीसगडच्या रायगड जिल्ह्यात आयोजित ३९ व्या चक्रधर कार्यक्रमात माननीय राज्यसभा सदस्य. खासदार राजा देवेंद्र प्रताप सिंह जी, रायगड भागातील लोकसभा खासदार मा. राधेश्याम राठिया जी, आमदार मा. अनुज शर्मा, रिपाइंचे ज्येष्ठ नेते विजयकुमार गुप्ता, अभिषेक वर्मा, उषा आफळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.








**मुंबई ।** प्रति वर्षाप्रमाणे यंदाही काळाचौकीतील दत्ताराम लाड मार्गावर गणेश विसर्जन पुष्पवृष्टी सोहळा मयुरेश उत्सव मंडळातर्फे साजरा करण्यात आला. गेले ३३ वर्ष मंडळ हा उपक्रम राबवित आहे. विशेष म्हणजे या मार्गावरून ४० ते ५० सार्वजनिक मंडळाचे गणपती तसेच हजार ते दीड हजार छोट्या गणपतीच्या गाड्या परिवहन करत असतात. या सर्वांवर मयुरेश उत्सव मंडळातर्फे अनेक सामाजिक देखाव्या मधून पुष्पवृष्टी केली जाते. यंदा मंडळाने सामाजिक बांधिलकी जपून स्त्री अत्याचारांवरती नयनरम्य असा 'वात्सल्यमूर्ती'चा देखावा उभारून त्यामधून पुष्वृष्टी केली. तसेच पाणी वाटपही केले. यासाठी मंडळाचे अध्यक्ष दिनेश पाडेकर, सचिव गणेश सावंत, खजिनदार प्रकाश कदम, कार्याध्यक्ष अनिल चव्हाण, सदस्य प्रसाद सुर्वे, किरण गुरव यांनी अथक परिश्रम घेतले.